ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४३ अंक ६ पाने ५६ एप्रिल २०१६ मूल्य २२ रु.

## "ईशान्य भारत"

ईशान्य भारतातील शिक्षण व रोजगार विकासाचा आढावा
नटाली वेस्ट खारकोन्गोर

विशेष लेख
ईशान्येकडील जमातींचा विकास
एन.सी. सक्सेना

सिक्किम: देशातील पहिले सेंद्रीय शेती राज्य
शशी मिश्रा

दरवळ आसामी चहाचा
सुदीप्तो कर

(फोकस)
ईशान्य भारतातील कृषी व्यवस्था
निरेंद्र देव




Subscribe Online NOW
YOJANA
योजना
Kurukshetra
कुरुक्षेत्र
आजकल
Log on to
http://publicationsdivision.nic.in/,
in collaboration with bharatkosh.gov.in


Publications Division
Ministry of Information and Broadcasting
Government of India
website: publicationsdivision.nic.in
Prestigious
INDIA 2016
Reference Annual
now
available
ONLINE
भारत 2016
INDIA 2016
Buy at flipkart
www.flipkart.com
Buy eBooks at kobo
www.kobo.com

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४३ ❖ ❖ अंक ६ ❖ ❖ एप्रिल २०१६ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ ईशान्य भारतातील शिक्षण व रोजगार विकासाचा आढावा | नटाली वेस्ट खारकोन्गोर | ५ |
| ■ ईशान्य भारताची अभिवृद्धी क्षमता | संजोय हजारिका | ९ |
| ■ ईशान्य भारतातील जलमार्ग | डॉ विश्वपती त्रिवेदी | १२ |
| ■ ईशान्य भारत: जागतिक पर्यटनासाठी अज्ञात असलेला स्वर्ग | सौरभ कुमार दीक्षित | १४ |
| ■ ईशान्य भारतातील जैवविविधता | डॉ. अरुप कुमार मिश्रा | १८ |
| ■ ईशान्येकडील जमातींचा विकास (विशेष लेख) | एन.सी.सक्सेना | २७ |
| ■ सिक्किम : देशातील पहिले सेंद्रीय शेती राज्य | शशी मिश्रा | ३२ |
| ■ दरवळ आसामी चहाचा | सुदीप्तो कर | ३६ |
| ■ ईशान्य भारतातील कृषी व्यवस्था (फोकस) | निरेंद्र देव | ३९ |
| ■ आरोग्य आणि लिंगानुपात यांच्या माध्यमाद्वारे झालेला विकास | डॉ. अरुणा भट्टाचार्य चक्रवर्ती | ४२ |
| ■ मेघालयातील स्वायत्त जिल्हा परिषदांची भूमिका व कार्य | डॉ. चिंतामणी राऊत | ४५ |
| ■ ईशान्येकडील राज्यातही कौशल्यपूर्ण भारत मोहीम | संजीव दुग्गल | ४९ |
| ■ ईशान्येकडील राज्यांना वीजपुरवठा- संधी व आव्हाने | के.रामनाथन | ५३ |


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

योजना

## संपादकीय

# विकासाच्या वाटेवरील ईशान्य भारत

प्रादेशिक आणि सांस्कृतिक जवळीकीच्या भावनेमुळे ईशान्य भारतातील राज्यांना सात भगिनींचा समूह असेही म्हटले जाते. या सात भगिनी म्हणजे अर्थातच आसाम, त्रिपुरा, मेघालय, मिझोरम, नागालँड, अरुणाचलप्रदेश आणि मणिपूर ही सात राज्ये. सिक्कीम या आठव्या राज्याची अलीकडेच त्यात भर पडली. हा प्रदेश राजकीय आणि सामरिकदृष्ट्या खूपच महत्वाचा आहे. म्यानमार, बांगलादेश आणि अर्थातच भावी जागतिक महासत्ता चीन या देशांच्या सीमा ईशान्य भारताला लागून आहेत. यामुळे ईशान्य भारताचा विकास किती महत्वाचा आहे, हे लगेच लक्षात येते.

'सात भगिनी' असे जरी म्हटले जात असले तरी ईशान्य भारतातील प्रत्येक राज्य वंश, भौगोलिकता, संस्कृती आणि भाषा या बाबतीत आपले वेगळेपण टिकवून आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास एक आसामी नागा व्यक्तीपेक्षा तितकाच भिन्न आहे जितका फरक एका बिहारी आणि पंजाबी नागरिकांमध्ये आपणास दिसून येतो. असाच फरक बोडो आणि गारो जमातींच्या लोकांमध्ये असतो.

नितांत सुंदर निसर्ग आणि जैवविविधतेमुळे पर्यटकांसाठी हा प्रदेश आनंदाची पर्वणीच ठरतो. आसाममधील राष्ट्रीय अभयारण्य, मेघालयमधील तलाव आणि धबधबे, कांचनगंगातील हिमच्छादित पर्वत शिखरे आणि सिक्कीममधील मठ या सर्वातून ईशान्य भारतातील नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक विविधतेचे दर्शन होते. या राज्यांतील पारंपारीक नृत्ये कुणालाही ठेका धरायला लावणारी आहेत, शिवाय तेथील लोकांनी बनवलेल्या वस्तू आणि वस्त्रे जगभर प्रसिध्द आहेत.

ईशान्य भारताच्या अशा या स्वर्गासमान धरतीला हिंसाचाराचा मात्र शाप मिळालेला आहे. त्यामुळे विकासाच्या लाभापासून येथील लोक काहीसे वंचित आहेत. शैक्षणिक सुविधा आणि रोजगाराच्या संधीची वानवा यामुळे वर्षानुवर्षे येथील युवक देशातील इतर भागात मोठ्या प्रमाणावर स्थलांतरीत होण्यासाठी बाध्य होतात. सुरक्षित वातावरणासोबतचे चांगल्या शैक्षणिक सुविधा आणि रोजगाराच्या संधी निर्माण केल्यास हे पलायन थांबवता येईल. अंमली पदार्थ ही आणखी एक समस्या. या भागातील तरुण तसेच वयस्क सर्वच वयोगटातील नागरिकांना याचा फटका बसत आहे.

शेती हा या प्रदेशातील एक प्रमुख व्यवसाय. चहा, अद्रक, भाज्या आणि फळे ही येथील मुख्य उत्पादने. आधुनिक संसाधनांच्या अभावी कष्टाच्या तुलनेत कमी मोबदला येथील शेतकऱ्यांच्या पदरी पडतो. विशाल ब्रम्हपूत्रा नदीमुळे वारंवार येणारे पूर या प्रदेशाच्या स्थैर्याला धोका निर्माण करतात. अविकसित पायाभूत सुविधा हा ईशान्य भारतातील राज्यांच्या विकासात असलेला आणखी एक अडथळा म्हणता येईल.

या सर्व समस्या तातडीने सोडविणे गरजेचे आहे, तरच हा महत्वाचा प्रदेश देशाच्या इतर भागासोबत विकास यात्रेत सहभागी होवू शकेल आणि तेथील नागरिक आपल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करू शकतील.

■■■

# ईशान्य भारतातील शिक्षण व रोजगार विकासाचा आढावा

नटाली वेस्ट खारकोन्गोर



***मार्च 2011 मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या राष्ट्रीय जनगणना अहवालानुसार ईशान्य भारतातील राज्यांत साक्षरतेचे प्रमाण 77.76 टक्के एवढे होते. तर याच कालावधीत संपूर्ण देशाच्या सरासरी शिक्षित लोकसंख्येचे प्रमाण 74.04 टक्के होते. परंतु, शिक्षणाचे प्रमाण जास्त असूनही पूर्वोत्तर भारतातील शिक्षण व्यवस्थेचा म्हणावा तितका विकास झालेला नाही. पूर्वोत्तर भारतातील शिक्षण व्यवस्था असंघटित असून अनेकविध समस्या व आव्हानांनी ग्रासलेली आहे.***

ईशान्य भारताचा भाग आसाम, अरूणाचल प्रदेश, मेघालय, मणिपूर, मिझोरम, नागालँड, त्रिपुरा, व सिक्किम या आठ राज्यांनी व्यापलेला आहे. या सर्व राज्यांतील साक्षरतेचा दर संपूर्ण देशाच्या सरासरी साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा अधिक आहे. मार्च २०११ मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या राष्ट्रीय जनगणना अहवालानुसार ईशान्य भारतातील राज्यांत साक्षरतेचे प्रमाण ७७.७६ टक्के एवढे होते. तर याच कालावधीत संपूर्ण देशाच्या सरासरी शिक्षित लोकसंख्येचे प्रमाण ७४.०४ टक्के होते. परंतु, शिक्षणाचे प्रमाण जास्त असूनही पूर्वोत्तर भारतातील शिक्षण व्यवस्थेचा म्हणावा तितका विकास झालेला नाही. पूर्वोत्तर भारतातील शिक्षण व्यवस्था असंघटित असून अनेकविध समस्या व आव्हानांनी ग्रासलेली आहे. विशेषत: येथे उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा फारसा चांगला नसल्याने मोठ्या संख्येने विद्यार्थी देशातील इतर प्रगत प्रांतांत जाणे पसंत करतात. येथील शिक्षण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात राज्य सरकारांचा अंकुश आहे. तसेच पूर्वोत्तर राज्यांतील शिक्षणाचा दर्जा हा राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या तोडीचा नाही. येथील राज्यांत आजही पारंपारिक पध्दतीने शिक्षण दिले जाते. अशा अनेक कारणांमुळे येथील विद्यार्थ्यांमध्ये बाहेरच्या राज्यांत शिक्षण घेण्याचे प्रमाण नेहमीच जास्त होते. यास भर म्हणून गेल्या काही वर्षांत येथे शिक्षण गळतीचे प्रमाणही कमालीचे वाढल्याचे आढळले आहे. २०११-१२ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिली ते आठवी दरम्यान शिक्षण अर्धवट सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ईशान्य भारतात ५०.०५ टक्के इतकी होती. याच काळात राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी गळतीचे प्रमाण ४०.८ टक्के होते.

केवळ पुस्तकांवर आधारित शिक्षण, नव्या तांत्रिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण संधींचा अभाव अशा साचेबध्द व मर्यादित स्वरूपाच्या अभ्यासक्रमांमुळे शिक्षित विद्यार्थ्यांमध्ये रोजगारक्षमतेच्या गुणांचा विकास होऊ शकत नाही व परिणामत: त्यांच्यासाठी रोजगारासंधीही मर्यादित राहतात. ईशान्य भागातल्या विद्यार्थ्यांनाही या समस्येला तोंड द्यावे लागले आहे. येथे खूप मोठ्या संख्येने पदविकाधारक, पदवीप्राप्त विद्यार्थ्यांबरोबरच कित्येकदा उच्च पदवी घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनाही योग्य रोजगार संधींपासून वंचित राहावे लागले आहे. भारतातील इतर प्रगत प्रांतांच्या तुलनेने आजही येथे योग्य गुणवत्तेच्या शैक्षणिक संधी व व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण झालेल्या नाहीत.

वर नमूद केलेल्या काही प्रमुख अंतर्गत नकारात्मक बाबींबरोबरच येथील राज्यांत सतत होणारी आंदोलने व बंद, दहशतवादी कारवाया इ. बाह्य सामाजिक गोष्टींचाही प्रतिकूल परिणाम येथील शिक्षण व्यवस्थेवर जाणवतो. सततच्या सामाजिक अस्थिरतेमुळे वर्षभरात १०० दिवसांपर्यंत शालेय वर्ग बंद ठेवण्यात आल्याच्या घटनाही येथे घडत असतात. यामुळे नाईलाजास्तव येथील पालकांना त्यांच्या पाल्यांना शिक्षणासाठी दूरच्या प्रांतात ठेवावे लागते. दूरच्या राज्यांतील शिक्षणाचा प्रचंड खर्च व त्याबरोबर अनेक असामाजिक घटकांकडून सीमाभागात होणारी लहान व किशोरवयीन मुलांची तस्करी ही देखील एक गंभीर सामाजिक समस्या पूर्वोत्तर भागातल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मार्गात अडसर ठरली आहे. शिक्षणासाठी निकोप व सुरक्षित वातावरणाचा येथे नेहमीच अभाव जाणवतो. लहान मुलांच्या तस्करीसारख्या गंभीर प्रश्नावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सर्वोच्च न्यायालयाने मणिपूर राज्यातील १२ वर्षांखालील मुलांना राज्याबाहेर पाठवण्यावर बंदी घातली आहे.

आजच्या घडीला आवश्यक अशा किमान गुणवत्तेला पोषक नसणारी येथील शिक्षण व्यवस्था हे तर या भागातील स्थलांतराचे मुख्य कारण आहेच पण त्याबरोबरच, येथील सीमा परिसरातील दहशतवाद व स्थानिक समूदायातील संघर्ष व बंडात्मक कारवाया इ. काही सामाजिक कारणांमुळेही पूर्वोत्तर भागातील विद्यार्थ्यांना दूरच्या राज्यांत राहण्याचा पर्याय स्वीकारावा लागतो. ईशान्येकडील सर्वच राज्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आंतरिक संघर्ष व एकप्रकारच्या दहशतीने ग्रासले आहे. या मध्ये खासकरून आसाममधील उल्फा व कर्बी अंग्लोग यांच्यातील संघर्ष, नागालँडमध्ये नागालिम व नागा-कुकी या स्थानिक जमातींमधील तंटे, अरूणाचल प्रदेशातील चकमा हजोंग व अरूणाचली यांच्यातील तणाव, व ईशान्येकडील सर्वच राज्यांतील स्थानिक जमातीं विरूध्द बाहेरच्या राज्यांतून स्थायिक झालेले लोक यांच्यातील सततचा संघर्ष यांचा उल्लेख करावा लागेल. या विविध लोकसमूदायांत होणाऱ्या सततच्या उठावांमुळे पूर्वोत्तर राज्यांत नेहमीच दहशतीचे व असंतोषाचे वातावरण असते.

---

***सततच्या सामाजिक अस्थिरतेमुळे वर्षभरात १०० दिवसांपर्यंत शालेय वर्ग बंद ठेवण्यात आल्याच्या घटनाही येथे घडत असतात. यामुळे नाईलाजास्तव येथील पालकांना त्यांच्या पाल्यांना शिक्षणासाठी दूरच्या प्रांतात ठेवावे लागते. दूरच्या राज्यांतील शिक्षणाचा प्रचंड खर्च व त्याबरोबर अनेक असामाजिक घटकांकडून सीमाभागात होणारी लहान व किशोरवयीन मुलांची तस्करी ही देखील एक गंभीर सामाजिक समस्या पूर्वोत्तर भागातल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मार्गात अडसर ठरली आहे.***

---

सीमा भागातील तस्करी सारखे गुन्हे, स्थानिक जमातींमधील परस्परविरोधी बंड, राष्ट्रीय सेनादल व दहशतवादी यांच्यात होणारी सततची चकमक इ. मुळे ईशान्य भारतात राहणे अतिशय जिकिरीचे व क्लेशदायक बनले आहे. येथील सामाजिक व राजकिय अस्थिरतेबरोबरीने दहशतवादी गटांची बंडखोरी, रक्तपात, नागरिकांची सततची आंदोलने, सेनादलांना देण्यात आलेले विशेषाधिकारांचे कायदे व सरकारी यंत्रणेचा भ्रष्ट कारभार यांसारख्या अनेक समाजविरोधी समस्यां गेली अनेक दशके ईशान्य भारतात ठाण मांडून आहेत. १००दिवसांहून अधिक काळ चालणारी आंदोलने व बंद, तर कधी आतंकी कारवायांमुळे येथील दैनंदिन व्यवहार दुकाने, शाळा व रस्तेवाहतूक कित्यक दिवस बंद राहतात, तर काही भागात दिवसांतून केवळ दोन तासच वीजपुरवठा होतो तसेच काही भागात अगदी तुटपुंजा पाणीपुरवठा केला जातो. काही भागांत तर नेहमीच दुकाने व बाजारपेठा संध्याकाळी चार वाजेनंतर बंद करावे लागतात व आठ वाजेनंतर सर्व व्यवहार बंद होऊन प्रमुख रस्त्यांवर अगदी सामसूम असते अशा ठिकाणी कोणाही सर्वसामान्य व्यक्तीला कधी एखादा दहशतवादी सहज लूटतो तर कधी गस्त घालणारे पोलिस पकडून घेऊन जातात. अशा भयंकर परिस्थितीमुळे ईशान्येच्या राज्यांतील काही भागांत राहणे एक दु:स्वप्नच बनले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळापूर्वीपासून पूर्वोत्तर भागातील लोक सतत सामाजिक अस्थिरतेने भरलेल्या वातावरणात राहत आलेले आहेत. भारतात जागतिकीकरणापूर्वीच्या काळात तर आपले गाव किंवा वस्ती सोडून दूरच्या राज्यात जाण्याचा विचारही इथल्या लोकांनी कधी केला नव्हता. नव्वदीच्या दशकानंतर जागतिकीकरणाची लाट भारतात पसरली त्याचे परिणामस्वरूप बीपीओ, शॉपिंग मॉल्स व हॉस्पिटॅलिटी या नव्याने दाखल झालेल्या सेवा क्षेत्रात तरूणांसाठी चांगल्या पगाराच्या अनेक नव्या रोजगार संधी निर्माण झाल्या. पूर्वोत्तर भारतातल्या युवापिढीलाही बाहेरच्या राज्यांतील या आकर्षक रोजगाराच्या संधी खुणावू लागल्या. येथील राज्यांत सरकारी व खाजगी क्षेत्रांत रोजगाराची वानवा असल्यामुळे या युवावर्गाने दूरच्या राज्यांत जाण्यास सुरूवात केली.

येथील मूलवासीय असणाऱ्या विविध स्थानिक समूदायांमधील विकोपाचे संघर्ष व सीमाप्रांतातील दहशतीच्या कारवाया यांमुळे ईशान्येकडील अनेक गावांत लाकवस्तीच राहिलेली नाही.अनेक स्थानिकांना या संघर्षात नाहक प्राण गमवावे लागले आहेत, तर कित्येकांची कुटुंबे उध्वस्त होऊन ते अनाथ झालेत. अशा परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टीने काहींनी आपल्या कुटुंबांसमेत जवळच्याच मोठ्या शहरात किंवा शेजारच्या राज्यांत आसरा घेतला तर काहींनी आपल्या परिजनांसह दिल्ली, मुंबई, बंगळूरू अशा महानगरांत स्थलांतर केले. त्यातही दिल्ली व कलकत्ता ही शहरे ईशान्यवासीयांना स्थलांतरासाठी रोजगार हमीच्या दृष्टीने जास्त सोईची व सुरक्षित वाटतात.

येथील आणखी एक प्रमुख व अटळ अशी समस्या म्हणजे, हा अतिवृष्टीचा प्रदेश आहे. येथील सर्व लहान मोठ्या सर्वच नद्यांना वर्षात एक दोनदा मोठे पूर येतात तसेच उंच सखल भागात खूप पाणी साचून राहते. या काळात येथील सर्वच राज्यांतील जनजीवन विस्कळीत होते. कित्येकदा अतिवृष्टी व पूर यांमुळे अनेक भागांना जोडणारे रस्ते पाण्याखाली जातात व कित्येक भागांशी पूर ओसरेपर्यंत संपर्कच होऊ शकत नाही. निसर्गाच्या या आक्रंदनापुढे हतबल असणाऱ्या येथील जनतेचे सर्वसामान्य उत्पन्नाचे धोपट मार्गही या काळात बंद होतात. अशा नैसर्गिक प्रतिकूलतेची दाहकता कुटुंबातील तरूणांना सोसावी लागू नये म्हणून अनेक कुटुंबिय त्यांना देशातील इतर सुरक्षित भागात पाठवतात.

एरवीही येथे वीजपुरवठा, आधुनिक माहिती व संपर्क तंत्राची साधनसुविधा जसे इंटरनेट सेवा इ. उपलब्ध नाहीत. वृत्तपत्रे, मासिके अशा छापील माध्यमांबरोबरच, आधुनिक ईलेक्ट्रॉनिक माध्यमांतून आजवर ईशान्य प्रांतातील जीवन व येथील जटील समस्यांबाबत म्हणावी तितकी प्रभावी जागृती झालेली नाही. किंबहुना असेच म्हणावे लागेल की, सर्वच प्रसारमाध्यमांच्या झोतापासून ईशान्य भारत कायमच डावलला गेला आहे.

वर उल्लेखित अनेक परिस्थितीजन्य कारणांमुळे ईशान्य भारतातील जनतेचे दूरच्या राज्यांत स्थायिक होण्याचे प्रमाण नेहमी चढते राहिले आहे. हे वाढते स्थलांतर रोखण्यासाठी येथील शिक्षण व्यवस्थेत अमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. शिक्षण व्यवस्थेत काळानुरूप बदल आत्मसात करतांना गुणवत्ता वाढ, संशोधन व उद्योजकतेला प्रोत्साहित करतील असे औद्योगिक व व्यवसायजन्य प्रशिक्षण इ. काही नवीन गोष्टींवर भर दिला पाहिजे. या भागातील तरूणांमध्ये रोजगार सक्षमतेचे प्रमाण वाढवण्यासाठी उद्योग जगतातील नामवंत कंपन्यांनी पुढाकार घेऊन त्यांच्या सामाजिक बांधिलकीच्या कार्याचा भाग म्हणून येथील तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थांना सहाय्य दिल्यास ते खूप मोलाचे ठरेल.

ईशान्य भारताचा विकास, येथील शिक्षण व्यवस्था व पर्यटनक्षेत्र यांबाबत आजवर विविध संस्थांद्वारा कित्येक चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषदा, व तज्ञ अभ्यासगटांच्या संशोधन लेखनाचे सादरीकरण इ. माध्यमांतून विविध मुद्द्यांवर बरीच गहन चर्चा व विश्लेषणे मांडली गेली आहेत. प्रत्यक्ष परिस्थिती मात्र जैसे थे आहे. काहीच ठोस उपाय योजिले जात नसल्याने येथील पर्यटनक्षेत्र आजही प्राथमिक अवस्थेत आहे. तर शिक्षणक्षेत्राबाबत ठाम भूमिका घेण्यास राज्यसरकारांत एकवाक्यता नाही. त्यामुळे रोजगारसंधी असूनही त्या प्रत्यक्षात उपलब्ध नाहीत. त्यामुळे अजून कोणतीही चर्चा व संशोधनपर अभ्यासगट नेमण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती व धोरणात्मक निर्णयांची योग्य अंमलबजावणी करण्याचीच खऱ्या अर्थाने येथे नितांत आवश्यकता आहे. शिक्षण व रोजगारासंबंधी धोरण राबवतांना योग्य दृष्टीकोन ठेऊन येथील तरूणांच्या उपजत कौशल्यांचा योग्य क्षेत्रात पूरेपूर उपयोग करण्यावर भर दिला गेला पाहिजे. ईशान्य भागातील राज्यांत सर्वसाधारणपणे शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे. येथील लोकसंख्येची मूळ सांस्कृतीक पार्श्वभूमी जरी वेगवेगळी असली, तरी येथील तरूण पिढीला इंग्रजी भाषेच्या व्यावहारिक वापराची उत्तम जाण आहे याशिवाय पाश्चात्य देशांतील आधुनिक बदलांची दखलही ते नियमितपणे घेतात. स्थानिकांसाठी रोजगारसंधी तयार करणाऱ्या सरकारी यंत्रणांनी येथील तरूणाईचा मानसिक कल समजून घेतला तर हा तरूणवर्गच येथील पर्यटनक्षेत्रात फार मोलाचे योगदान देऊ शकतो, ही बाब धोरणकर्त्यांनी लक्षात घ्यायला हवी. ईशान्येकडील राज्यांना भौगोलिकदृष्ट्या निसर्गसंपन्न भूभाग लाभला आहे. जैवविविधतेच भांडारच येथील भूमीवर मुक्त वास्तव्य करते. यामुळे आकृष्ट होऊन वर्षभर मोठ्या संख्येने देशातील तसेच परदेशातील पर्यटक येथे येत असतात. त्यामुळे पर्यटनक्षेत्रात अनेक नवनवीन कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी येथे प्रचंड संधी व तितकेच सक्षम मनुष्यबळ उपलब्ध आहे. म्हणूनच ईशान्येकडील सर्वच राज्यांतील शासकिय यंत्रणा,या प्रदेशातील चेंबर ऑफ कॉमर्स सारख्या संस्था, नागरी समाज, इ. सारख्या विविध संस्थांनी एकत्रितपणे पूर्वोत्तर भारताला देशातील सर्वोत्कृष्ट पर्यटन व शैक्षणिक केंद्र बनविण्याचे उद्दिष्ट्य समोर ठेऊन, योग्य कृतीआराखडा बनवून त्यानुसार वेळीच पावले उचलायला हवीत.

'मेक इन इंडिया' व 'स्टार्ट अप इंडिया' सारख्या नव्या सरकारी योजनांचे लाभ

मिळण्यासाठी ईशान्येकडील राज्यांकडे भविष्यात मागणी असणाऱ्या विविध क्षेत्रांतील नव्या रोजगाराभिमुख संधींची व त्यानुसार भविष्यात या राज्यांतील सक्षम मनुष्यबळाच्या उपलब्धतेची सविस्तर माहिती तयार असायला हवी. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक व सेवा क्षेत्रातील नव्या रोजगारांबरोबरच येथील समृध्द प्राकृत प्रदेशातील खनिजे, जंगले, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, पाणी, सागरी मासेमारी, रेशमाच्या किड्यांचे, पर्यटन, इ. व्यवसायांतील मोठ्या प्रमाणावर रोजगारसंधीचा आढावा तयार असणे आवश्यक आहे. तसेच येथील राज्य शासनाने रोजगारसक्षम व कुशल मनुष्यबळ विकासासाठी योग्य अशा अभ्यासक्रमाची आखणी करणे व अद्ययावत तंत्रज्ञानपूरक अशा शिक्षणाची सोय करणे, शिक्षकांसाठी नव्या आधुनिक शिक्षण पध्दतींची माहिती करून देण्यासाठी त्यांच्यासाठी वेळोवेळी योग्य प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे, सुट्टीच्या काळात विद्यार्थी व शिक्षकांसाठी कौशल्यविकासपर शिबीरे राबवून त्यांची कामगिरी उंचावेल असे शैक्षणिक वातावरण तयार करणे इ. कल्पना प्रत्यक्षात राबवायला हव्यात.

ईशान्येतील आठही राज्यांतील प्रमुख पर्यटनस्थळांना जोडणाऱ्या रस्तेमार्गांचा विकास व सोबत इतर पायाभूत सुविधांची निर्मिती जलद गतीने होण्यासाठी संबंधित सर्व स्तरांतून योग्य सहकार्य मिळून त्यानुसार नियोजित कामे हाती घेणे आवश्यक आहे. युथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडिया (YHA) सारख्या संस्थांनी पुढाकार घेऊन येथील निसर्गरम्य डोंगराळ भागात गिर्यारोहण व इतर साहसी क्रीडाप्रकारांचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्याच्या कामी स्थानिक तरूणांना संधी व प्रोत्साहन देऊन वेगळ्या धाटणीच्या रोजगारसंधी तयार करण्यात पुढाकार घ्यावा.

याबरोबरच महत्वाचे म्हणजे येथील शासनसंस्थांनी खाजगी क्षेत्रातील संस्था व लोकसहभागातून ईशान्य भारताच्या सर्वसमावेशक पर्यटन विकास धोरणाचा नवा आराखडा तयार करण्याची गरज आहे. गोवा व केरळप्रमाणेच इथेही कायमस्वरूपाचा पर्यटन व्यवसाय वृध्दींगत होऊन, स्थानिक तरूणांना मोठ्या प्रमाणात नियमित रोजगार मिळण्याचा चांगला पर्याय उपलब्ध होईल, असे सर्वव्यापी शाश्वत पर्यटन विकास धोरण राबवायला हवे.

ईशान्य भारतातील पारंपारिक बाजारपेठा व सर्व आठही राज्ये एकमेकांना लागून आहेत. तसेच भारताच्या पूर्वसीमेला लागून असलेल्या म्यानमार, नेपाळ व बांग्लादेश या देशांशीही हा सर्व प्रदेश थेट जोडलेला आहे. हा संपूर्ण परिसर दक्षिण आशियायी देशांत जाण्यासाठी अतिशय सोईस्कर आहे. येथे अधिक चांगल्या पायाभूत सुविधांचा विकास घडवून आणण्यासाठी व त्यानुषंगाने रोजगार निर्मितीच्या कार्यात वित्तीय संस्था महत्वाची भूमिका बजावून शकतात. तसेच शासकिय पातळीवर व्यापारविनिमय व भांडवली कर्ज वितरण प्रणाली योग्यप्रकारे विकसीत केल्यास येथील स्थानिकांना या प्रदेशांच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचे सर्व लाभ मिळू शकतील. याकरिता सर्वप्रथम येथील सर्व राज्यांतील अनेक संस्थात्मक समस्यांचे निवारण व विभिन्न लोकसमूदायांमध्ये परस्पर सामंजस्य वाढवण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.

येथील नगदी पिके जसे चहा, कॉफी, सुगंधी व औषधी वनस्पती, फळबागा व फुलशेतींतील उत्पादनांतून मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ मिळण्यासाठी या भागात विशेष आर्थिक क्षेत्र (SEZs) निर्माण होणे उपयुक्त ठरेल. याबरोबरच संशोधन व विकास यंत्रणेमार्फत या सर्व उत्पादनांची मागणी वृध्दिंगत होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान विकसीत करणे अनिवार्य आहे. हे तंत्रज्ञान सुलभपणे उपलब्ध केल्यास त्याचा लाभ येथील सर्वसामान्य लघु उद्योजकांलाही मिळेल. कार्यक्षम बाजारपेठ यंत्रणा विकसित करण्यासाठी प्रभावी उत्पादन पुरवठा साखळी तयार करावी. यासाठी शिलाँग येथील भारतीय व्यवस्थापन संस्था मोलाचे मार्गदर्शन करू शकेल.


ईशान्य भारताला सामाजिक विवंचनेतून पूर्णपणे मुक्त करण्यासाठी व्यापक स्तरावर प्रयत्न आवश्यक आहे. यामध्ये राजकिय इच्छा शक्ती व प्रशासकिय अधिकारी व नोकरशाही व्यवस्थेकडून शासन निर्णयांची योग्य अंमलबजावणी, व्यवसाय व उद्योगकरण्यास अनुकूल सहाय्य व व पोषक वातावरण निर्मिती व प्रदेशातील जटील समस्यांचे निराकरण करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रांसह खाजगी क्षेत्राचा व सर्वसामान्य लोकनिरंतर सहभाग यासर्व गोष्टी अत्यावश्यक आहेत. वरील सर्व घटकांनी या प्रदेशातील सद्य शिक्षणयंत्रणा बदलण्यासाठी व रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी एकत्रित प्रयत्न केल्यास ईशान्येकडील राज्यांतून होणारे स्थलांतर कमी होण्यास यश मिळेल व सीमांतर्गतदहशतवादी कारवायांवरहीअंकुशबसेल.

■ ■ ■

*लेखिका आयआयएम शिलाँग येथे अर्थशास्त्राच्या सहप्राध्यापिका असून 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ नॉर्थ इस्ट रिजन'च्या प्रमुख आहेत.*

# ईशान्य भारताची अभिवृद्धी क्षमता

संजोय हजारिका



***ईशान्य भारताने आता पूर्वेला न बघता दक्षिण व पश्चिमेकडे पाहायला हवे. कारण ईशान्य प्रदेशाच्या पूर्वेला म्यानमार (ब्रह्मदेश) ची अनिश्चित भिंत आहे. लष्करी राजवटीकडून एका अनिश्चित लोकशाहीकडे होणारे त्याचे स्थित्यंतर ही एक गोंधळलेल्या स्थितीचे निदर्शक असणार आहे.***

आग्नेय आशियासाठी ईशान्य भारत खुले झाल्याबद्दल बरीच चर्चा होत असली तरीही १९९० च्या सुरुवातीपासून औपचारिक भेटी आणि परिषदांचा विषय होऊनही त्याची प्रगती फारशी दृष्टिपथात आली नाही. प्रादेशिक अर्थव्यवस्था खुली होण्यात बांगलादेशाशी सुधारलेल्या राजकीय आणि व्यापारी संबंधाचा निश्चितच महत्त्वाचा वाटा आहे.

पंतप्रधानांनी ढाका व गुवाहाटी जाहीरनाम्यात नमूद केल्याप्रमाणे व त्यांच्यापूर्वी इतर नेत्यांनी वेळोवेळी सांगितल्याप्रमाणे ईशान्य भारताला दक्षिण व आग्नेय आशियात अधिक महत्त्वाची भूमिका बजावणे आता शक्य होईल.

त्याचा असाही अर्थ होतो की ईशान्य भारताने आता पूर्वेला न बघता दक्षिण व पश्चिमेकडे पाहायला हवे. कारण ईशान्य प्रदेशाच्या पूर्वेला म्यानमार (ब्रह्मदेश) ची अनिश्चित भिंत आहे. लष्करी राजवटीकडून एका अनिश्चित लोकशाहीकडे होणारे त्याचे स्थित्यंतर ही एक गोंधळलेल्या स्थितीचे निदर्शक असणार आहे.

व्यवसायातील सहजता हळूहळू सुधारते आहे आणि याचा पायंडा पाडण्याचे काम लहानशा त्रिपुरा राज्याचे आहे. तेथील राज्य सरकारमुळे बांगलादेश सरकारच्या मदतीने नुकताच एक मोठा इंटरनेट गेटवे (भारतातील तिसरा) खुला झाला आहे. त्यामुळे एरवी आगरताळासारखी लहानशा राज्याची निद्रिस्त राजधानीदेखील सीमेपारच्या उद्योगधंद्यातील व्यावसायिकांच्या येण्या जाण्याने आता फूलू लागली आहे. प्रत्यक्षात इतर ईशान्य राज्यांच्या तुलनेत त्रिपुराची राज्य चालवण्याची चांगली पद्धत आणि सेवा पुरवण्याची शासनाची वचनबद्धता यामुळे हे शक्य झाले असावे. अनेकांनी बंडखोरीचा मार्ग सोडला असून राज्यात शांतता नांदू लागली आहे. वादग्रस्त ठरलेले 'सशस्त्र बल विशेष अधिकार अधिनियम' व 'अशांत क्षेत्र अधिनियम ' हे दोन्ही कायदे राज्य शासनामार्फत मागे घेण्यात आले.

बांगलादेशने वकीलातीच्या सुविधा बागडोग्राला सुरू केल्याने दार्जिलिंगसारख्या दूरवरच्या पर्यटकांना कोलकातापर्यंतचा द्राविडीप्राणायाम करावा लागत नाही.

हे एक लहानसे पण पुढचे पाऊल आहे. पूर्वी बांगलादेशला भेट देण्यासाठी अधिकृत परवानगी मागणे हा एक भयानक अनुभव होता. बांगलादेशी वकीलातीचे सगळ्यात जवळचे कार्यालय कोलकाता आणि आगरताळा इथे होते. त्यामुळे व्हिसा

मिळवण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा प्रवास व हजारो रुपयांचा खर्च करावा लागत असे. हीच गत अधिकृतरित्या इथल्या प्रदेशाला भेट देणाऱ्या बांगलादेशी नागरिकांच्या बाबतीतही होती. (बेकायदेशीर घुसखोरांविषयी आपण बोलत नाही आहोत.) अनेक दशकांनंतर सिल्हेट व गुवाहाटीला वकीलातीची कार्यालये उभी करण्याच्या प्रयत्नांना यश मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

तरीही, या सर्वांखेरीज, ईशान्य प्रदेशात आंतरराष्ट्रीय गुंतवणूक मिळवणे तसेच सक्रीय पूर्वीय धोरण आणि जोडणी(connectivity) ह्या आव्हानांना अधोरेखित करणारे काही घटक दिसून येतात. या मुद्यांवर वरवरची मलमपट्टी करण्यापेक्षा थेट प्रश्न सोडवल्यास अनेक मोठ्या अडचणी सोडवता येतील, असे लक्षात येते.

पहिली बाब ही की, अंतर्गत तसेच राज्यव्यवस्थेविरोधात दोन्ही पातळीवरील बंडखोरी व घुसखोरी ह्यांचा ६० वर्षांचा इतिहास असलेला अस्वस्थ भाग अशी प्रतिमा संपूर्णपणे पुसून टाकणे कठीण आहे. शासनाच्या विपणनाचे जबरदस्त अभियान चालवल्यावरही गुंतवणूकदारांना इथल्या प्रदेशाचं आकर्षण न वाटण्याच्या काही कारणांपैकी हे एक आहे.या प्रदेशासाठीचे केंद्राने ठरवलेले धोरण, सुरक्षेविषयी वाटणाऱ्या काळजीच्या चौकटीतच आखले गेले आहे. त्यामुळे राज्यसंस्था व नागरिक ह्यांच्यामध्ये परस्पर विश्वासाची कमतरता असून नागरिकांना वाटणाऱ्या दूरत्वाच्या भावनेने त्यात भर घातली आहे. सुरक्षा दलांनी केलेल्या मानवी हक्क उल्लंघनांच्या (ज्या लेखांकित केल्या गेल्या आहेत), तसेच राज्येतर सशस्त्र समूहांनी केलेल्या अशाच उल्लंघनांच्या घटना ह्यामुळे चित्र अधिकच बिघडले आहे.

'आग्नेय आशियाला आम्ही जोडून घेऊ असे म्हणणे सोपे आहे पण सुरक्षा-केंद्रित सीमा असलेल्या आपल्या देशात खरंच हे शक्य आहे?' शिलाँग टाईम्सचे संपादक पॅट्रिसिया मुखीम यांनी २०१४मध्ये हे लक्षात आणून दिले. शासनाचे धोरण आजच्या तारखेपर्यंत पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश व तामीळनाडू यांसारख्या समुद्रकिनाऱ्यावरील राज्यांनाच फायद्याचे आहे, कारण आंतरराष्ट्रीय व्यापार जमिनीवरून म्हणजे रस्त्याने किंवा लोहमार्गाने अत्यंत कमी होतो, प्रामुख्याने तो समुद्रातून होतो.

---

***ईशान्येकडच्या राज्यांना बेड्यामुक्त करण्यासाठी बंगालच्या उपसागराच्या बंदिस्त सीमा तोडल्या पाहिजेत. त्यासाठी आगरताळा ते चित्तगाँग पोर्ट व्हाया बांगलादेशातील अखौरामार्गे रेल्वे मार्ग जोडण्यात आला पाहिजे. हे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. याविषयावर दोन्ही देशांमध्ये बी. जी. वर्गीससारखे धोरण तज्ज्ञ हा मुद्दा रेटून धरत असले तरीही किमान दोन दशकांपासून यावर चर्चा सुरू आहे.***

---

भारताच्या इतर भागांच्या तुलनेत इथे पायाभूत सुविधांचा अभाव आहे, व भूमिसंपादन व्यवसाय समूहांसाठी असलेली गुरुकिल्ली - गुंतागुंतीच्या परंपरा, राजकीय व सामाजिक जाळ्यात (ज्या कधीकधी परस्परविरोधी असतात) अडकली आहे. याशिवाय, महाराष्ट्र, तामीळनाडू यांसारख्या चांगली कामगिरी असणाऱ्या राज्यांच्या तुलनेत ईशान्य भारतातील राज्ये प्रादेशिक अभिवृद्धीच्या कमतरतेमुळे मागास राहिली आहेत.

ईशान्येकडच्या राज्यांना बेड्यामुक्त करण्यासाठी बंगालच्या उपसागराच्या बंदिस्त सीमा तोडल्या पाहिजेत. त्यासाठी आगरताळा ते चित्तगाँग पोर्ट व्हाया बांगलादेशातील अखौरामार्गे रेल्वे मार्ग जोडण्यात आला पाहिजे. हे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. याविषयावर दोन्ही देशांमध्ये बी जी वर्गीससारखे धोरण तज्ज्ञ हा मुद्दा रेटून धरत असले तरीही किमान दोन दशकांपासून यावर चर्चा सुरू आहे.

यामुळे बांगलादेशी उत्पादनांना मुख्यत्वे ईशान्येकडील राज्यांमध्ये भारतीय बाजारपेठ मिळेल, व ईशान्य भारतातील उत्पादने बांगलादेशी बाजारपेठेत उपलब्ध होऊ शकतील तसेच भारतीय माल आंतरराष्ट्रीय बाजारात पाठविण्यासाठी बंदर उपलब्ध होईल.

राष्ट्रीय बांबू मिशनने काढलेल्या अंदाजावरून जवळपास २० दसलक्ष टन बांबूचे उत्पन्न दर वर्षी काढले जाते व या क्षेत्रात लाखो लोकांना रोजगार मिळणे शक्य आहे. परंतु खालच्या पातळीवर निकडीची कमतरता दिसून येते. या प्रदेशात जवळपास सगळ्या वस्तू आयात केल्या जातात अगदी रेझर ब्लेड्स, मासे इथपासून पेन्सिल व अन्नधान्य, चार चाकी गाड्या ते दूरचित्रवाणी संचापर्यंत सगळे काही. फळे, भाजीपाला यांसारखा कच्चा माल व गाई-गुरेदेखील बांगलादेश व म्यानमारला निर्यात केली जातात आणि उत्पादनाचे मूल्य व टिकाऊपणा वाढवण्यासाठी एकही मोठे प्रक्रिया केंद्र तिथे आज अस्तित्वात नाही.

मानव विकास निर्देशांकाची गंभीरता हे आणखी एक भलेमोठे आव्हान आहे. भारतात आसाममध्ये माता मृत्यू दर सगळ्यात वाईट म्हणजे ३०० इतका असून, उत्तर प्रदेश, बिहार व मध्यप्रदेश यांच्यापेक्षा कितीतरी अधिक असल्याचे

अधिकृत आकडे सांगतात. ही आकडेवारी २००५-०६ या वर्षात४९० अंक इतकी नोंदवण्यात आली होती (आकडेवारी १००,००० प्रसूतींपैकी आहे), तेव्हा मूळ मुद्दा असा आहे की, जोपर्यंत ही परिस्थिती सुधारत नाही, तोपर्यंत पूर्व, पश्चिम किंवा दक्षिणेकडे जास्त लक्ष दिल्याने मूलभूत मानवी प्रतिष्ठा सुधारणे व समता, (ज्या केंद्र व राज्य शासनाच्या प्राथमिक भूमिका आहेत) ह्यात कोणतीही सुधारणा करणे शक्य होणार नाही.

आणखी एक महत्त्वाचे आव्हान यामध्ये अंतर्भूत आहे, जागतिक हवामान बदलामुळे, ह्या प्रदेशात बदलत्या हवामानाचा परिणाम येथील नागरिक भारताच्या इतर भागांमध्ये स्थलांतरित होण्यात होतो. ब्रह्मपुत्रेचे खोरे जवळपास दरवर्षी पुराने उध्वस्त होते व अलिकडच्या मोठ्या पुराने तिथले अंदाजे ३५० बंधारे कोलमडून गेले. तरीही, ईशान्य भारत किंवा उर्वरित देशातील बंधाऱ्यांची गुणकारिता वाढवण्याकरता किंवा त्याचे पर्याय शोधण्याविषयी जाहीर चर्चा क्वचितच झडल्या असतील.

'सक्रीय पूर्व /पूर्वेकडे लक्ष' ह्या हे धोरण स्तुत्य आहे, तरीही त्यातून एक मुद्दा निसटला आहे. मोठ्या आकाराची माल वाहतूक नदीतून करण्यासाठी आवश्यक जलवाहतूक धोरण आखल्याशिवाय जलवाहतूक धोरण हे अवरुद्ध होण्याची शक्यता आहे. म्हणूनच जलवाहतूक सुधारण्याचा दळणवळण मंत्रालयाचा निर्णय या भागात नवी क्रांती घडवून आणेल. शिवाय या प्रदेशातील मुख्य रस्ते व लोहमार्गाचे जाळे यावर वर्षातले तीन ते पाच महिने पुराच्या पाण्याचा विपरित परिणाम होतो. आर्थिक धोरणामध्ये भविष्य व वर्तमानातल्या मूळ मुद्द्याचा समावेश केला गेला पाहिजे - वेगळ्या शब्दात, धोरण नियोजन व अंमलबजावणीच्या सगळ्या पातळ्यांवर आपत्ती व्यवस्थापन राबवण्याची गरज आहे.

पण नदीच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या स्थानिक लोकांना याची कशी मदत होईल?मोठ्या प्रमाणावर पर्यावरणावर होणाऱ्या हालचालीमुळे पर्यावरण, सामान्य लोकांचे आयुष्य व उपजीविका यांसाठी अत्यावश्यक असणाऱ्या मासे व प्राणिजन्य गोष्टींवर कोणते परिणाम होतील?

---

***भविष्याचा विचार करता, स्थानिक समूह व राज्य यांमधील संघर्षाचे मुद्दे सोडवण्याचे आव्हान विविध पातळींवर महत्त्वाचे ठरेल. परदेशी प्रवासी व पर्यटकांसाठी हा प्रदेश निव्वळ आकर्षक बनवण्यासोबत तो व्यवसायांसाठीदेखील उपयुक्त ठरू शकेल (कोणत्याही उद्योगाला निरंतर चालणारे संप व बंद परवडत नाहीत, कारण त्यामुळे उत्पादन व नफ्यावर विपरित परिणाम होऊ शकतो).***

---

ईशान्येकडील नद्यांमध्ये मोठ्या पायाभूत सुविधांचा हस्तक्षेपांचा काय परिणाम होईल ह्याविषयी फारसे अभ्यास करण्यात आलेले नाहीत. ह्या सर्वांचा जलजीवन, या प्रदेशातल्या स्थानिक माशांच्या प्रजाती, पाण्यावर अवलंबून असलेली शेती व मासेमारी करणारा समाज ह्या वर काय परिणाम होईल?दक्षिण आशियातील शुद्ध पाण्यातील नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या सस्तन प्रजातींपैकी एक असलेल्या डॉल्फिनचे काय?,ज्यातील ४०० पेक्षाही कमी प्रजाती आता शिल्लक आहेत.

तरी अजून काही क्षेत्रांमध्ये बऱ्याच सुधारणा करता येणे सहज शक्य आहे. आग्नेय आशियाई विद्यापीठ, माध्यमे व हस्तकला संस्था तसेच सांगीतिक देवाणघेवाण, सादरीकरण व महोत्सव अशा कार्यक्रमांतून या प्रदेशातील लोकांना जवळ आणता येईल. या दुसऱ्या मार्गावरील प्रक्रियेमुळे पहिल्या सरकारी मार्गावरील संवादाच्या अधिकृत प्रक्रियेला माहिती व परिणामकारकतेची जोड मिळू शकेल. मात्र त्यासाठी सरकार, आंतरराष्ट्रीय संस्था बडे उद्योग ह्यांची साथ मिळणे आवश्यक आहे.

भविष्याचा विचार करता, स्थानिक समूह व राज्य यांमधील संघर्षाचे मुद्दे सोडवण्याचे आव्हान विविध पातळींवर महत्त्वाचे ठरेल. परदेशी प्रवासी व पर्यटकांसाठी हा प्रदेश निव्वळ आकर्षक बनवण्यासोबत तो व्यवसायांसाठीदेखील उपयुक्त ठरू शकेल (कोणत्याही उद्योगाला निरंतर चालणारे संप व बंद परवडत नाहीत, कारण त्यामुळे उत्पादन व नफ्यावर विपरित परिणाम होऊ शकतो).

असा निश्चय केल्यानेच इथल्या भारतीय तरुणांच्या भविष्याविषयी आकांक्षा निर्माण होऊ शकेल, ते शांतता, सन्मान व न्यायावर आधारित भविष्याचे स्वप्न पाहू शकतील. भौतिक पायाभूत सुविधा, व्यापार आणि 'विकास' सोबतच अंतर्गत राजकारण, सामाजिक व आर्थिक विषमता ह्यांची समाप्ती ह्यांवरच या प्रदेशातील भविष्याची अभिवृद्धी आधारलेली आहे.

■■■

*लेखक जामिया मिलिया इस्लामिया विद्यापिठाच्या 'सेंटर फॉर नॉर्थ ईस्ट स्टडीज अँन्ड पॉलिसी रिसर्च' चे संचालक आणि प्राध्यापक आहेत.*
*email: sanjoyha@gmail.com*

# ईशान्य भारतातील जलमार्ग

डॉ विश्वपती त्रिवेदी



***आपल्या देशात एकून 14, 500 किलोमीटरचे जलमार्ग असताना गेल्या वर्षीपर्यंत केवळ 4,500 किलोमीटरचे जलमार्ग राष्ट्रीय जलमार्ग म्हणून घोषित करण्यात आले होते. आता मात्र देशांतर्गत वाहतूक वाढवण्यासाठी केंद्र सरकारने आक्रमक पावले उचलली असून 106नवे जलमार्ग राष्ट्रीय जलमार्ग म्हणून घोषित केले आहेत. आता असलेल्या 5 जलमार्गासह एकूण 111 जलमार्ग आता राष्ट्रीय जलमार्ग झाले आहेत.***

भारतात जलमार्ग वापरण्याची संकल्पना नवी नाही. अगदी सम्राट अकबराच्या काळापासूनच यमुना आणि गंगा नदीच्या प्रवाहातून मनुष्य आणि मालवाहतूक करण्यासाठी जलमार्गांचा वापर होत असे. नंतर, ब्रिटीशांच्या काळात देशातील अनेक जलमार्ग विकसित करण्यात आले आणि अनेक नद्यांमधून देशांतर्गत जलवाहतूक सुरु झाली होती. मात्र स्वातंत्र्यानंतर रस्ते आणि रेल्वे वाहतुकीला प्राधान्य देण्यात आले आणि त्याचा परिणाम म्हणून जलवाहतूक कमी झाली. आपल्या देशात एकून १४, ५०० किलोमीटरचे जलमार्ग असताना गेल्या वर्षीपर्यंत केवळ ४,५०० किलोमीटरचे जलमार्ग राष्ट्रीय जलमार्ग म्हणून घोषित करण्यात आले होते. आता मात्र देशांतर्गत वाहतूक वाढवण्यासाठी केंद्र सरकारने आक्रमक पावले उचलली असून १०६नवे जलमार्ग राष्ट्रीय जलमार्ग म्हणून घोषित केले आहेत. आता असलेल्या ५ जलमार्गासह एकूण १११ जलमार्ग आता राष्ट्रीय जलमार्ग झाले आहेत. यापैकी १९ नद्या ईशान्य भारतात आहेत.

*तक्ता क्रमांक : १*

| राज्य | नद्या / कालवे संख्या | नदी आणि कालव्याचे नाव |
|---|---|---|
| अरुणाचल प्रदेश | १ | लोहित |
| आसाम | १४ | आई, बराक, बेकी, धनसोरी/ चाठे, देहिंग, दिखू, दोयांस, गंगाधर, जिंजाराम, कोपिली, लोहित, पुठीमारी, सुबांसिरी, आणि त्वांग (धालेश्वरी) |
| मेघालय | ५ | गनोल, जिंजाराम, क्यांशी, सिम्संग आणि उमन्गोत (द्वाकी) |
| मिझोराम | १ | तालवांग |
| नागालँड | १ | तीज् - तीझान्की |

ईशान्य भारतात नव्याने घोषित झालेल्या या राष्ट्रीय जलमार्गांमुळे या प्रदेशात मालवाहतूक

करण्यासाठी एक उत्तम पर्याय आणि अतिरिक्त साधन उपलब्ध होईल यात शंकाच नाही. ईशान्य भारतातील सगळे जलमार्ग विकसित करण्याची क्षमता अद्याप निर्माण व्हायची आहे. राष्ट्रीय जलमार्ग क्रमांक २ हा ब्रह्मपुत्रा नदीतून जातो. बांगलादेश सीमारेषेनजिकच्या धुब्री पासून सुरु होणारा आणि साधीया इथे संपणारा हा मार्ग ८९१ किलोमीटर लांबीचा आहे.या मार्गाची क्षमता खूप जास्त आहे. मात्र मालवाहतूक आणि प्रवासी वाहतुकीसाठी ब्रह्मपुत्रा नदीचा म्हणावा तेवढा व्यापक विकास झाला नाही. ब्रह्मपुत्रा नदीच्या उत्तर भागात पास्सीघात




येथे जलमार्गाद्वारे नियमित वाहतूक सुरु असते.मात्र ती मर्यादित स्वरूपाची आहे. केवळ निवडक आणि कमी क्षमतेच्या नौका येथे वाहतुकीसाठी उपलब्ध आहेत. या नदीतून वाहनांची वाहतूक करण्यासाठी लष्करही जलमार्गाचा वापर करत असते.

या जलमार्गाची जिथून सुरुवात होते,ती जागा, म्हणजे धुब्री बंदर हे या शतकाच्या सुरुवातीला एक प्रसिध्द बंदर म्हणून विकसित झाले होते, मात्र पुढे ते तसे वापरले गेले नाही, आणि त्याचे महत्वही कमी झाले.या भागात मासे आणि भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात पैदास होते, जी केवळ स्थानिकच नव्हे तर बांगलादेशच्या गरजा पूर्ण करण्यासही पुरेशी आहे.

**भारत बांगलादेश राज्यशिष्टाचार मार्ग :**

नियोजनकारांनी, अतिशय चांगल्या हेतूने राष्ट्रीय जलमार्ग २ आणि राष्ट्रीय जलमार्ग १ यांना( हुगळी/ गंगा) या मार्गाना भारत बांगलादेश राजशिष्टाचार मार्गाने बांगलादेशमधून जोडले आहे. मात्र सीमावाद, बांग्लादेशातून जलमार्गाने भारतात येणे, यासाठी आवश्यक ती कागदपत्रे नसणे या अडथळ्यामुळे हा जलमार्ग वाहतुकीसाठी एक सक्षम पर्याय होऊ शकला नाही. खरे तर, ईशान्य भारतातील शिधावाटप केंद्रांसाठीच्या गहू आणि तांदळाची वाहतूक या राजशिष्टाचार जलमार्गाने उत्तम आणि किफायतशीर ठरू शकली असती.त्यातून वाहतुकीचा मोठा खर्च आणि रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी टाळता आली असती. मात्र दुर्देवाने भारतीय अन्न महामंडळाने कधीही या मार्गासाठी प्रयत्न केला नाही, आणि जर कधी त्यांनी तो केलाही , तरी संपूर्ण ईशान्य भारतात अन्नधान्याचे वितरण करणारी स्वस्त जलमार्ग वाहतूक व्यवस्था उभारता आली नाही.

भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण राष्ट्रीय जलमार्ग क्रमांक २ चे नियोजन आणि पायाभूत उभारणी करत आहे, मात्र ते पूर्ण व्हायला अवकाश आहे. पांडू येथे रेल्वेमार्गाच्या लगत बांधण्यात आलेली जेट्टी वापरण्यास तयार आहे, मात्र तिथेही अद्याप म्हणावी तशी मालवाहतूक सुरु झालेली नाही. या प्राधिकरणाने धुब्री येथे रो रो म्हणजे, रोल ऑन रोल ऑफ सेवा सुरु केली आहे. मात्र पलीकडच्या हातासिंग्मारी नदीच्या किनाऱ्यावरजेट्टी उभारण्यास काही तांत्रिक अडचणी आहेत, या नदीकाठाची मोठी धूप झाली असल्याने तिथे जेट्टी उभारणे कठीण आहे.राजशिष्टाचार मार्गावरच्या वाहतुकीचा दुसरा मार्ग करीमगंज आणि आशुगंज वादग्रस्त ठरल्याने या मार्गांचाही वाहतुकीसाठी वापर होत नाही.

जलवाहतूक मंत्रालयाने ईशान्य भारतात १९ नव्या जलमार्गांची घोषणा केल्यानेकेंद्र सरकारला अंतर्गत जलवाहतुकीसाठी नद्यांचा वापर करणे आणि त्या मार्गाने मानवी आणि मालवाहतूक वाढवण्यासाठी वाव मिळणार आहे.


■■■

*लेखक नॅशनल शिपिंग बोर्डाचे अध्यक्ष असून केंद्र सरकारमध्ये त्यांनी सचिव पातळीवरील अनेक पदे भूषवली आहेत.*

email: drvtrivedi@gmail.com
chmnsb-ship@nic.in

# ईशान्य भारत: जागतिक पर्यटनासाठी अज्ञात असलेला स्वर्ग

सौरभ कुमार दीक्षित



***भारताच्या ईशान्येकडील राज्ये केवळ वनस्पतीसृष्टी आणि प्राणी यांच्याबाबतच संपन्न आहेत असे नव्हे तर ती जैव विविधतेच्या साधनसंपत्तीनेही नटलेली आहेत. उत्पन्नाची साधने आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून पर्यटन उद्योग भरभराटीला आणण्याची क्षमता या भागामध्ये आहे.विविध प्रकारच्या आर्थिक साधन संपत्तीच्या स्त्रोतांचा खजिनाच येथे दडलेला आहे.असा हा समृद्ध सांस्कृतिक आणि वांशिक वारसा लाभलेला प्रदेश पर्यटकांचे आवडीचे ठिकाण न बनले तरच नवल!***

निसर्गाचे वरदान लाभलेले ईशान्य भारत हे ठिकाण जगातील अतिशय समृद्ध असे महत्त्वाचे जैव-भौगोलिक केंद्रही मानले जाते. भारताच्या ईशान्येकडील राज्ये केवळ वनस्पतीसृष्टी आणि प्राणी यांच्याबाबतच संपन्न आहेत असे नव्हे तर ती जैव विविधतेच्या साधनसंपत्तीनेही नटलेली आहेत. उत्पन्नाची साधने आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून पर्यटन उद्योग भरभराटीला आणण्याची क्षमता या भागामध्ये आहे.विविध प्रकारच्या आर्थिक साधन संपत्तीच्या स्त्रोतांचा खजिनाच येथे दडलेला आहे.असा हा समृद्ध सांस्कृतिक आणि वांशिक वारसा लाभलेला प्रदेश पर्यटकांचे आवडीचे ठिकाण न बनले तरच नवल! ईशान्य भागामधील राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्ये जगभरातील पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत.हे सर्व कमी की काय म्हणून चहाचा आस्वाद घेणे,ग्रामीण भागात फेरफटका मारणे,गोल्फ खेळणे असे पर्यटनाचे अनेक प्रकार पर्यटकांना आकर्षित करीत आहेत.

भाषिक आणि वांशिक भेदांबरोबरच इतरही अन्य कारणांमुळे ईशान्य भागाची सात राज्यांमध्ये निर्मिती करण्यात आली.यामध्ये आसाम,अरूणाचल प्रदेश,मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम,त्रिपुरा आणि सिक्कीम यांचा समावेश आहे.अनेक बाबतीत ईशान्येकडील हा भाग उर्वरित भारतापेक्षा वेगळा आहे.या क्षेत्रात विविध जमातींचे लोक राहात असून ते शंभर प्रकारच्या भाषा आणि बोलीभाषा बोलतात.एकट्या अरुणाचल प्रदेशामध्ये ५०पेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात.या जमातींच्या लोकांचे बरमा, थायलंड आणि लाओस मधील लोकांशी जास्त साधर्म्य आढळून येते.या प्रदेशाची स्वाभाविक रचना,अचंबित करणारी असंख्य भौगोलिक वैशिष्ट्ये,वैविध्यपूर्ण वनस्पती, प्राणीसृष्टी आणि पक्षी जीवन,दुर्मीळ ऑर्किड,उडणारी फुलपाखरे,गडद रंगांनी रंगवलेले बौद्ध मठ, विहार,आव्हाने देणाऱ्या नद्या,प्राचीन परंपरांचा इतिहास आणि जीवनपद्धती, इथल्या लोकांचे सण आणि उत्सव, त्यांच्या कला! आहेना हे अदभूतरम्य आणि आश्चर्यकारक विश्व ?मग आपली सुट्टी आनंदात घालवण्यासाठी याहून चांगले ठिकाण कोणते असणार ?

पर्यटन मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०११ पासून परदेशी पर्यटक मोठ्या संख्येने या भागात येऊ लागले.वर्ष २०१२ च्या तुलनेत २०१३मध्ये या संख्येत दुपटीपेक्षा जास्त वाढ झाली. २०१२ या वर्षी ईशान्य भागाला भेट

देणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या संख्येत २०११च्या तुलनेत १२.५टक्के इतकी मोठी वाढ झाली.तर २०१२च्या तुलनेत २०१३मध्ये या संख्येत २७.५ टक्के इतकी वाढ होऊन ती१०० टक्क्यांपेक्षा जास्त झाली. वर्ष २०११ मध्ये ईशान्येकडील राज्यांना भेट देणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या ५८,९२० इतकी होती ती २०१२मध्ये ६६,३०२ इतकी झाली.२०१३ मध्ये ही संख्या ६६,३०२वरून ८४,८२० झाली तर २०१४ मध्ये हा आकडा लाखाच्या पुढे जाऊन तो १,१८,५५२ वर पोहोचला.एकट्या आसाममध्ये २०११ मध्ये १६,४०० परदेशी पर्यटकांनी भेट दिली.२०१२ मध्ये ही संख्या १७,५४३ झाली.तर २०१३मध्ये ती १७,६३८वर पोहोचली. मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार सिक्कीमला २०११ मध्ये २३,६०२ परदेशी पर्यटकांनी भेट दिली.२०१२मध्ये ही संख्या २६,४८९ इतकी वाढली तर २०१३ मध्ये ती ३१,६९८ वर पोहोचली.

या प्रदेशाचे भौगोलिक स्थान,नैसर्गिक साधनसंपत्तीची असणारी समृद्धता आणि पूर्व भागावर केंद्रित केले गेलेले लक्ष यामुळे हा विभाग देशाच्या विकासाला चालना देणारा नवा महत्त्वाचा घटक बनला आहे.ईशान्येकडील या भागात प्रचंड असा नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा दडलेला असून अजूनही तो म्हणावा तितका वापरला गेलेला नाही.मात्र सरकारच्या 'पूर्व विभाग केंद्रित धोरणा'मुळे हा विभाग आता देशाच्या विकासाचे पूर्वेकडील प्रवेशद्वार बनला आहे.पर्यटन उद्योगात नवनवीन उपक्रम राबवत असताना सीमेपलीकडे व्यापार वाढवायचा असेल तर शेजारील देशांचे सहकार्य असणे गरजेचे आहे. अनेक देशांच्या आंतरराष्ट्रीय सीमांलगत हा प्रदेश वसलेला आहे.उर्वरित भारताशी ही भूमी जोडण्यात अनेक अडथळे आहेत त्या मानाने या देशांशी व्यवहार करणे सुलभ आहे. ईशान्य भागाच्या उत्तरेला चीनची,पूर्वेला म्यानमारची, नैऋत्येला बांगला देशची आणि वायव्येला भूतानची सुमारे ४,५०० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची आंतरराष्ट्रीय सीमा आहे.ही अनुकूलता या प्रदेशाचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी खूपच लाभदायक ठरणार आहे.ईशान्य भारतामध्ये केवळ आर्थिक विकासाला चालना देण्याची नव्हे तर देशाच्या एकंदर अर्थव्यवस्थेला हातभार लावण्याची सुप्त क्षमता आहे.यामध्ये पर्यटन उद्योग सर्वात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.म्हणूनच देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पर्यटनाच्या दृष्टीने या भागात काय काय दडले आहे याची माहिती या लेखातून उलगडून दाखवण्याचा प्रयत्न मी करणार आहे.साधारणपणे पर्यटनाचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल :-

**सुंदर पर्यटन स्थळे**

देशातील अनेक महत्त्वाची पर्यटनस्थळे पूर्व भारतात आहेत.ही ठिकाणे तिथल्या स्थानिक संस्कृती,खाण्या-पिण्याच्या पद्धतीमुळे वैशिष्ट्यपूर्ण तर आहेतच पण स्वत:चे वेगळेपणही जपणारी आहेत.

गंगटोक:- सिक्कीमची राजधानी असलेले हे गाव मुख्यत:ओळखले जाते ते बौद्ध मठ आणि विहारांमुळे.पूर्व सिक्कीम जिल्ह्याचे ते मुख्यालय आहे.हे मनोहारी स्थळ ईशान्य भागातील प्रवासाचे महत्त्वाचे ठिकाण मानले जाते.

इटानगर: - २० एप्रिल,१९७४ पासून ती अरुणाचल प्रदेशची राजधानी म्हणून ओळखली जावू लागली. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले हे गाव. अजून तरी इथले निसर्गरम्य वातावरण बिघडलेले नसल्यामुळे पर्यटकांसाठी हे परिपूर्ण ठिकाण ठरावे.

तवांग:- अरुणाचल प्रदेशाच्या वायव्येला सुमारे ३०४८ मीटर म्हणजेच १०,०००फूट उंचीवर हे गाव आहे.ईशान्येकडे तिबेट, नैऋत्येला भूतान तर पश्चिमेकडील कामेंग जिल्ह्याला सेला पर्वत रांगा विभक्त करतात.सुमारे २,०८५मीटर चौरस किलोमीटरच्या सीमेवर हे ठिकाण आहे.

शिलाँग - मेघालय राज्याची ही राजधानी.जगामध्ये सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण- मॉसनराम हे इथून फक्त ५५ किलोमीटरवर आहे. स्कॉटलंडमधील डोंगराळ प्रदेशाशी आश्चर्यकारकरित्या या भागाचे असलेले साधर्म्य पाहता याला पूर्वेकडील स्कॉटलंड असे म्हटले जाते. डॉन बॉस्को संग्रहालय, फुलपाखरांचे संग्रहालय,वनस्पती उद्यान,शिलाँग शिखर,उमियाम सरोवर,वॉर्ड सरोवर यासहित पर्यटकांना आकर्षित करतील अशी अनेक सुंदर आणि ऐतिहासिक स्थळे इथे आहेत.

**परदेशी प्राणी आणि वनस्पती**

ईशान्य भारताचा हा प्रदेश भारतीय, भारतीय-मलायी,भारतीय-चीनी जैव भौगोलिक प्रदेशांमधील संक्रमण पट्टा ठरला असून बऱ्याचशा भारतीय प्राणी आणि वनस्पती यांच्यासाठी भौगोलिक प्रवेशद्वार ठरला आहे.परिणामी, हे क्षेत्र जीवशास्त्रीयदृष्ट्या समृद्ध मूल्य असलेले बनले आहे. नष्ट होण्याची भीती असलेल्या अनेक दुर्मीळ जाती इथे मोठ्या प्रमाणावर

टिकून आहेत.ईशान्य भाग हा देशातील उष्णकटिबंधातील वनांचा महत्त्वाचा भाग मानला जातो. विशेषत: उष्णकटिबंधीय पावसाळी प्रदेशात वाढणाऱ्या जाती इथे विपुल प्रमाणात आढळतात.या प्रदेशातील उष्णकटिबंधीय निम-सदाहरित आणि दमट पानगळी वृक्षांची सखल वने,या प्रदेशाला दक्षिण आणि पश्चिमेकडे उपखंडामध्ये पसरत जातात तशीच ती पूर्वेकडे दक्षिण चीनमध्ये आणि आग्नेय आशियातही वाढत राहतात.संपन्न नैसर्गिक सौंदर्य, शांतता, प्रसन्नता आणि प्राणी आणि वनस्पती यांनी नटलेला हा भाग,पर्यावरण पर्यटन विकासाला अनुकूल अशी अमूल्य साधनसंपत्ती आहे. १३ राष्ट्रीय उद्याने आणि ३० वन्यजीव अभयारण्ये हा ईशान्य भारताचा अनमोल ठेवा आणि वारसा आहे. कांचनगंगा जीवावरण आरक्षित क्षेत्र (सिक्कीम), नामदाफा राष्ट्रीय उद्यान (अरूणाचल प्रदेश), काझीरंगा आणि मानस राष्ट्रीय उद्यान (आसाम), केईबुल लामजाओ राष्ट्रीय उद्यान (मणिपूर), मरलेन राष्ट्रीय उद्यान (मिझोराम), नटांगकी राष्ट्रीय उद्यान(नागालँड) आणि नोक्रेक राष्ट्रीय उद्यान ही पर्यटकांना आकर्षित करणारी काही वन्यजीव उद्याने आहेत. पर्यटक या ठिकाणांना मोठ्या प्रमाणावर भेट देतात. सध्या राज्य सरकारे स्थानिक रहिवाशांना सेंद्रिय शेती आणि सेंद्रिय उत्पादनांचे महत्त्व पटवून देत आहेत.यामुळे सेंद्रिय शेतीला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली असून ग्रामीण पर्यटनालाही प्रोत्साहन मिळत आहे.

**पर्यटकांचे लक्ष वेधून घेणारे सांस्कृतिक जीवन**

भारताचा अज्ञात भाग असलेला ईशान्य भागातील हा स्वर्ग त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आणि पारंपरिक जीवन पद्धतीबद्दल प्रसिद्ध आहे.या भागात हिंदू, ख्रिश्चन,मुस्लिम आणि बौद्ध अशी मिश्र संस्कृती नांदत आहे.इतर धर्मांच्या तुलनेत इथे अनेक वांशिक गटांमध्ये बौद्ध संस्कृतीला जास्त महत्त्वाचे स्थान आहे.या राज्यांमधील प्रत्येक आदिवासी जमातीची स्वत:ची अशी वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे.प्रत्येक जमातीची वेगवेगळी अशी लोक नृत्ये, सण, उत्सव, खाद्य पदार्थ आणि कला आहेत. पारंपरिक नृत्य आणि लोक संगीत हा इथल्या विविध आदिवासी जमातींच्या सण आणि उत्सवांचा अविभाज्य भाग असतो.या वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळ्या जमाती वर्षभर कोणते ना कोणते सण आणि उत्सव साजरे करत असतात.उत्सवांचा हा काळ या ईशान्य भागातील अज्ञात स्वर्गातील त्या त्या जमातींची संस्कृती आणि पारंपरिक पोषाख याबद्दल जाणून घेण्याचा उत्तम कालखंड असतो.बिहू, आसामचा ब्रह्मपुत्रा महोत्सव, नागालँडचा हॉर्नबिल आणि सेक्रेन्यी उत्सव, अरुणाचल प्रदेशचा तोर्ग्या मोनॅस्ट्री उत्सव, मेघालयाचा मोनोलिथ आणि बेहेडीएनख्लाम उत्सव, मणिपूरचा चापचार कूट आणि नीनगोळ चाकौबा उत्सव आणि त्रिपुराचा खारची पूजा हे या भागातील काही महत्त्वाचे उत्सव आहेत.

***१३ राष्ट्रीय उद्याने आणि ३० वन्यजीव अभयारण्ये हा ईशान्य भारताचा अनमोल ठेवा आणि वारसा आहे. कांचनगंगा जीवावरण आरक्षित क्षेत्र (सिक्कीम), नामदाफा राष्ट्रीय उद्यान (अरूणाचल प्रदेश), काझीरंगा आणि मानस राष्ट्रीय उद्यान (आसाम), केईबुल लामजाओ राष्ट्रीय उद्यान (मणिपूर), मरलेन राष्ट्रीय उद्यान (मिझोराम), नटांगकी राष्ट्रीय उद्यान(नागालँड) आणि नोक्रेक राष्ट्रीय उद्यान ही पर्यटकांना आकर्षित करणारी काही वन्यजीव उद्याने आहेत.***

ईशान्येकडील राज्यांमध्ये संगीत आणि नृत्य महोत्सव आयोजित केले जातात.हॉर्नबिल रॉक डान्स स्पर्धा ही अशीच एक महत्त्वाची स्पर्धा मानली जाते.या महोत्सवांमधील लोक संगीत आणि आदिवासी नृत्ये अनुभवण्यासारखी असतात.या भागातील आदिवासी बांबूपासून तयार केलेली वाद्ये वाजवतात. यामध्ये तमाक नावाचा लोकसंगीतात वाजवला जाणारा ढोल, बासरी, खांब, लामबांग यांचा समावेश आहे. शिलाँगमधील डॉन बॉस्को स्वदेशी संस्कृती केंद्र,गुवाहाटीचे कामाख्य मंदिर, दक्षिण त्रिपुरा जिल्ह्यातील त्रिपुरा सुंदरी मंदिर,सिक्कीम मधील बौद्ध मठ आणि विहार, इंफाळचे श्रीकृष्ण मंदिर, कोहिमा येथील कॅथॉलिक कॅथेड्रल ही या भागातील महत्त्वाची मनोवेधक सांस्कृतिक ठिकाणे आहेत.

**ईशान्येकडील खाद्य संस्कृती**

ईशान्य भारतातील लोकांच्या खाद्य पदार्थांमधून त्यांची संस्कृती आणि जीवनपद्धती व्यक्त होते. इथे राहणाऱ्या आदिवासी लोकांच्या खाण्याच्या पारंपरिक सवयींमुळे साहजिकच देशातील इतर भागांपेक्षा इथली खाद्य संस्कृती भिन्न आहे.येथील पदार्थ तेल घातलेले किंवा मसालेदार नसतात पण तरीही ते रुचकर

लागतात.स्थानिक ठिकाणी वाढणाऱ्या सुवासिक वनस्पतींचा वापर स्वयंपाकात करणे ते अधिक पसंत करतात. पचायला हलके, सहजपणे तयार करता येणारे आणि साधेपणा ही ईशान्येकडील पदार्थांची खासियत आहे. आसामी, मणिपुरी, त्रिपुरी, नागा, अरुणाचली, सिक्कीम,मिझो आणि मेघालयी असे या भागातील खाण्याचे मुख्य चवदार प्रकार आहेत.भात, कोरडे मासे, मसालेदार मांस, स्थानिक वनस्पती आणि मोठ्या प्रमाणावर उगवणाऱ्या हिरव्या भाज्या हे या राज्यांतील लोकांचे प्रमुख अन्न असते. चिकन, मटण, बदक, कबुतर आणि कुत्रा हे इथले काही लोकप्रिय मांसाहारी पदार्थ आहेत. यासोबत तांदळाची बियरही प्रसिद्ध आहे. जडोह, मोमो,की किपू,आखोल घ ओर, बै, सॉचेअर, थुकपा तुंग- रीम्बाई आणि बांबूच्या अंकुरांचे लोणचे हे इथले काही वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ आहेत.

**पर्यटन विकासासाठी भारत सरकारचा पुढाकार**

ईशान्य भारतातील पर्यटन स्थळे जागतिक नकाशावर आणण्यासाठी भारत सरकार प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. देशामध्ये पर्यटनाच्या विकासासाठी पर्यटन मंत्रालयाने २०१४-१५ मध्ये दोन नव्या योजना जाहीर केल्या आहेत. यामध्ये एक आहे स्वदेश दर्शन. या योजनेत विशिष्ट विषय घेऊन त्याच्या एकात्मिक विकासासाठी परिक्रमा पर्यटनाचे आयोजन केले जाते. दुसऱ्या योजनेचे नाव आहे. प्रसाद. तीर्थाटन पुनरुज्जीवन आणि आध्यात्मिक विकास मोहीम असे या योजनेचे स्वरूप आहे. सुरुवातीला स्वदेश दर्शन मोहिमे अंतर्गत सागरी परिक्रमा, बौद्ध परिक्रमा, ईशान्य भारत परिक्रमा, हिमालय परिक्रमा आणि कृष्ण परिक्रमा यांचा समावेश करण्यात आला आहे.या योजनेत आणखी मरुभूमी परिक्रमा, आध्यात्मिक परिक्रमा, रामायण परिक्रमा, आदिवासी परिक्रमा, पर्यावरण परिक्रमा, वन्यजीव परिक्रमा आणि ग्रामीण परिक्रमा अशा सात परिक्रमा ठरवण्यात आल्या आहेत. तर प्रसाद योजने अंतर्गत १२ शहरांची निवड करण्यात आली आहे.आसाम मधील कामाख्यचा समावेश प्रसाद योजने अंतर्गत करण्यात आला आहे.भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या आराखड्यात १० टक्के रक्कम ईशान्य भागातील राज्यांसाठी राखून ठेवण्यात आली आहे.पर्यटन मंत्रालयातर्फे ईशान्य प्रांताला गेल्या तीन वर्षांमध्ये कशाप्रकारे निधीचे वाटप करण्यात आले ते पुढील तक्त्यात बघूया-

| वर्ष | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|
| योजनेतील तरतूद | १०५० | ९५० | ९८० |

| | | | |
|---|---|---|---|
| ईशान्य भारतासाठी १०% राखीव निधी | १०५ | ९५ | ९८ |
| मंजूर झालेली रक्कम | १४५.९३ | ११३.७२ | १४९.१६ * |
| टक्केवारी | १३.८९ | ११.९७ | १५.२२ * |

* अंदाजे (तातपुरती)

*स्रोत: पत्र सूचना कार्यालय,भारत सरकार,पर्यटन मंत्रालय*

तर अशा प्रकारे ईशान्य भागात पर्यटन व्यवसाय विकसित होण्याची चांगली क्षमता आहे. यामुळे हा विभाग केवळ आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होईल असे नव्हे तर देशाच्या यश कथेत मोलाचे योगदान देण्याची क्षमताही त्याच्यात आहे. पंतप्रधानांनादेखील ही बाब जाणवली असून त्यांनीही या ईशान्य विभागावर लक्ष केंद्रित केले आहे.मात्र या विभागाची क्षमता पूर्णपणे विकसित होण्यात अनेक अडथळे आहेत.इथे पायाभूत सुविधांचा, विपणनाचा अभाव आहे.मालाचा दर्जा कायम राखण्यातही अनेक अडचणी आहेत.प्रवास परवाना प्रक्रिया सुलभ नाही.कुशल मनुष्यबळाची वानवा आहे आणि संपूर्ण प्रदेशासाठी समान अशा व्यापक पर्यावरण धोरणाचा अभाव आहे.

■■■

*लेखक शिलॉंग येथील ईशान्य गिरी विद्यापिठातील पर्यटन आणि हॉटेल व्यवस्थापन विभागाचे प्रमुख आहेत. देशातील इतरही अनेक नामांकित विद्यापिठांमध्ये त्यांनी अध्यापन केले आहे.*
*email: saurabh5sk@yahoo.com*

# ईशान्य भारतातील जैवविविधता

डॉ. अरुप कुमार मिश्रा



***भारतीय उपखंडातील भौगोलिक रचना, सजीवसृष्टी व हवामानातील प्रचंड वैविध्य पाहता जैवविविधतेबाबत भारतीय उपखंडाला विशेष महत्त्व प्राप्त होते. भारतीय उपखंडातील उत्तरेच्या भागातील हिमच्छादित हिमालयीन पर्वतरांगा, मैदाने, दक्षिण पश्चिम सीमेवरील विस्तीर्ण समुद्रकिनारा व त्यालगतचे प्रदेश व द्वीपसमूह, उष्णकटिबंधीय पर्जन्यवने, हिरवाईने आच्छादलेली वनराई नद्या व त्यांनी वाहून आणलेल्या समृध्द गाळांपासून तयार झालेला सुपीक भूभाग अशा जवळजवळ सर्व तऱ्हेच्या वैविध्यपूर्ण प्राकृतिक समृध्दतेचे सहअस्तित्व व त्यांचे परस्परपूरक पर्यावरणीय परिणाम भारतात आढळून येतात.***

आपल्या सभोवतालच्या प्राकृतिक सृष्टीचे वर्गीकरण करताना भूगोल अभ्यासक वेगवेगळ्या देशांतील किंवा जैव-भौगोलिक-भौतिक प्रदेशांतील जैवविविधतेला प्राधान्यक्रम देतात. पृथ्वीवरील विविध खंडप्राय प्रदेशांना नैसर्गिक साधनसंपत्ती, विविधतेने नटलेले प्राणी जगत व वनसंपदा, पुष्पप्रजाती, अशा प्राकृतिक घटकांची समृध्दी लाभली आहे. यामध्ये भारतासह ब्राझील, कोलंबिया, चीन, मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, रशियन महासंघ, इंडोनेशिया, व्हेनेझुएला, अमेरिका संयुक्त महासंघ, इक्वेडोर, आणि ऑस्ट्रेलिया या देशांचा प्रमुख्याने उल्लेख करता येईल. भारतीय उपखंडातील भौगोलिक रचना, सजीवसृष्टी व हवामानातील प्रचंड वैविध्य पाहता जैवविविधतेबाबत भारतीय उपखंडाला विशेष महत्त्व प्राप्त होते. भारतीय उपखंडातील उत्तरेच्या भागातील हिमच्छादित हिमालयीन पर्वतरांगा, मैदाने, दक्षिण पश्चिम सीमेवरील विस्तीर्ण समुद्रकिनारा व त्यालगतचे प्रदेश व द्वीपसमूह, उष्णकटिबंधीय पर्जन्यवने, हिरवाईने आच्छादलेली वनराई तेथे वाढणाऱ्या वेगवेगळया वनस्पती, फुले फळे, उष्ण व वायव्येकडील वैराण वाळवंटीय प्रदेश, देशाच्या विविध भागात वाहणाऱ्या अनेक नद्या व त्यांनी वाहून आणलेल्या समृध्द गाळांपासून तयार झालेला सुपीक भूभाग, डोंगराळ प्रदेश व विस्तीण दऱ्याखोऱ्यांचे भाग अशा जवळजवळ सर्व त-हेच्या वैविध्यपूर्ण प्राकृतिक समृध्दतेचे सहअस्तित्व व त्यांचे परस्परपूरक पर्यावरणीय परिणाम भारतात आढळून येतात.




भारतीय उपखंडात जैवविविधतेच्या दृष्टीने भारतातील पूर्वोत्तर भागाला विशेष महत्व आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही येथील निसर्गसमृध्द भूभाग, वनस्पती व पुष्पलता, प्राणी सृष्टी, सुपीक मृदाप्रकार व हवामानस्तरातील वैविध्य या वैशिष्ट्यांचे विशेष कौतुक केले जाते. आसाम, अरूणाचल प्रदेश, मेघालय, मणिपूर, मिझोरम, नागालँड, त्रिपुरा, व सिक्किम या ‘सेव्हन सिस्टर्स’ नावाने

प्रसिध्द पूर्वोत्तर भारताचा प्रदेश जरी पहिल्यापासून आधुनिक विकासाच्या वहिवाटेपासून दुर्लक्षित राहिलेला असला तरी निसर्गाने मात्र या प्रदेशावर आपला वरदहस्तच ठेवला आहे, असे वाटावे अशी समृध्द नैसर्गिक साधनसंपदा या भागात सामावलेली आहे. काही मोजकी ठिकाणे सोडली तर पूर्वोत्तर राज्यांत फार मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झालेले नाही त्यामुळे रसायनांपासून आणि प्रदूषणापासून मुक्त असा निसर्गसंपन्न भूभाग, हिरवीगार वनराई, ब्रम्हपुत्रा नदीचे विस्तीर्ण खोरे, भव्य हिमालयीन पर्वतरांगांचा काही भाग व वैविध्यतेने नटलेली वनस्पती व प्राणीसृष्टी अशी या भागाची खास भौगोलिक वैशिष्टे सांगता येतील. येथील जवळजवळ ७०% भाग हा पर्वतरांगा व टेकड्यांनी व्यापलेला आहे. अरुणाचल प्रदेश हे राज्य हिमालय पर्वताच्या कुशीतच वसलेले आहे तर आसाम राज्याला ब्रह्मपुत्रा व बराक नद्याच्या खोऱ्यांसह मिकिर, कार्बी आंगलांग व कछार अशा भक्कम पर्वतरांगाची नैसर्गिक देणगी लाभली आहे. पाटकाई या पर्वताच्या रांगा नागालँण्ड व मणिपूर या दोन्ही राज्यांत पसरलेल्या आहेत. तर मिझोरम हे राज्य लुशाई नावाच्या पहाडात वसलेले आहे. तर पूर्वेला जयन्तिया, पश्चिमेला गारो आणि मध्य भागात खासी हे भव्य पहाड मेघालय राज्याची शोभा वाढवतात. त्रिपुरा राज्याच्या मैदानी भागातही अनेक डोंगराळ भाग आहेत. भारतीय उपखंड, भारत मलाया व भारत-चीन या जगातील तीन प्रमुख जैवभौगोलिक स्तरांचा सुरेख संगम पूर्वोत्तर भारतात आढळतो. तर एकूण क्षेत्रफळाच्या जवळजवळ ३०% परिसर हा ब्रम्हपुत्रा व बराक या दोन प्रमुख नद्यांच्या सुपीक प्रदेशात मोडतो. या दोनही नद्यांची खोरी येथील जैवविविधतेच्या वाढीला पोषक आहेत. उदाहरणादाखल

*खाली दिलेल्या सांख्यिकी तक्त्यावरून लक्षात येईल की भारतातल्या आठ पूर्वोत्तर राज्यांत केवळ भूपृष्ठीय प्राण्यांच्या प्रकारांत कितीतरी वैविध्य आहे.*

| राज्ये | सस्तन प्राणी | पक्षी | सरपटणारे भूचर | भूजलचर | मासे व सागरी जीव |
|---|---|---|---|---|---|
| अरूणाचल प्रदेश | २४१ | ७३८ | ७८ | ३९ | १४३ |
| आसाम | ८४१ | १९२ | १२८ | ६७ | २३२ |
| मणिपूर | ६९ | ५८६ | १९ | १४ | १४१ |
| मेघालय | १३९ | ५४० | ९४ | ३३ | १५२ |
| मिझोरम | ८४ | ५०० | ७१ | १३ | ८९ |
| नागालँड | ९२ | ४९२ | ६२ | १० | १०८ |
| सिक्किम | ९२ | ६१२ | ३१ | २१ | ६४ |
| त्रिपूरा | ५४ | ३४१ | ३२ | २० | १२९ |

*(संदर्भ स्त्रोत- विज्ञान तंत्रज्ञान व पर्यावरण परिषद, गुवाहाटी, आसाम द्वारा प्रकाशित आसाम मधील पृष्ठवंशी प्राणी- २०१५)*

**ब्रम्हपुत्रा नदीच्या खोऱ्यातील जैवविविधता:**


ब्रह्मपुत्रा ही जगातील सर्वात लांब नद्यांपैकी एक महत्वाची नदी असून या नदीला भारताच्या पूर्वोत्तर सीमाभागाची जीवनवाहिनी मानली जाते. ब्रह्मपुत्रा तिबेट देशातील हिमालयाच्या पर्वतरांगेत हिमनदीच्या स्वरूपात उगम पावते. आपल्या २९०० किमी लांबीच्या संपूर्ण प्रवासात ही नदी भारतात प्रामुख्याने पूर्वेकडील अरुणाचल प्रदेश व आसाम या राज्यां राज्यांमधून नैऋत्य दिशेने वाहत जाऊन बांग्लादेशमध्ये शिरते. तिथे तिला पद्मा व मेघना या उपनद्या येऊन मिळतात. पुढे गंगेच्या त्रिभुज प्रदेशामध्ये येऊन ब्रह्मपुत्रा शेवटी बंगालच्या उपसागराला मिळते.

आपल्या भारतातील पूर्वोत्तर राज्यांतील प्रवासात ब्रह्मपुत्रा नदीचे विस्तीर्ण असे सुपीक खोरे आसामच्या उत्तर भागात तयार झाले आहे. पूर्व आशियायी भौगोलिक प्रांताच्या पूर्वोत्तर भारतातील स्थित्यंतरणीय प्रदेशात हे खोरे वसलेले आहे. हा प्राकृतिक प्रदेश उष्ण वर्षावने, पानझडी वने, नदीकाठालगतचा विस्तीर्ण गवताळ प्रदेश, बांबूची वने, फळबागा आणि असंख्य पाणथळ जागा अशा नैसर्गिक विविधतेने संपन्न आहे. आसाममधील ब्रम्हपुत्रा खोरे उष्ण व आर्द्र हवामानाचे आहे. ब्रम्हपुत्रा नदी ही जगातील इतर नद्यांच्या

पूर्वोत्तर राज्यातील भूपृष्ठीय प्राणी:



तुलनेत सर्वाधिक गाळ वाहून आणणारी नदी आहे. त्यामुळे येथील गाळाच्या जमिनीने व्यापलेला सर्व जवळजवळ ५६ कोटी ३४ हजार चौ.किमीचा भूभाग अत्यंत सुपीक बनलेला आहे. परंतु, अतिवृष्टी, पूर, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे या सुपीक भूभागाची मोठ्या प्रमाणावर धूप होते. असे असले तरिही या भागाच्या आगळ्यावेगळ्या भूरूपकिय स्वरूपामुळे येथील संपूर्ण परिसरात विपुल जैवविविधता पहायला मिळते. सदाहरित वर्षावनांपासून समशीतोष्ण कटिबंधीय झुडुपापर्यंत वनस्पतींच्या सर्व जाती येथे आहेत. येथील बराचसा प्रदेश रेझिन उत्पादनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या साल वृक्षांच्या अरण्यांनी व्यापलेला आहे. दलदलीच्या भागात वेताची जंगले, तर




वसाहतीच्या परिसरात दुर्मिळ फळझाडे आढळतात. बांबूची वने सर्वत्रच आहेत. विविध वर्गांची झाडे, नहार, बकुळ, चाम, आंबा, अर्जुन, कदंब, अंजीर, नहार, टिक, सिलिखा, भोमोरा सोनारू, साल, सिमालिया,गमारी, अगर देवदार, साग, हालाका, होलोंग, बन्सम, अमारी, अझार, सिसू, सिमुल, वेत, कळक, बोरू, छडी, आणि अनेक औषधी वनस्पती आसाममधील विविध जंगलात मुबलक प्रमाणात आढळतात. बांबू नहार बकुळ, चाम आंबा यांसारख्या डेरेदार सदाहरित वृक्षांचे हिरवागर्द जंगल परिसर येथे पहावयास मिळतो. तर दुसरीकडे, ब्रम्हपुत्रा नदीच्या काठालगतच्या हा संपूर्णत: गवताळप्रदेश असून येथे प्रामुख्याने सवन्ना प्रकारचे उंच वाढ असणारे गवत आढळते. ब्रम्हपुत्रेच्या आसाम खोऱ्यातील विविधतेने नटलेले प्राणी जगत व वनसंपदेचे दर्शन पर्यटकांना येथील पाच प्रमुख राष्ट्रीय अभयारण्यात- काझीरंगा, मानस, दिब्रुसाईखोवा, ओरंग व नामेरी येथे पाहता येते.यापैकी काझीरंगा व मानस या दोन अभयारण्यांना युनेस्कोच्या जागतिक वन्य प्रदेशांच्या वारसा सूचीत स्थान मिळाले आहे. याशिवाय आसाम मधील पोबित्रा, गरमपानी, गिबोन, बुरसाओप्री, चक्रशिला, सोनाई-रूपाई, बोर्नोडी, लाओखोवा, जोयदिहिंग, पानीदिहिंग, इ. इतर संरक्षित वन्यक्षेत्रांतही अनेक विलक्षण प्राणी व अनोखे पक्षी आहेत. काझीरंगा अभयारण्यात एकशिंगी गेंडे, बंगाल टायगर, विविध प्रकारची हरणे, जंगली म्हशी, किंगफिशर व इतर पक्षी इ. चा निवास आहे. तर मानस भयारण्यात भारतातील अनेक दुर्मिळ व नष्ट होत चाललेल्या प्राणी व पक्ष्यांना संरक्षित करण्यात आले आहे. यामध्ये सोनेरी वानर, लांब हाताचे वानर, सांबर, भारतीय गवा, चितळ, स्लॉथ बीयर, बिबट्या मांजर, जंगल मांजर, लांडगा, हंस, होर्नबील व उष्ण व दमट हवामानाच्या प्रदेशात आढळणारे पाणपक्षी, विविध जातींचे बगळे व इतरही अनेक आकर्षक प्राणी व पक्षी मुक्त संचार करतात. मानस नदी जेथे भारत व भूटान या देशांना वेगळे करते त्या भागात आजही गंगेतील डॉल्फिन मासे पाहावयास मिळतात. तर नामेरी अभयारण्य दुर्मिळ होत चाललेल्या व जगातील शेवटच्या काही उरलेल्या पांढ-या पंखांच्या आकर्षक वूड बदकांचा कळप जतन करणारे क्षेत्र म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजले गेले आहे. गुवाहाटीतील दिपोर बील हे वन्यक्षेत्र परदेशी पक्ष्यांचे माहेरघर मानले जाते. येथे जगभरातून वास्तव्याला येणाऱ्या दुर्मिळ पक्ष्यांमध्ये रूडी शेल टक्स, व्हाईट कॅप रेडस्टार्स, फोकटेल्स, कॉर्नोरॅन्टस्, आयबिस, असे वैशिष्टपूर्ण परदेशी पक्ष्याचे थवे पाहावयास मिळतात.

आसाम राज्य पूर्वी समृध्द जंगलांनी व्यापलेले होते. येथे मोठ्या प्रमाणात इमारती लाकूड व बांबूची वने होती. परंतु, गेल्या काही वर्षात नियोजनाअभावी झालेला जंगलांचा गैरवापर व स्थानिकांची बंडखोरी यांमुळे येथील जंगलक्षेत्रावर अतिशय प्रतिकूल परिणाम दिसून आला. यावर उपाय म्हणून ९० च्या दशकात सर्वोच्च न्यायालयाकडून या प्रदेशातील वृक्षतोडीवर सरसकट बंदी घालण्यात आली. याचे परिणाम स्वरूप गेल्या दोन दशकांत येथील प्लायवूडवर आधारित अनेक उद्योग पूर्णपणे ठप्प झाले असून या भागाची अर्थव्यवस्थाही डळमळीत झाली आहे. एकेकाळी देशाच्या एकूण बांबू उत्पादनापैकी ४२ टक्के उत्पादन येथे होत असे. आज जंगलतोडीमुळे बांबूची

वनेही मोठ्या प्रमाणावर नष्ट झाली आहेत. आजही आसाम राज्याच्या लोकसंख्येची सर्वाधिक घनता या प्रदेशात आहे.

**बराक नदीच्या खोऱ्यातील जैवविविधता:**

बराक नदी आसाम, नागालँड आणि मणिपूरच्या सीमावर्ती भागातील पर्वतश्रेणीत उगम पावते. आसामच्या काचार जिल्ह्यातून प्रवास करत पुढे जाते. बराक नदीचे प्रमुख खोरे दक्षिण आसामातल्या काचार, करिमगंज, व हैलकंडी या तीन जिह्यांत आढळते. भारत-ब्रम्हदेश या पर्यावरणीय पट्ट्यात येणारे बराक नदीचे लहानसे म्हणजे जेमतेम ४० ते ५० किलोमीटर लांबी रूंदीचे खोरे जैवविविधतेच्या बाबतीत मात्र अतिशय संपन्न आहे. चेरापुंजी व मासिनराम ही दोन सर्वाधिक पर्जन्यवृष्टीचे प्रदेशही बराक खोऱ्यातच आहेत. ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्याप्रमाणेच, बराक नदीचे खोरेही मोठ्या प्रमाणात जमलेल्या सुपीक




गाळाने व्यापलेले आहे.

जैवविविधतेस अनुकूल असा हा भाग आहे. त्यामुळे या खोऱ्यात मुबलक वनस्पती व विविध प्रकारचे प्राणी आढळतात. बराक खोऱ्यात मोठ्या प्रमाणात चहाचे मळेही आहेत.

सुमारे ६९६२ चौकिमी क्षेत्रफळाच्या बराक खोऱ्यात इतस्तत: स्वतंत्रपणे विखुरलेल्या 'तीला' म्हणजेच खुज्या टेकड्यांच्या रांगांमुळे दलदली प्रदेश निर्माण झाला आहे. येथे अनेक झरे व तलाव आहे. यापैकी नदीपासून त्यार झालेले ओक्स बो तलाव किंवा यू आकारातील तलावक्षेत्र म्हणजे निसर्गाच्या कलात्मकतेचा नयनरम्य देखावाच आहे.

जिरी, मधुरा, जतिंगा, लरंग, सोनाई,



रूकनी, घागरा, धालेश्वरी व कथाकाल या बराक नदीच्या उपनद्यांनीही आसामच्या दक्षिणेकडील भागाला निसर्गसंपन्न भूभाग प्रदान केला आहे. बराक खोऱ्यातील भूभागावर विस्तीर्ण असी सदाहरित वने, समशीतोष्ण बागायती वन, समशीतोष्ण पानझडी वने व नीम सदाहरित दाट झुडपांची वने अशा. विविध प्रकारचा वनप्रदेश आहे. त्याशिवाय हिरवाईने नटलेले असंख्य चहाचे मळे विस्तृत प्रमाणातली शेताखालची सुपीक जमिन येथे आढळते. बराक खोऱ्यातील जमीन विशेष सुपीक आहे. कारण बराक नदीच्या कमी वेगामुळे गाळामध्ये वाळूचे प्रमाण कमी असते. तसेच नदीगाळाची माती थरांचे खडक झिजून झालेली असून डोंगराळ भागात ती लाल व कंकरमिश्रित असते, तर वनप्रदेशात ती कुजलेल्या पाचोळ्याने बनलेली आहे.



बराक खोऱ्यात १४ राखीव जंगले व एक-दोन अभयारण्ये आहेत. त्यापैकी





३२६.२४ चौ.किमी च्या विस्तीर्ण क्षेत्रात पसरलेले बोरैल अभयारण्य आसाम राज्यातील मोठ्या अभयारण्यांपैकी एक असून हे वन्यक्षेत्र उष्णकटिबंधीय व नीम सदाहरित जंगलांनी समृध्द आहे. वाघ, हत्ती, विविध प्रकारची वानरे, अस्वल इ. प्राणी येथील जंगलात प्रामुख्याने आढळतात. वाढती लोकसंख्या, जंगलतोड व व्यावसायिक फायद्यासाठी मानवाकडून मोठ्या प्रमाणात केली जाणारी नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट याच सर्वांचा येथील जंगलसृष्टीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. येथील जंगलात आढळणारे प्रसिध्द आशियाई हत्ती आज जवळजवळ नामशेष झाल्यातच जमा आहे तर एकेकाळी मोठ्या संख्येने वावरणाऱ्या विविध वानरजाती जसे शुभ्रमुख कपी(गिबन) हिलॉक गिबॉ




WEL-COME TO KAZIRANGA NATIONAL PARK





GOVT. OF ASSAM
WELCOME TO
HOLLONGA PAR GIBBON
WILDLIFE SANCTUARY
MELENG BEAT, AREA-20.98
MARIANI RANGE, JORHAT FOREST DIVISI



न, फायर लिफ मंकी, पिग टेल मकाकू, मास्क्ड फिनफूट( बदकाची एक जात) स्टम्प टेल्ड मकाकू आज अगदी क्वचितच आढळतील. ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यप्रमाणेच बराक खोऱ्यातही अतिवृष्टी पूर, भूकंप अशा पर्यावरणीय समस्या व नैसर्गिक आपत्ती वारंवार उद्भवतात.

**माजुली बेटावरील जैवविविधता :**

ब्रम्हपुत्रेच्या आसाम राज्यातील प्रवासात तिच्या पात्रात अनेक बेटे निर्माण झाली त्यापैकी माजुली हे सर्वात मोठे बेट म्हणून ओळखले जाते. आसाम राज्याची सांस्कृतिक राजधानी अशी माजुली बेटाची खास ओळख आहे. १६ व्या शतकापासून पूर्व आसामातल्या वैष्णव पंथाची पवित्र भूमी म्हणून मान्यता पावलेल्या या बेटाला प्राचीन ऐतिहासिक वारसाही लाभलेला आहे.

हे बेट गारो, खासी आणि जयंती या तीन टेकड्यांच्या मध्ये वसलेले आहे. चेरापुंजी म्हणजे जगातील सर्वाधिक पर्जन्यमान असणारा परिसरही माजुली बेटाजवळ आहे. खेरकुटिया सुती, सुबंनसीरी व ब्रम्हपुत्रा या तीन प्रमुख नद्यांनी वाहून आणलेल्या सुपीक गाळांमुळे माजुली




***ब्रम्हपुत्रा नदी ही जगातील इतर नद्यांच्या तुलनेत सर्वाधिक गाळ वाहून आणणारी नदी आहे. त्यामुळे येथील गाळाच्या जमिनीने व्यापलेला सर्व जवळजवळ ५६ कोटी ३४ हजार चौ.किमीचा भूभाग अत्यंत सुपीक बनलेला आहे. परंतु, अतिवृष्टी, पूर, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे या सुपीक भूभागाची मोठ्या प्रमाणावर धूप होते. असे असले तरिही या भागाच्या आगळ्यावेगळ्या भूरूपकिय स्वरूपामुळे येथील संपूर्ण परिसरात विपुल जैवविविधता पहायला मिळते.***

बेटावर लहानमोठे १५५ पाणथळ भाग तयार झाले आहेत. प्राकृतिक सौंदर्याची खाणच जणू या बेटावर आढळते. अतिवृष्टी, पाणथळ जमिन, व प्रदूषणमुक्त परिसर अशा प्राकृतिक वैशिष्ट्यांमुळे विविध प्रकारच्या वनस्पती, प्राणी व पक्ष्यांसाठी सुरक्षित व नैसर्गिकदृष्ट्या अनुकूल असे वातावरण येथे आढळते. माजुली बेट अति दुर्मिळ अशा पक्ष्यांचे हे निवासस्थान असून हिवाळ्यात अनेक वैशिष्टपूर्ण असे प्रवासी पक्षीही या बेटावर वास्तव्यास येतात. हवासील (पेलिकान), साइबेरियन




क्रेन और ग्रेटर एडजुटंट सारस, बंगाल फ्लोरिकन, पांढरे गिधाड, गरूड मासा, या स्थलांतरित व येथील मूल निवासी असलेल्या स्ट्रोक्स, पेलिकन्स, क्रेन्स, व विस्टलिंग यांसह इतर २५० वैशिष्टपूर्ण पक्ष्यांना पाहण्यासाठी जगभरातून मोठ्या प्रमाणात येणा-या निसर्गप्रेमी पर्यटकांसाठी व पक्षी निरिक्षकांसाठी व पक्षी विज्ञान अभ्यासकांसाठी माजुली बेट नंदनवनच ठरले आहे. पक्ष्यांबरोबरच बाडीस बाडीस, चाका, ओमपोक पाबो, चन्ना बरका, टोर टोर, व चिंताला यांसारख्या माशांच्या प्रजातीही येथे सापडतात. येथील स्थानिक लोकसमूदायांपैकी मिसिंग, नेपाली, देओरी, कचरी व कोच






जमातींमध्ये उद्भवणाऱ्या काही आजारांवर गुणकारी ठरतील अशा ओषधी गुणधर्म असलेल्या १५ प्रकारच्या माशांच्या प्रजाती येथे सापडल्या आहेत. आसाम राज्यातले हे विविधतेने नटलेले अनोखे बेट इतर पूर्वोत्तर राज्यांच्या तुलनेत आर्थिक सांस्कृतिक व सामाजिक दृष्ट्या स्वयंपूर्ण आहे. या बेटाची जागतिक स्तरापर्यंत स्वतंत्र ओळख प्रस्तापित झालेली आहे. वर्षभर मोठ्या संख्येने देशी व विदेशी पर्यटक माजुली बेटाला भेट देत असतात. खासकरून येथील अलेंगी चापोरी, कमलाबरी मिसींग, कमलाबरी सत्र, सुनिया चापोरी तुनिमुख या भागातील नेत्रदिपक नैसर्गिक सौंदर्य पाहण्यासाठी पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते.

ब्रम्हपुत्रा खोऱ्यातील सुपीक गाळामुळे बनलेली येथील पाणथळ जमिन तांदूळ शेतीसाठी अतिशय पोषक आहे. तांदूळ पिकाच्या १००हून अधिक वेगवेगळ्या जाती कोणत्याही रासायनिक वा कृत्रिम किटकनाशकांचा वापर न करता येथे पिकवल्या जातात. यांमध्ये विशेषकरून कुमल शाऊल, बाओधान, बोरा शाऊलया वैशिष्टपूर्ण तांदूळपीकांची शेती मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. मात्र वाढत्या लोकसंख्येच्या प्रचंड भौतिक गरजांमुळे येथील शेतजमिनीचे क्षेत्र कमी होत आहे. त्याचे परिणामस्वरूप माजुलीतील तांदूळ उत्पादन आज मोठ्या प्रमाणावर घटले आहे.

एकेकाळी १२५० चौ किमी क्षेत्रफळ असलेल्या व जगातले सर्वात मोठे नदिय बेट म्हणून ओळखले जाणाऱ्या माजुली बेटाचा परिसर दक्षिणेकडील किनारी भागात सतत येणारे पूर व अतिवृष्टी व इतर मानवनिर्मित कारणांमुळे घटत चालला आहे. सततच्या भूपातामुळे आज या बेटावर राहण्यालायक केवळ ४२५ चौ. किमी क्षेत्र उपलब्ध आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात या बेटाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

■■■

*लेखक आसाम येथील सायन्स ॲन्ड टेक्नोलॉजी इनव्हायरमेंट कॉन्सील व एनर्जी डेव्हलेपमेंट एजन्सी येथे संचालक म्हणून कार्यरत आहेत.*

*email: arupkmisra@gmail.com*

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

## अन्य काही पुस्तके

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-


## आगामी अंक

**मे २०१६**

**‘दिव्यांग (अपंग)’**

## सूचना

वाचकांना विनंती आहे की, त्यांनी योजना मासिका संबंधीत अभिप्राय योजना कार्यालय:- ‘बी’ विंग, केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ या पत्त्यावर पाठवावे. अभिप्राय सूचनांचे नेहमीच स्वागत असेल.


PUBLICATIONS DIVISION
website: publicationsdivision.nic.in
Some Prestigious Titles Now Available Online
• India 2016 (also available as eBook)
• Bharat 2016 (also available as eBook)
• Legends of Indian Silver Screen (also available as eBook)
• Abode Under The Dome
• Winged Wonders of Rashtrapati Bhavan
• Right of The Line : The President's Bodyguard
• Indra Dhanush
• The Presidential Retreats of India
• Rashtrapati Bhawan
• Belief In The Ballot (also available as eBook)
• Gandhi : Jeevan Aur Darshan (hindi)
• 1857 The Uprising
• Sardar Patel-Sachitra Jeevni(hindi) (also available as eBook)
• Sardar Patel - A Pictorial Biography (also available as eBook)
• Basohli Painting
• Kangra Painting
• Indian Women : Contemporary Essays
• Bharat Ki Ekta Ka Nirman (hindi) (also available as eBook)
• Yuva Sanyasi (hindi)
• Gazetteer of India Vol.2
• The Geet Govinda of Shri Jaydev
• Who's Who of Indian Martyrs (Vol-I)
• Who's Who of Indian Martyrs (Vol-II)
• Saga of Valour
• Some Aspects of Indian Culture
• Art & Science of Playing Tabla (also available as eBook)
• Indian Classical Dance
• Celebration of Life : Indian Folk Dance
• Nataraja
• Bengali Theatre: 200 Years (also available as eBook)
• Bihari Satsai (hindi)
• Bihari Satsai - A Commentary
• Eye In Art
• Looking Again At Indian Art
• The Life of Krishna In Indian Art
• Pahari Painting of Nala Damayanti Theme
• Ajanta Ka Vaibhav (hindi)
• Bharatiya Kala - Udhbhav Aur Vikas (hindi)
• Bharatiya Chitrakala Main Sangeet Tatva (hindi)
• South Indian Paintings
• Garhwal Chitrakala (hindi)
• A Moment In Time
• Samay, Cinema Aur Itihas (hindi)
• Indian Cinema Through The Century
• Bharatiya Cinema Ka Safarnama (hindi)
• A History of Socialism
• Lamps of India
• Bharat Ke Durg (hindi)
• Wood Carving of Gujarat
• Lawns And Gardens
• Paryavaran Sanrakshan : Chunotiyan Aur Samadhan (hindi)
eBooks
• Lokmanya Bal Gangadhar Tilak
• The Gospel of Buddha
• Introduction To Indian Music
• Sardar Vallabhbhai Patel
• Sardar Vallabhbhai Patel (Adhunik Bharat Ke Nirmata Series)
• Lauh Purush Sardar Patel
• Aise They Bapu
• Mahatama Gandhi -A Pictorial Biography
• Gandhi In Champaran
• Mahatma Gandhi And One World
Printed Books available at flipkart.com
eBooks at kobo.com

# ईशान्येकडील जमातींचा विकास

## स्थित्यंतर

एन.सी.सक्सेना



***मागील काही दशकांत या राज्यांमध्ये (शेजारी राज्यांकडून) आणि बांगलादेशमधून आर्थिक कारणाने स्थलांतरित होणाऱ्यांचे प्रमाण सतत वाढत आहे. यामुळे स्थानिक लोकांपेक्षा स्थलांतरित होणाऱ्यांकडे लोकसंख्येचा तोल कलत आहे. त्रिपुरामधील जनजातीचे प्रमाण 1951 मध्ये 56% होते ते 2001 मध्ये 30% एवढे कमी झाले आहे. अरुणाचल प्रदेशात 1951 साली जनजातीचे प्रमाण 90% होते ते 1991 मध्ये 64% इतके घटले.***

भारतातील एकूण जमातींच्या लोकसंख्येपैकी फक्त १२ टक्के लोक ईशान्य भारतातील ८ राज्यात राहातात, परंतु मध्य भारतातील सर्व राज्यात आदिवासी हे अल्पसंख्य आहेत. मात्र मिझोराम, मेघालय, नागालँन्ड या राज्यात ८०% अधिक लोक हे जनजातीचे आहेत आणि त्यामुळे त्यांच्याकडे राजकीयदृष्टया जास्त लक्ष दिले जाते. मागील काही दशकात या राज्यांमध्ये (शेजारी राज्यांकडून) आणि बांगलादेशमधून आर्थिक कारणाने स्थलांतरित होणाऱ्यांचे प्रमाण सतत वाढत आहे. यामुळे स्थानिक लोकांपेक्षा स्थलांतरित होणाऱ्यांकडे लोकसंख्येचा तोल कलत आहे. त्रिपुरामधील जनजातीचे प्रमाण १९५१ मध्ये ५६% होते ते २००१ मध्ये ३०% एवढे कमी झाले आहे. अरुणाचल प्रदेशात १९५१ साली जनजातीचे प्रमाण ९०% होते ते १९९१ मध्ये ६४% इतके घटले. बोडो ही आसाममधील पठारी प्रदेशातील बोडो जमात आता स्वायत्त परिषदेतील कितीतरी जिल्ह्यात अल्पसंख्य झाली आहे, स्थलांतरित मुस्लिमांनी त्यांची कितीतरी जमीन बळकावली आहे आणि यातून मोठ्या प्रमाणावर हिंसाचार वाढत आहे.

लोकसंख्येच्या विभाजनातून टोळीवाले आणि बिगर टोळीवाले यांच्यातील सत्ता संबंध असमान होत आहेत. (आसामातील आहोम, मणीपूरमधील मैती आणि त्रिपुरातील बंगाली) हे राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या इतरांहून वरचढ आहेत. या जातींमध्येही मोठ्या प्रमाणावर विविधता आहे. ईशान्य भारतात सर्वसाधारण २२० वांशिकगट आहेत. या प्रत्येकाची स्वत:ची वेगळी संस्कृती आहे. वांशिक परंपरा आहे आणि स्वत:ची अशी भाषा आहे. ईशान्य भारतातील सांस्कृतिक विविधतेतून या राज्यांत टोळ्यांमध्ये भांडणे होतात त्याचा परिणाम शांती आणि विकासावर होतो.

सहावी अनुसूची - १९६० सालच्या अविभाजित आसाममध्ये ज्या टोळ्या अल्पसंख्य होत्या त्यांना स्वत:चे विकासाचे स्वरुप ठरवता यावे त्यांच्या रितीरिवाजांचे आणि ज्या परंपरांमुळे त्यांची विशिष्ट अस्मिता आहे त्या परंपरांचे रक्षण करता यावे यासाठी भारतीय राज्यघटनेत सहावी अनुसूची जन्माला आली. मात्र नागालँन्ड, मिझोराम आणि मेघालय ही तीन जनजाती बहुलराज्ये निर्माण झाल्यावर सर्व संदर्भ बदलले. नागांना राज्य मिळाल्यावर या परिशिष्टाचा अंमल त्यांनी सोडून दिला. सहाव्या परिशिष्टाचा वापर मिझो लोक

मिझोराम मधील अल्पसंख्य टोळ्यांसाठी करतात. मेघालयामध्ये स्वायत्त जिल्हा परिषदा ही राजकीय संस्था अजूनही दुय्यम विधानमंडळाच्या स्वरुपात अस्त्वात आहे. ज्यांना राज्याच्या विधिमंडळापर्यंत पोचता येत नाही. त्यांना यातून तात्पुरती तहकुबी मिळते. मेघालय जेव्हा आसामचा भाग होता तेव्हा या स्वायत्त जिल्हा परिषदांना अर्थ होता. त्यांच्यामुळे टोळ्यांच्या प्रदेशाला स्वत:चे निर्णय घेणे शक्य होते आणि आसपासच्या बिगर टोळी बहुसंख्य समूहामध्ये हरवल्याची भावना येत नव्हती. आता मेघालय हे स्वतंत्र राज्य आहे यात ८५% जनजातींचे प्रभुत्त्व आहे त्यामुळे जमातींचे प्रमुख प्रश्न हे राज्याच्या सत्ता संरचनेत लक्षात घेतले जातात. त्यामुळे स्वायत्त जिल्हा परिषदांमुळे निव्वळ गोंधळ निर्माण होतो आणि काम दुप्पट वाढते.

पुन्हा सहाव्या परिशिष्टान्वये जो भाग अंतर्भूत आहे त्यात कोणत्याही परिषदेच्यापेक्षा दुय्यम अशी निवडून आलेल्या प्रतिनिधींची संख्या नाही. त्यामुळे अत्यंत सामान्य तळागाळाच्या स्तरावर निवडून आलेल्या प्रतिनिधींची कोणतीही संस्था नसल्याने दुर्गम ग्रामीण भागाच्या विकासावर विपरीत परिणाम होतो. स्वायत्त परिषदांच्या खालोखाल गावपातळीवर पारंपारिक पद्धतीने गावगाडा हाकणाऱ्या संस्था आहेत. परंतु त्यांचे कामकाज लोकशाही पद्धतीने चालत नाही तर टोळीपद्धतीने चालते आणि टोळीप्रमुख निर्णय घेतो. उदा. मेघालयातील खासी जमातीत वंशपरंपरा प्रमुख सिएम, त्यामुळे प्राथमिक स्तरावरच्या निवडून आलेल्या प्रतिनिधीमंडळाला इतर राज्यामधील ग्रामपंचायतीच्या समकक्ष करण्याची गरज आहे. मात्र यावर अजून सर्वांची सहमती झालेली नाही.

आर्थिक असमानता : जमातीतील लोक हे साधारण डोंगरदऱ्या जंगलात राहतात आणि स्वत:ची गुजराण करतात. शेतीप्रमाणेच ते विणकाम आणि लोकर असलेल्या प्राण्यांचे पालन यावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असतात. ईशान्येकडील डोंगराळ प्रदेशातील जाती मुख्यत: फिरती शेती करतात आणि त्यांचे सामाजिक आणि राजकीय आयुष्य पारंपारिक कायदे व चालीरीतींनी आखून दिले आते, मात्र आता अनेक दशकानंतर बाजाराच्या शिरकावानंतर अनेक डोंगरी जमातींनी आता स्थिर शेती करण्यास सुरुवात केली आहे. आणि सर्व जमातीच्या मालकीची कल्पना मागे पडून आता वैयक्तिक मालकीची कल्पना मूळ धरु लागली आहे. यामुळे आता आर्थिक असमानता निर्माण झाली आहे. स्थानिक लोकांचे बाहेरच्यांपासून रक्षण होण्यासाठी कायदे आहेत परंतु स्थानिकांतील वर्गकलह या कायद्यांमुळे थांबवता येणार नाही. आज डोंगरी जमातीतील काहींकडे दशलक्षाहून जास्त मालमत्ता आहे तर काहींकडे मात्र लागवड करण्यासाठी १ एकरसुद्धा शेती नाही. जमातीतील नवश्रीमंत लोक हे स्वत:च्या हितासाठी मोठाच कोलाहल करतात मात्र आपल्या जमातीतील गरीबांचा फायदा करण्याचे काही त्यांच्या मनात येत नाही, ही गमतीची गोष्ट आहे. त्यांना केवळ स्वत:चे हित जपायचे असते आणि शोषित गरीबांना नियंत्रणात ठेवायचे असते. व्यापारी पिके, भाजीपाला आणि इतर पिके यांच्याबाबत सातत्याने प्रचार करण्यामुळे गाव, महामार्ग यांच्याजवळील जमिनीचे भाव वाढण्यामुळे बऱ्याचदा जमातीच्या मालकीच्या जमिनींचे आता खाजगीकरण होत आहे. मात्र नव्याने उदयाला येणाऱ्या जमातीतील अभिजन वर्गाकडे उद्योजकेतेचे कसब नाही. त्यामुळे बरीचशी गुंतवणूक ही स्थावर मालमत्तेत आहे.

***स्थानिक लोकांचे बाहेरच्यांपासून रक्षण होण्यासाठी कायदे आहेत परंतु स्थानिकांतील वर्गकलह या कायद्यांमुळे थांबवता येणार नाही. आज डोंगरी जमातीतील काहींकडे दशलक्षाहून जास्त मालमत्ता आहे तर काहींकडे मात्र लागवड करण्यासाठी १ एकरसुद्धा शेती नाही. जमातीतील नवश्रीमंत लोक हे स्वत:च्या हितासाठी मोठाच कोलाहल करतात मात्र आपल्या जमातीतील गरीबांचा फायदा करण्याचे काही त्यांच्या मनात येत नाही, ही गमतीची गोष्ट आहे.***

स्त्रियांवरील प्रतिकूल परिणाम: खाजगीकरणामुळे त्रियांची कुचंबणा जास्त आहे. उदाहरणार्थ नागा जमातीच्या परंपरांप्रमाणे त्रियांना जमिन मालमत्ता वा वंशपरंपरेने येणाऱ्या मिळकतीचे हक्क नाहीत. जर त्यांनी जमिनीवर ताबा मिळवण्याचे प्रयत्न केले तर त्यांच्यावर चेटकीण असा शिक्का मारला जातो आणि जमातीला त्या हानी पोचवत आहेत असा त्यांच्यावर आरोप केला जातो. अशा स्त्रियांचा मानसिक आणि शारीरिक छळ केला जातो.

काहींना जिंवतपणे गाडल्याचे वा जाळल्याचेही पुरावे आहेत. अशा त्रियांच्या पाठलागाच्या घटना आजपर्यंत गोवालपारा, बोंगाईगाव कोक्राजार नलबारी आणि धुबरी जिल्हयात आढळून आल्या आहेत. साधनसंपत्तीवर नियंत्रण, जमातीतील सत्ता संपादन, व्यक्तीशी वैयक्तिक शत्रुता आणि अंधश्रध्दांचा पगडा यापैकी काही घटकांमुळे या घटना घडतात.

जमिनीच्या नोंदी नसणे: नागालँड अरूणाचल प्रदेश मिझोराम मेघालय मणिपूरचा पर्वतीय प्रदेश आणि आसाममधील काही जमातींच्या प्रदेशात जमिनीची कोणतीही लिखित नोंदणी नाही, किंवा जमिनीवरील महसूल भरला जात नाही. आधीच कुळांमध्ये पडणारी भर आणि स्वत:च्या मालकीची जमीन नसणे, जमिनीची मालकी मूठभरांच्या हातात एकवटणे आणि फिरत्या शेतीतले अपुरे उत्पन्न यात भरीस भर म्हणून जमिनीच्या कोणत्याही नोंदी नसल्यामुळे गरीब जमिन धारणेच्या काळाबाबत अधिक असुरक्षित आहेत. जमिन लागवड सर्वांना खुली या पध्दतीने होते. शिवाय अभिजन वर्ग सरकारचा निधी सर्व स्वत:कडे वळवतो यामुळे या राज्यातील विषमता आणि गरीबी यात भरच पडत आहे. सामाईक जमिनीला बंदिस्त करून अभिजनवर्ग जमिनीचे खाजगीकरण करत असला तरी ते पाऊल स्वागतार्ह नाही, कारण त्याचा जमिनीच्या संबंधात विपरीत परिणाम होत आहे. संलग्न सामाजिक नातेसंबंध आणि वाढणारी आर्थिक विषमता हे आता एकाच वेळा अस्तित्वात आहेत.

***निधीच्या चांगल्या वापरासाठी अधिकाऱ्यांना वेळेत निधी मिळणे ही एक प्राथमिकता आहे तर त्याचवेळेस अनेक निर्णय एकाच वेळेस घ्यावे लागणे ही दुसरी गरज आहे. पदे मंजूर करावी लागतात. सामग्री मिळवावी लागते आणि त्याची वाहतूक करावी लागते. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा निधी मणीपूर, नागालँड यांना कमी मिळतो कारण जिल्हा स्तरावरील माहिती चांगल्या आंतरजाल सुविधांअभावी देता येत नाही.***

**निधी खर्च करण्याची अपुरी क्षमता:** स्वायत्त जिल्हा परिषदांना संविधानिक दर्जा असला आणि वेगवेगळया विषयांच्या बाबतीत स्वायतत्ता असली तरी त्यांच्यामागे निधीची पुरेशी जुळवाजुळव नसते.

यामुळे सोपवलेल्या विषयांची जबाबदारी पूर्ण करण्यास या परिषदा अपुऱ्या ठरत आहेत आणि त्यामुळे असंतोष वाढत आहे, या समस्यांचे निराकरण करण्यासाठी केंद्रशासन या परिषदांना विशेष योजनेतून तात्कालिक अनुदान देत आहे किंवा त्या त्या राज्यांसाठी विशिष्ट निधीची व्यवस्था करत आहे. मात्र या परिषदांची खर्च करण्याची क्षमता कमी असल्यामुळे त्याचप्रमाणे राज्यसरकारचीही खर्च करण्याची क्षमता कमी असल्यामुळे एकंदर खर्चाचे प्रमाण कमीच राहाते. उदाहरणार्थ, केंद्रसरकारच्या अर्थसंकल्पात ईशान्येकडील राज्यांच्या विकासासाठी १० टक्के तरतूद आहे आणि खर्च न झालेली रक्कम कधीही रद्दबातल न होणाऱ्या निधीत टाकली जाते. मात्र वस्तुत: एकंदर उपलब्ध असलेल्या निधीतून फारच थोडया रकमेचा खर्च होतो. राज्य प्रशासकीय मंत्रालयांकडे योग्य प्रस्ताव पाठवत नाहीत किंवा योग्य रितीने खर्च करत नाहीत. यामुळे परिणाम काही फारसे समाधानकारक नाहीत.

त्याचप्रमाणे वेगवेगळया तांत्रिक बाबींची पूर्ती (जमिनीचा ताबा पर्यावरणीय बाबींची पूर्तता इ.) पूर्ण न झाल्याने अनेक बाहय प्रकल्प रखडले आहेत. त्यामुळे परत त्या प्रकल्पांवर अत्यंत कमी खर्च होत आहे. निधी वापरल्याची प्रमाणपत्रे सादर न करणे, प्रकल्पाचे तपशील वा कृती आराखडा सादर न करणे. राज्य स्तरीय निधी मंजूरी समितीच्या बैठका वेळेत आयोजित न करणे इ. सर्वसाधारण कारणांमुळे निधी वितरण अत्यंत कमी होते. निधीच्या चांगल्या वापरासाठी अधिकाऱ्यांना वेळेत निधी मिळणे ही एक प्राथमिकता आहे तर त्याचवेळेस अनेक निर्णय एकाच वेळेस घ्यावे लागणे ही दुसरी गरज आहे. पदे मंजूर करावी लागतात. सामग्री मिळवावी लागते आणि त्याची वाहतूक करावी लागते. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा निधी मणीपूर, नागालँड यांना कमी मिळतो कारण जिल्हा स्तरावरील माहिती चांगल्या आंतरजाल सुविधांअभावी देता येत नाही.

***सशक्त नियोजन विभाग जमातींच्या आकांक्षांचा आणि गरजांना लक्षात घेतो आणि राज्याच्या दीर्घ मुदतीच्या विकासाच्या धोरणांना आणि प्राथमिक गरजांना लक्षात घेऊन त्या ढोबळ आकृतिबंधात वार्षिक आणि पंचवार्षिक योजना आखतो. नियमित आढावा घेतो आणि नियोजन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा पुनर्विचार करतो आणि आवश्यकता वाटल्यास कार्यक्रमात समाविष्ट बाबी आणि संसाधनाचे वितरण यात बदल करून कार्यक्रमाची ध्येय धोरणे जास्तीत जास्त अंमलात येईल हे बघतो.***

नियोजन विभागाला चालना देणे. राज्य सरकारचे नियोजन विभाग समर्थ असतील तर असे विलंब टाळता येतात आणि कामे त्वरेने पार पाडता येतात. राज्य सरकारचे नियोजन विभाग बाहय मदतीसाठी चांगले प्रस्ताव करण्याच्या बाबतीत किंवा भारत सरकारकडून निधी मिळवण्याच्या बाबतीत कमकुवत आहेत हे

एक कटू सत्य आहे. त्यामुळे बाहय मदत वा केद्रांकडून मिळणाऱ्या साहाय्याला ते मुकतात.

सशक्त नियोजन विभाग जमातींच्या आकांक्षांचा आणि गरजांना लक्षात घेतो आणि राज्याच्या दीर्घ मुदतीच्या विकासाच्या धोरणांना आणि प्राथमिक गरजांना लक्षात घेऊन त्या ढोबळ आकृतिबंधात वार्षिक आणि पंचवार्षिक योजना आखतो. नियमित आढावा घेतो आणि नियोजन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा पुनर्विचार करतो आणि आवश्यकता वाटल्यास कार्यक्रमात समाविष्ट बाबी आणि संसाधनाचे वितरण यात बदल करून कार्यक्रमाची ध्येय धोरणे जास्तीत जास्त अंमलात येईल हे बघतो.

इतर सर्वंकष मुद्दे: प्रतिडोई अत्यंत कमी उत्पन्न, खाजगी गुंतवणूकीची वानवा, अत्यंत कमी भांडवल निर्मिती, अपुऱ्या पायाभूत सुविधा, भौगोलिकदृष्टया बाजूला पडलेले प्रदेश दळणवळणाचे पेच हे सर्व मुद्दे केवळ जमातींच्या प्रदेशांनाच नाही तर सिक्कीम वगळता सर्व ईशान्य प्रदेशाला लागू आहेत. रस्ते रेल्वे वा हवाई कोणत्याही मार्गाने हे प्रदेश जोडलेले नाहीत. हा या प्रदेशांचा प्रमुख अडचणीचा मुद्दा आहे. वीज हा पण एक मर्यादा आणणारा मुद्दा आहे. छोटे जलविद्युत प्रकल्प आणि इतर पुनर्नवीकरण योग्य ऊर्जा स्रोत या शक्यतांना या प्रदेशात अजमावून बघण्याची गरज आहे. स्वत:चे कर संकलन आणि आंतरिक संसाधने या विभागाची अत्यंत अपुरी आहेत आणि त्यामुळे केंद्राकडून राज्य सरकारकडे होणाऱ्या सत्तेच्या हस्तांतरणावर ते पूर्णत: अवलंबून आहेत. जमातीतील स्थानिक अभिजन जमिनीत गुंतवणूक करण्याला प्राधान्य देतात आणि जोखीम असलेल्या नवीन साहसांपासून दूर राहतात.

भारत सरकारची गुंतवणूक वाढवण्याबरोबरच राज्याने सुशासन आणि निर्णयाची अंमलबजावणी यात आमूलाग्र सुधार केला पाहिजे. गट क आणि ड सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या मोठी आहे. ईशान्येकडील राज्यांचे योजनाबाहय खर्च मोठे आहेत आणि राज्यांतर्गत महसूल कमी आहे. त्यामुळे केंद्राने जरी उदारतेने हस्तांतरण केले तरी राज्यांकडे

***या राज्यांनी परिणामांवर लक्ष ठेवले पाहिजे आणि सरकारी कर्मचाऱ्यांना परिणामाप्रती जबाबदार धरले पाहिजे. बरेचदा सरकारी कर्मचारी फुगवून माहिती सादर करतात आणि स्वत:चे दोष झाकतात व सहीसलामत सुटतात. राज्यसरकारांच्या माहितीनुसार ईशान्येकडील राज्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण १ टक्क्याहून कमी आहे तर युनिसेफने केलेल्या सर्वेक्षणानुसार मणीपूरमध्ये हे प्रमाण ३.५ टक्के आहे तर मेघालय आणि त्रिपुरात हे प्रमाण १६ टक्के आहे.***

योजनांवर खर्च करण्यास फार थोडा निधी शिल्लक राहातो. उदाहरणार्थ आसामची योजनांतर्गत तरतूद २०१४-१५ साठी प्रतिडोई ५७७५ होती तर त्याच्याप्रमाणेच गरीब लोकसंख्येच्या छत्तीसगडकडे मात्र ही तरतूद १२८०७ होती.

याशिवाय या राज्यांनी परिणामांवर लक्ष ठेवले पाहिजे आणि सरकारी कर्मचाऱ्यांना परिणामाप्रती जबाबदार धरले पाहिजे. बरेचदा सरकारी कर्मचारी फुगवून माहिती सादर करतात आणि स्वत:चे दोष झाकतात व सहीसलामत सुटतात. राज्यसरकारांच्या माहितीनुसार ईशान्येकडील राज्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण १ टक्क्याहून कमी आहे तर युनिसेफने केलेल्या सर्वेक्षणानुसार मणीपूरमध्ये हे प्रमाण ३.५ टक्के आहे तर मेघालय आणि त्रिपुरात हे प्रमाण १६ टक्के आहे. म्हणजेच या दोन वेगवेगळया आकडेवारी संचांची मेळजुळणी आवश्यक आहे. कामकाजात सुधारणेची गरज आहे. त्यायोगे प्रत्यक्ष कार्यक्षेत्रातील माहिती सत्य, विश्वसनीय आणि निर्धारित माहितीशी जुळणारी अशी होईल.

भारत देशाचा विकासाचा दर आणि ईशान्य भारतातील जमातींचा जो प्रदेश आहे त्याच्या विकासाचा दर यातील दरी वाढते आहे. तो फरक कमी, किंवा नष्ट करण्यासाठी शासन आणि योजनांची अंमलबजावणी यात मोठया प्रमाणावर सुधारणांची गरज आहे. केवळ मोठया प्रमाणावर आर्थिक पुरवठा एवढयाने भागणार नाही. आर्थिक संसाधनांची चणचण हा आता मुख्यत्वेकरून अडचणीचा मुद्दा नाही तर उपलब्ध संसाधनांचा परिणामकारक वापर करण्याची ईशान्येकडील संस्था आणि व्यक्तींची कमी क्षमता ही मर्यादा विकासाला बाधा आणते आहे. राज्य सरकारचे सर्व विभाग आणि प्रतिनिधी संस्था यांच्या भक्कम बांधणीसाठी आवाहन, नागर समाज आणि राज्यशासन यांच्यातील फलदायी संगतीला उत्तेजन, स्थानिक स्वयंशासनसंस्थांचे बळकटीकरण हे याबाबतीत विशेष महत्वाचे ठरते.

■■■

*लेखक पूर्वाश्रमीचा नियोजन आयोग तसेच अल्पसंख्याक आयोग आणि ग्रामीण विकास मंत्रालयाचे माजी सचिव आहेत.*
*email: naresh.saxena@gmail.com*

## किंमत स्थिरीकरण निधी

किंमत स्थिरीकरण निधी हा जेव्हा उत्पादनांच्या किंमती प्रमाणाच्या बाहेर कोसळतात तेव्हा उत्पादकांना आर्थिक दिलासा देण्यासाठी असतो. त्यामुळे उत्पादकांना वस्तूंच्या किंमती कमी असताना आर्थिक दिलासा मिळतो व त्यांचे हित जपले जाते. उत्पादकांना शाश्वत, दीर्घ मुदतीचा दिलासा मिळत असतो कारण जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतींवर जेव्हा लक्ष ठेवले जाते तेव्हा उत्पादकांचे हितही पाहावे लागते. त्यावेळी या निधीचा फायदा होतो. सुप्रशासनात काहीवेळा वस्तूंच्या किंमती फार वाढू लागल्या तर सरकारला हस्तक्षेप करावा लागतो, अशावेळी ग्राहक व उत्पादक यांचे हित जपणे ही कसरत असते. अशावेळी किंमत स्थिरीकरण निधी उपयोगाचा ठरतो. आंतरराष्ट्रीय व देशी पातळीवर चहा, कॉफी, रबर, तंबाखू या वस्तूंच्या किंमती गेल्या काही वर्षात कमी होत आहेत व त्या क्षेत्रातील उत्पादकांना फटका बसत आहे. त्यामुळे व्यापार खात्याने किंमत स्थिरीकरण निधी जून २००२ मध्ये आर्थिक कामकाज मंत्रालयाच्या तत्वत मंजुरीनंतर स्थापन केला. त्यानंतर फेब्रुवारी २००३ मध्ये त्याला अंतिम मंजुरी मिळाली. किंमत स्थिरीकरण निधी योजना एप्रिल २००३ मध्ये सुरू झाली. या योजनेत सहभागाचे तत्व वापरले जाते. सरकार व उत्पादक या निधीसाठी पैसे भरत असतात अर्थात हे पैसे उत्पादन स्थिती सुरळित असणे, उत्पादन भरपूर असणे किंवा पिकांची हानी होणे या घटकांच्या अधीन राहून भरले जातात. सर्व काही सुरळित असलेल्या वर्षात सरकारने ५०० रूपये तर उत्पादकांनी प्रत्येकी ५०० रूपये भरायचे असतात पण ते पैसे काढून घेण्यास परवानगी नसते.

बरकतीच्या वर्षात उत्पादक प्रत्येकी एक हजार रूपये भरतात व निधी काढण्याची परवानगी नसते पण जर उत्पादन वाया गेले किंवा चांगले आले नाही तर सरकार प्रत्येक उत्पादकामागे १००० रूपये भरते तर उत्पादक एक हजार रूपये काढू शकतात. प्रत्येक उत्पादकाचे किंमत स्थिरीकरण निधी बचत खाते असते. अवघे पाचशे रूपये भरून या योजनेत छोटे उत्पादकही सहभागी होऊ शकतात.


## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. वर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी) ₹ ९०/-
२. तिलक का मुकदमा (हिंदी) ₹ ३३५/-
३. राजभाषा (हिंदी) ₹ १००/-

१. एक देश एक हृदय (हिंदी)
२. उपभोक्ता संरक्षण (हिंदी)
३. पर्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान


## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.

# सिक्किम : देशातील पहिले सेंद्रीय शेती राज्य

शशी मिश्रा



***मानवाने आपली जीवनशैली निसर्गापासून दूर नेऊन रासायनिक आणि कृत्रीम उत्पादनांना वाईट परिणांमाची पर्वा न करता स्विकारले आहे. या दुरगामी घातक जीवनशैलीला विशेषतः कृषी उत्पादनांच्या पध्दतीला पूर्वोत्तर भागातीलच सिक्किम या राज्याने मात्र दूर लोटले आहे. ध्येयाधारीत कालबध्द कार्यक्रम राबवून येथे संपूर्ण राज्यात शेती ही जैविक अर्थात सेंद्रीय पध्दतीनेच केली जात आहे. यातून त्यांनी संपूर्ण जगासमोर मानवी आरोग्यसंपन्न शेतीचे मार्गदर्शक उदाहरणच निर्माण केले आहे.***

उत्तर-पूर्व भाग अर्थात ईशान्य भारत म्हटले की, डोळयासमोर येते ती नैसर्गिक सधनता. उंचच उंच झाडे आणि या झाडांची नजरेतही सामावणार नाही अशी वने. त्याच वेळी दुसरीकडे मोठ-मोठे पर्वत आणि त्याच्या बहुतेक भागावर अच्छादलेली बर्फाची चादर हे मनोहरी चित्र डोळयांसमोर उभे राहते. आज निसर्गाची संपन्नता मानसाने फक्त पाहण्यापुरती आणि वर्णनापुरतीच जपलीय. मानवाने आपली जीवनशैली निसर्गापासून दूर नेऊन रासायनिक आणि कृत्रीम उत्पादनांना वाईट परिणांमाची पर्वा न करता स्विकारले आहे. या दुरगामी घातक जीवनशैलीला विषेत: कृषी उत्पादनांच्या पध्दतीला ईशान्य भागातीलच सिक्किम या राज्याने मात्र दूर लोटले आहे. ध्येयाधारीत कालबध्द कार्यक्रम राबवून येथे संपूर्ण राज्यात शेती ही जैविक अर्थात सेंद्रीय पध्दतीनेच केली जात आहे. यातून त्यांनी संपूर्ण जगासमोर मानवी आरोग्यसंपन्न शेतीचे मार्गदर्शक उदाहरणच निर्माण केले आहे. केंद्र सरकारने सिक्किमच्या या सेंद्रीय शेतीच्या यशस्वी अंमलबजावणीची तत्परतेने दखल घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ९ डिसेंबर २०१५ मध्ये देशातील पहीले सेंद्रिय शेती राज्य म्हणून सिक्किमची घोषणा केली. सिक्किमने सेंद्रीय शेतीचे धेय्य साध्य करण्यापर्यंत प्रवास कसा केला याची आपण आता माहीती घेऊ या.

जग सध्या औद्योगिकरण आणि आधुनिकरणाच्या प्रवाहात आहे. सुरवातीला चांगले वाटणाऱ्या या औद्योगीकीकरण आणि आधुनिकरणाचे तोटे आता जगाला दिसू लागले आहेत. शेतीमध्ये उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा आणि त्या अनुशंगाने इतर प्रयोगांचा अतिरेक झाला आहे. याचा दुष्परीणाम जमीनीबरोबरच मनुष्याच्या शरिरावर देखील झाला आहे. यातुन वाचायचे कसे या प्रश्नाचे उत्तर शोधताना सेंद्रीय शेतीचा शाश्वत आणि सुलभ पर्याय समोर आला. रासायनिक खताचा वापर न करता संपुर्णपणे जैविक खतांचा वापर करुन केलेली शेती म्हणजे सेंद्रीय शेती होय. जैविक खत म्हणजे पालापाचोळा, गायीचे शेण, यासह नैसर्गिक बाबी आणि गांडुळ यांचा वापर करुन तयार केलेले खत होय. अशाच जैविक खतांचा वापर करुन अर्थात सेंद्रीय शेती पध्दतीतुन सिक्किमची माती आज सोनं पिकवतेय. सिक्कीम पूर्वोत्तर राज्यांपैकीच एक आहे. सिक्किमसह अरुणाचल प्रदेश, मेघालय,

नागालँड, मिझोराम, मणीपुर, आसाम, त्रिपुरा या सर्व राज्यांचा भारताच्या ईशान्य भागात समावेश होतो. हा भाग नैसर्गिक संपन्नतेचा आहे. भारताच्या इतर भागाच्या तुलनेत या राज्यांमध्ये सर्वांत जास्त पाऊस पडतो. म्हणून इकडे सर्वत्र हिरवळ आणि घनदाट जंगले पसरलेली आहे. यामध्ये गेंडा, हत्ती, वाघ पाणघोडा, डॉल्फीन, अशा प्रकारचे जंगली प्राणी आणि जलचर आहेत. विविध जातींचे पक्षी देखील इथे आढळतात. ब्रम्हपुत्रा आणि बरक या नदयांनी ईशान्य भारतातील स्थानिक लोकांना जीवन जगण्याचे साधन उपलब्ध करुन दिले आहे.

मासेमारी आणि शेती हा तेथील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. औद्योगिकरणापासून हा भाग दूर आहे. याला कारण आहे येथील टेकडया आणि उंच पर्वातांचा भाग. सिक्कीमची स्थिती देखील अशीच आहे. हिमालय पर्वत रागांच्या प्रदेशात हा भाग येता. कांचनगंगा हा या राज्यातील सर्वात मोठा पर्वत आहे. राज्याचा एकतृतीयांश भाग जंगलांनी व्यापलेला आहे. उर्वरित भाग जमिनीचा आहे परंतु त्यामध्ये देखील बहुतेक सरळ टेकड्याच आहेत. दळणवळणाची सुविधा कमी असल्याने या भागात उद्योग आलेलेच नाहीत. भौगोलिक स्थिती अनुकूल नसताना देखील सिक्किम हे देशातले पहीले सेंद्रीय शेतीचे राज्य बनले आहे. ९ डिसेंबर २०१५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गँगटोक येथील भव्य कार्यक्रमात ही घोषणा केली. देशासह संपूर्ण जगाला आदर्शवत असलेल्या या क्रांतीकारी वाटचालीला त्यांनी शुभेच्छा देखील दिल्या आहेत. सेंद्रीय शेतीबरोबरच सिक्कीममधील शाश्वत विकास आणि वाढणारे पर्यावरण पर्यटन यांची देखील पंतप्रधानांनी प्रशंसा केली आहे. रासायनिक खतांचा वापर पूर्ण बंद, जैविकच खते वापरणे आणि सेंद्रीय शेतीचे उद्दिष्ट साध्य करणे हा सिक्किमचा प्रवास सहज सोपा झालेला नाही. दूरदृष्टी आणि निटनेटके तेवढेच ठाम नियोजन यातुन हे साध्य झाले. यशाच्या शिखराचा पाया घातला गेला २००३ मध्ये. त्यावेळी सिक्किमचे मुख्यमंत्री श्री. पवन चॉम्बली हे होते. त्यांनी आपल्या दूरदृष्टीने सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले. चॉम्बली यांनी सिक्किम सेंद्रिय शेती समिती सुरू केली. त्यातुन पुढील ७ वर्षे ही योजना टप्प्या-टप्प्याने व्याप्ती वाढवत संपूर्ण राज्यात राबविण्यात आली. रासायनिक खतांचा वापर न करता संपूर्ण सेंद्रिय खतांचा वापर करण्यात आला. स्वयंसेवी संघटना, पंचायत, शेतकरी संघ यांच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीबद्दल जागरुकता अभियान राबविण्यात आले. पायाभूत सुविधा वाढवून निर्धारपूर्वक सेंद्रिय शेती हा अजेंडा बनविण्यात आला. प्रथम यामध्ये ५ प्रकारची उत्पादने घेण्यात आली. त्यामध्ये गहू, आले, हळद, वेलची, फुलझाडे यांचा समावेश होता. नंतर मात्र संपूर्ण सेंद्रिय शेती हेच उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. बाकीच्या वेगवेगळया पिकांनाही सेंद्रिय शेतीचा भाग बनविण्यात आले. ७५,००० हेक्टर जमिनीवर सेंद्रीय पध्दतीने लागवड करण्यात आली. आता सिक्किमध्ये ९९ टक्के सेंद्रीय शेतीची उत्पादने आहेत.

***राज्याचा एकतृतीयांश भाग जंगलांनी व्यापलेला आहे. उर्वरित भाग जमिनीचा आहे परंतु त्यामध्ये देखील बहुतेक सरळ टेकड्याच आहेत. दळणवळणाची सुविधा कमी असल्याने या भागात उद्योग आलेलेच नाहीत. भौगोलिक स्थिती अनुकूल नसताना देखील सिक्किम हे देशातले पहीले सेंद्रीय शेतीचे राज्य बनले आहे. ९ डिसेंबर २०१५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गँगटोक येथील भव्य कार्यक्रमात ही घोषणा केली. देशासह संपूर्ण जगाला आदर्शवत असलेल्या या क्रांतीकारी वाटचालीला त्यांनी शुभेच्छा देखील दिल्या आहेत. सेंद्रीय शेतीबरोबरच सिक्कीममधील शाश्वत विकास आणि वाढणारे पर्यावरण पर्यटन यांची देखील पंतप्रधानांनी प्रशंसा केली आहे.***

सिक्किमची भौगालिक स्थिती सेंद्रीय शेतीला प्रोत्साहान देणारीच आहे. वनसंपत्ती सेंद्रीय खतांसाठी पूरक आहे. सिक्किममध्ये तिस्ता नदी आहे. तिला सिक्किमची जीवनवाहीनी असेच म्हणतात. गरम मसाल्यासाठी उच्च दर्जाची वेलची सिक्किमध्ये उत्पादित होते. तांदुळ हे सिक्किम मध्ये मुख्य पिक आहे. रेशीम, चहापत्ती, सफरचंद, संत्री आदींचे देखील येथे उत्पादन घेतले जाते. येथे उद्योग कमी आहेतच परंतू ते देखील मुख्यत: मद्यनिर्मिती आणि चर्मोद्योग आहेत. उद्योग कमी असल्याने येथील नैसिर्गिक दृश्य अतिशय विलोभनिय आहे. यामुळे निसर्ग पर्यटनासाठी येथे येणाऱ्याची संख्या वाढतीच आहे. साहसिक पर्यटनासाठी देखील सिक्किम प्रसिध्द आहे. निसर्गाच्या कुशीतील या राज्याने सेंद्रीय शेतीचे महत्व लवकरच जाणले. एवढ्यावरच न थांबता त्यासाठी प्रयत्न केले. आता त्या

पध्दतीने उत्पादने घेत असताना त्यासाठी बाजारपेठ देखील खुली करुन दिली जात आहे. परिजात नावाची स्वयंसेवी संस्था यासाठी कार्यरत आहे. सिक्किमच्या बाजार पेठांमध्ये सेंद्रीय शेतीपासून तयार करण्यात आलेल्या पालेभाज्या, धान्य, कडधान्य, मिरची, लोणचे, इ. कृषी उत्पादने उपलब्ध आहेत. यामध्ये

---

***वनसंपत्ती सेंद्रीय खतांसाठी पूरक आहे. सिक्किममध्ये तिस्ता नदी आहे. तिला सिक्किमची जीवनवाहीनी असेच म्हणतात. गरम मसाल्यासाठी उच्च दर्जाची वेलची सिक्किमध्ये उत्पादित होते. तांदुळ हे सिक्किम मध्ये मुख्य पिक आहे. रेशीम, चहापत्ती, सफरचंद, संत्री आदींचे देखील येथे उत्पादन घेतले जाते. येथे उद्योग कमी आहेतच परंतू ते देखील मुख्यत: मद्यनिर्मिती आणि चर्मोद्योग आहेत. उद्योग कमी असल्याने येथील नैसिर्गिक दृष्य अतिशय विलोभनिय आहे. यामुळे निसर्ग पर्यटनासाठी येथे येणाऱ्यांची संख्या वाढतीच आहे. साहसिक पर्यटनासाठी देखील सिक्किम प्रसिध्द आहे.***

---

रासायनिक खतांचा उपयोग केला जात नाही. यामुळे ती आरोग्यासाठी अतिशय चांगली आहेत. रासायनिक शेतीतील उत्पादनांचे अनेक दुष्परीणाम आहेत. रासायानिक शेतीमध्ये नत्र खते जमिनीत दिल्यावर त्यांचे नायट्रोजनमध्ये रुपांतर होते. यामुळे त्या जमिनीमध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांचे जलद उत्पादन होते. या पिकांमुळे मानवाच्या लिव्हरवर परिणाम होण्याचा धोका असतो. तसेच मानवाच्या रक्तातील हिमोग्लोबिन बननण्याची क्रिया बिघडते. शेतीमध्ये रसायनांच्या वापरामुळे फुलपाखरे, पक्षी, मधमाशा यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. रसायनिक खतांनी आपल्या अन्नामधील आवश्यक सुक्ष्म घटकांची संख्या कमी करुन धोकादायक घटकांचे प्रमाण वाढविले आहे. यामुळे आता यापासून बचावासाठी सेंद्रीय शेती हाच सक्षम पर्याय राहीला आहे. सेंद्रीय शेतीमध्ये पिकांची लागवड करताना तसेच त्यांच्या वाढीसाठी कोणतीही रसायनिक खते, घातक औषधे वापरली जात नाहीत. यामुळे या शेतीतमधील उत्पादने सर्व दृष्टीने पौष्टीक, सुरक्षित आणि आरोग्यवर्धक असतात. निर्सग आणि मानव हितावह असलेल्या सेंद्रीय शेतीसाठी मेहनत मात्र जास्त असते. यामुळे सेंद्रीय शेती सर्वसामान्य माणसाला न परवडणारी आहे असा एक सुर निघत आहे. मात्र यामधून मिळणारे उत्पन्न देखील तुलनात्मक जास्त आणि दर्जेदार असते हे देखील लक्षात घेतले पाहीजे. या शेतीतील उत्पादनांसाठी खुप मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. उत्तर अमेरिका आणि युरोपसारख्या देशांमध्ये खाण्याचे तेल फक्त सेंद्रीय शेतीमधीलच आयात केले जाते. अनेक देश देखील सेंद्रीय उत्पादनांना प्राधान्याने स्विकारतात हे देखील लक्षात घेतले पाहीजे. सेंद्रीय शेतीमधील जैविक खत पालापाचोळा, गायीचे शेण यांचा उपयोग करून, गांडुळांचा वापर करुन ६० दिवसांत तयार केले जाते. निसर्गातीलच वस्तुंचा जमिनीचा दर्जा सुधारण्यासाठी वापर केला जातो. यातुन निसर्गाचा समतोल देखील राखला जातो. सिक्किममध्ये तर सेंद्रिय शेती उत्पादनांची व्यापारी बाजारपेठांमध्ये मागणी जास्त आणि पुरवठा कमी अशी स्थिती आहे. शेतकरी येथील सेंद्रिय शेतीचे जास्तीत जास्त उत्पन्न निर्यात करतात आणि उरलेले धान्य भारतीय बाजारपेठेत विकतात.

सेंद्रिय शेती पर्यावरण आणि वातावरण मानवासाठी पोषक बनवते. निसर्गाचे सौंदर्य वाढविते. पुर्वोत्तर राज्यांमध्ये हिमालयाचे प्रदुषण थांबविते. याचा फायदा पर्यटनाला देखील होतो आहे. सिक्किममधील वाढते पर्यटन याचे उदाहरण आहे. सेंद्रिय शेती ही मानवी अन्नाशी जोडलेली आहे. यामुळेच सेंद्रिय शेती हा विषय महाविद्यालय आणि विश्वविद्यापिठामध्ये शिकविणे आवश्यक झाले आहे. सेंद्रिय शेतीला आणखी प्रयत्नपूर्वक जमिनीशी आणि खाद्य पदार्थांशी जोडले पाहिजे. सिक्किमचे सरकार मनापासून सेंद्रिय शेतीला महत्व देत आहे. खऱ्या अर्थाने सेंद्रीय शेतीच्या शाश्वत विकासामध्ये सिक्किमचे यश ही पहिली पायरी आहे. त्याला पुढे नेण्यासाठी बाजारपेठा वाढविण्याची आणि खूप मोठ्या आव्हानांना सामोरे जाण्याची गरज आहे.

■■■

*लेखिका मुंबईतील घाटकोपर (पश्चिम) येथील आर जे महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख आहेत.*
*email: sash2mash@yahoo.co.in*

## आपणास माहीत आहे का?

# डेस्टिनेशन नॉर्थ ईस्ट

डेस्टिनेशन नॉर्थ ईस्ट कार्यक्रम ईशान्य विकास मंत्रालय आणि सांस्कृतिक मंत्रालयातर्फे नवी दिल्ली येथे १२ ते १४ फेब्रुवारी २०१६ या दरम्यान प्रथमच आयोजित करण्यात आला होता. ईशान्य प्रदेश विकास खात्याचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार), पंतप्रधान कार्यालय, कर्मचारी, सार्वजनिक गाऱ्हाणी, पेन्शन, अणुउर्जा राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह आणि गृह राज्यमंत्री किरेन रिजीजू यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन करण्यात आले.

तीन दिवस चाललेल्या या महामेळाव्याचा मुख्य उद्देश ईशान्य प्रदेशाला वारशाने लाभलेल्या आर्थिक,सामाजिक आणि सांस्कृतिक शक्तीचे राष्ट्रीय स्तरावर प्रदर्शन घडवणे हा होता. तरुण व्यावसायिक आणि 'स्टार्ट अप' प्रकल्पांसाठी असे कार्यक्रम प्रमुख स्थळ म्हणून प्रेरणा देणारे ठरणार असल्याने मुंबई व बंगळुरू येथेही अशाच प्रकारचे कार्यक्रम येत्या महिन्यांत आयोजित करण्यात येतील. विविध केंद्रीय मंत्रालयेही ईशान्येतील आपले उपक्रम त्यात दाखवू शकतील.

उद्‌घाटनानंतर ईशान्य प्रदेशाच्या विकासाकरता घेतलेल्या पुढाकारांवर चर्चासत्र पार पडले. ईशान्येतील पर्यटनाचा समग्र विकास- न शोधलेल्याचा शोध, आयटी आणि 'आयटीईज'साठी ईशान्येतील संधी यावर ती होती. दुसऱ्या दिवशी ईशान्येतील उपजीविकेची व्याप्ती वाढवणे, समावेशक वाढीसाठी सूक्ष्म वित्तपुरवठा, ईशान्येत 'स्टार्ट अप्स'साठी संधी आणि आव्हाने, हातमाग-फॅब्रिक्स-तयार कपडे अशी मूल्य साखळी वाढवणे, ईशान्येत गरजांवर आधारित कौशल्य विकास आणि व्यावसायिकतेला प्रोत्साहन आणि ईशान्येतील हस्तकला वस्तुंना प्रमुख ब्रँड म्हणून देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थापित करणे यावर तज्ज्ञांची चर्चा झाली.

तिसऱ्या दिवशी ईशान्येतील लोकसंगीत व लोकनृत्य, बिहू नृत्य, मिश्र लोकनृत्य आणि रिव्हर्स ट्रजेडी बँडने केलेले ईशान्येतील लोकप्रिय रॉक डान्स असे विविध सांस्कृतिक सादरीकरण झाले. त्याचबरोबर फोक फ्युजन आणि क्रॉसओव्हर म्युझिक, एनआयएफटीचा फॅशन शो, ईशान्येतील समृद्ध संस्कृती आणि लोकनृत्यांचे दर्शन घडवण्यासाठी शालेय मुलांच्या प्रश्नमंजुषा, नृत्य (वैयक्तिक व सांघिक) आणि गायन (हिंदुस्थानी, इंडियन पॉप, वेस्टर्न पॉप आणि शास्त्रीय) अशा विविध स्पर्धा पार पडल्या. या उत्सवात पर्यटन, कृषी, खाद्यपदार्थ प्रक्रिया, कौशल्य विकास व व्यवसाय, आयटी, हातमाग आणि हस्तकला, उपजीविका, सूक्ष्म वित्त आणि 'स्टार्ट अप' या क्षेत्रांवर व्यापारी परिषदाही पार पडल्या.

या कार्यक्रमांशिवाय, या उत्सवात ईशान्येतील प्रत्येक राज्याचे विणलेले कपडे, पारंपरिक वेश, कलाकुसर, फर्निचर, बांबू पेंटिंग्ज तसेच घरगुती खाद्यपदार्थ व स्थानिक पदार्थांची मजा लुटण्यासाठी पॅव्हिलियन आणि स्टॉल्स होते.

(संकलन : वाटिका चंद्रा, उपसंपादक)
(E-mail: vchandra.iis2014@gmail.com)

# दरवळ आसामी चहाचा

सुदीप्तो कर



***आपल्याला कुठलाही चहा चालत नाही त्यासाठी विशिष्ट कंपनीचा, ब्रँडचा चहा आपल्याला लागतो. चहाच्या टपरीवरचा चहा हा जरी पावसाळ्यात व थंडीत जास्त हवासा वाटत असला तरी त्यात आसामच्या अस्सल चहाची जादू नसते. चहा हा वनस्पतींच्या पानांचा असतो हे तर खरे पण तो कसा उत्पादित केला जातो त्याच्या खुबी काय असतात हे फार महत्वाचे आहे. तुमच्या रूचीकलिका त्यामुळे उद्दीपित न होतील तरच नवल इतका त्याचा स्वाद वेगळा असतो.त्यासाठी तो आनंद अनुभवायलाही हवा. चहाचे मूळ व कूळ शोधायला हवे असे आता तुम्हालाही वाटू लागले असेल.***

सकाळी उठल्यानंतर रोजच आपले चहावाचून पान हलत नाही. चहा नसता तर...ही कल्पना करून बघा. तुम्हाला चहावाचून दिवसच सुरू झाल्यासारखे वाटणार नाही. पण हा चहाचा कप जो रोज सकाळी तुमच्या पुढ्यात येतो तो कुठून येतो त्याच्या स्वादाची वैशिष्ट्ये काय असतात त्याचा सुगंध कसा मनाचा ताबा घेतो याची माहिती जाणून घेण्यास तुम्हाला आवडेल होय ना.. आपल्याला कुठलाही चहा चालत नाही त्यासाठी विशिष्ट कंपनीचा, ब्रँडचा चहा आपल्याला लागतो. चहाच्या टपरीवरचा चहा हा जरी पावसाळ्यात व थंडीत जास्त हवासा वाटत असला तरी त्यात आसामच्या अस्सल चहाची जादू नसते. चहा हा वनस्पतींच्या पानांचा असतो हे तर खरे पण तो कसा उत्पादित केला जातो त्याच्या खुबी काय असतात हे फार महत्वाचे आहे. तुमच्या रूचीकलिका त्यामुळे उद्दीपित न होतील तरच नवल इतका त्याचा स्वाद वेगळा असतो.त्यासाठी तो आनंद अनुभवायलाही हवा. चहाचे मूळ व कूळ शोधायला हवे असे आता तुम्हालाही वाटू लागले असेल.भारतात चहाचे वेगवेगळे प्रकार आहेत पण चहाची पावडर खरेदी करताना तुम्हाला जर पुरेसे ज्ञान असेल तर त्याचा चांगला उपयोग होईल. जर तुमची उत्कंठा आता आणखीच वाढली असेल तर चहावरचा हा लेख नक्की तुमच्यासाठी आहे असे समजा. तर आता चहाबाबत चर्चा करू या.आसामचा चहा भारतातच नव्हे तर जगात प्रसिद्ध आहे. भारतातील बहुतांश प्रत्येक घरात रोज सकाळी चहानेच सुरूवात होते. आसाम चहाची ही न्यारी दुनिया आता जाणून घेऊ या. आसाम हे राज्य एकशिंगी गेंडा, तेल कारखाने यासाठी प्रसिद्ध तर आहेच पण आसाम म्हणजे चहा असे समीकरण रूढ आहे. जपानी भाषेत एक वचन आहे 'ओचा नो नाका नो ओचा' म्हणजे चहांचा चहा किंवा चहाचा महाराजा असा त्याचा अर्थ. ते विशेषण आसाम चहाला लागू पडते. चहांचा महाराजा असेच त्याला म्हणता येईल कारण त्याचा स्वाद व सुगंध वेगळाच असतो.

**आसाम चहाचा इतिहास**

आसाम चहाचे श्रेय ब्रिटिशांना द्यावे लागेल कारण चहाचे उत्पादन सुरूवातीला चिनी चहाच्या प्रजातीचा वापर करून घेण्याचा प्रयत्न वॉरेन हास्टिंग यांच्या काळात १७७४ मध्ये झाला. पण चिनी चहाची लागवड यशस्वी झाली नाही. त्यानंतर रॉबर्ट ब्रुस यांनी आसाममधील ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात चहाच्या वनस्पतीची नवी प्रजाती शोधली. तोच आसामचा खरा चहा. स्वदेशी व भारतीय. १९३८ मध्ये आसाम चहाच्या बारा प्रजाती शोधल्या गेल्या लंडनच्या लिलावात या प्रजातींच्या

चहाचा लिलाव झाला.

आसाम हा जगातील सर्वाधिक चहा लागवडीचे प्रदेश आहे.कमी उंचीवर, कमी चिकट जमिनीत, पुरेशा पावसात व विशिष्ट हवामानात चहाचे उत्पादन होते. चहाच्या अस्सल प्रजाती आसाममध्ये वाढतात. त्याला भौगोलिक ओळखही दिली आहे. आसामचा जुना चहा म्हणजे कॅमलिया सायनेनसेस व्हार या वनस्पतीपासून बनतो. आसामिका व इतर प्रजाती या ब्रह्मपुत्रेच्या व आसामच्या खोऱ्यात सापडतात, तो ईशान्य भारताचा भाग आहे. आसाममधील कृषी उत्पादनात चहाचे उत्पादन महत्वाचे आहे. आसाममध्ये चहा ब्रह्मपुत्रा व बराक खोरे येथे उत्पादित होतो. तिनसुकिया, दिब्रुगड, शिबसागर, जोरहाट, गोलघाट, नागाव सोनितपूर या जिल्ह्यात चहाचे मळे आहेत आसाममध्ये भारतातील उत्पादनापैकी ५१ टक्के चहाचे उत्पादन होते. जगाच्या चहा उत्पादनापैकी एक षष्ठांश उत्पादन आसाममध्ये होते. १९७० मध्ये गुवाहाटी येथे चहा लिलाव केंद्र सुरू झाले त्याचा हेतू चहाचे विपणन योग्य प्रकारे व्हावे हा होता. जगातील सीटीसी चहा लिलावाचे हे मोठे केंद्र असून जगातील चहापैकी दुसऱ्या क्रमांकाचे चहा लिलाव केंद्र आहे. आता तेथे दरवर्षी ५५० कोटी रूपयांच्या १५ कोटी किलो चहाचा लिलाव होतो. आसाम चहाची निर्यातही मोठ्या प्रमाणात केली जाते, ती मुख्यत्वे युरोप व मध्यपूर्वेकडील देशात होते. पाकिस्तान, इजिप्त, जपान व इस्रायल या देशातही आसामचा चहा निर्यात होतो.भारतातील चहाचे निम्मे उत्पादन आसामात होते. बराक खोरे व उंच भागातील आसामी प्रदेशात चहाचे सर्वाधिक मळे आहेत.

**आसाम चहा म्हणजे काय?**

आसाम चहा हा जगातील सर्वोत्तम चहा मानला जातो त्याचा वास व चव वेगळीच आहे. आसाम चहा कॅमेलिया आसामिका या वनस्पतीपासून बनतो. आसाम चहात कलिका जास्त दिसतात त्या सोनेरी रंगाच्या असतात, त्या प्रक्रिया केल्यानंतर तशा दिसतात. आसामचा सर्वोत्तम चहा हा हाताने खुडलेल्या पानापासून तयार होतो. काहीवेळा त्यासाठी वुलन ब्लँकेट वापरली जातात व त्यात सोनेरी रंगाच्या कलिका वेगळ्या केल्या जातात. चहा जितका गडद तितका त्याचा दर्जा चांगला मानला जातो. आसाम चहा गर्द हिरवा-काळा तसेच गडद-कडक असतो त्यात टॅनिन हे अँटीआक्सिडंट असते त्यामुळे चव आल्हाददायक बनते.

***सुरूवातीला चिनी चहाच्या प्रजातीचा वापर करून घेण्याचा प्रयत्न वॉरेन हास्टिंग यांच्या काळात १७७४ मध्ये झाला. पण चिनी चहाची लागवड यशस्वी झाली नाही.त्यानंतर रॉबर्ट ब्रुस यांनी आसाममधील ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात चहाच्या वनस्पतीची नवी प्रजाती शोधली. तोच आसामचा खरा चहा. स्वदेशी व भारतीय. १९३८ मध्ये आसाम चहाच्या बारा प्रजाती शोधल्या गेल्या लंडनच्या लिलावात या प्रजातींच्या चहाचा लिलाव झाला.***

**आसाम चहाचा वेगळेपणा**

आसाम चहा हा कडक व वेगळा सुंगध असलेला आहे,त्याचा रंग तांब्यासारखा लाल असतो त्याची चव मनाला भावणारी असते. आसाम चहा सकाळी उत्तमच पण दुपारीही त्याचे सेवन केले जाते. पहिला चहा हा ब्रिटीश काळात ब्रेकफास्टसाठी वापरला जात होता आजही आपण तो सकाळी सेवन करतो.

चहाच्या उत्पादनावर हवामानाचा परिणाम होतो का ?

आसाममधील हवामान हे चहाच्या लागवडीस अनुकूल आहे. तेथील माती वेगळ्या प्रकारची आहे, हिवाळ्याचे लहान टप्पे व आर्द्रतायुक्त उन्हाळा तसेत भरपूर पाऊस चहाच्या पिकाला पोषक आहे. त्यामुळे आसामच्या चहाचा दर्जा चांगला आहे. भारतात ९० कोटी टन चहाचे उत्पादन होते व त्यातील ६० कोटी टन चहा आसाममधील उत्पादित असतो. चहाचे दोन हंगाम असतात एक मार्च व एप्रिलच्या सुरूवातीला भरात असतो तर दुसरा सप्टेंबरमध्ये असतो. दुसरा हंगाम हा जास्त चांगला असतो त्यात उत्पादित चहाला वेगळी चव असते , त्यामुळे दुसरा हंगाम जास्त चांगला मानला जातो तो पहिल्या हंगामातील चहापेक्षा जास्त किंमतीने विकला जातो. आसाम चहाच्या पानांचा रंग गर्द हिरवा व चमकदार असतो.

**आसामचा चहा व दार्जिलिंगचा चहा यातील फरक**

- आसामचा चहा हा सखल भागात उगवलेल्या वनस्पतीपासून बनतो तर दार्जिलिंगचा चहा जास्त उंचावरील वनस्पतीपासून बनतो.
- आसाम चहाचा हंगाम हा दार्जिलिंग चहापेक्षा जास्त प्रदीर्घ असतो.
- आसाम चहाची पाने गर्द हिरवी व दार्जिलिंग चहापेक्षा चमकदार असतात.
- दार्जिलिंग चहा भारतातील चहा उत्पादनात फार कमी प्रमाणात आहे तर जास्तीत जास्त चहा हा आसामचाच असतो.
- दार्जिलिंग चहाचा दर्जा, चव, सुगंध हा जास्त उच्च प्रतीचा असतो.
- दार्जिलिंग चहा हा आसाम चहापेक्षा महाग असतो.

चाय पियो मस्त जियो हे खरे पण चहा खरोखर आरोग्याला हितकारक असतो का असा प्रश्न पडण साहजिक आहे. चहाबाबत सांगायचे तर त्याचे फायदे सांगितल्याशिवाय उपयोगाचे नाही. आपण नेहमी चहाचे आरोग्यविषयक फायदे

आहेत एवढे एकून असतो पण त्याचा उपयोग ताण तणाव कमी करण्यासाठी व इतर आजारातही होत असतो.महत्वाच्या वैज्ञानिक नियतकालिकात त्याची माहिती वेळोवेळी आलेली आहे. चहा हा एलडीएल म्हणजे लो डेन्सिटी लिपोप्रोटीन म्हणजे वाईट कोलेस्टेरॉल कमी करतो व त्यात अँटी ऑक्सिडंट असल्याने एलडीएल कोलेस्टेरॉलचे धमन्यांमध्ये ऑक्सिडीकरण थांबवले जाते.

चहा सेवन हे प्लाझ्मा अँटीऑक्सिडंटचे प्रमाण वाढवते व त्यामुळे ऑक्सिजनचा हानिकारक प्रकार बाहेर टाकला जातो. हृदय विकारात रक्ताची गुठळी होणे हे मोठे कारण असते पण चहातील विशिष्ट घटकाने रक्ताची गुठळी होण्याचे टळते. सेरम लिपिड प्रोफाईल सुधारते व त्यामुळे हृदय विकाराचा धोका कमी होतो. उच्च रक्तदाबातही चहाने फायदा होतो. उच्च रक्तदाबाने हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते. मूत्रपिंडातून अँजिओटेन्शन कनव्हर्टिंग एनझायम स्त्रवत असते त्यामुळे रक्तदाब वाढत जातो. चहाने हा घटक नैसर्गिक पद्धतीने मारला जातो. टाइप २ मधुमेहामुळेही हृदयविकार बळावतो. इन्शुलिनला प्रतिरोध होत असलेल्या टाइप २ मधुमेहात प्रकृती ढासळते व आतापर्यंतच्या प्रयोगानुसार चहामुळे इन्शुलिन संवेदनशीलता वाढते. मधुमेहापासून सुद्धा शरीराचे चहामुळे संरक्षण होते कारण त्यात स्टार्चचे विघटन साखरेत होण्याचे प्रमाण कमी होते. चालू शतकातील घातक प्रकार म्हणजे लठ्ठपणा वाढत आहे, लोकांमध्ये शरीराचे वजन वाढते आहे त्यामुळे जगात हृदयविकाराने अनेक लोक मरण पावतात. आतापर्यंतच्या अभ्यासानुसार पॉलिफेनॉलिक घटक चहात असतात व ते चरबीच्या संप्रेरकांना काबूत ठेवतात त्याला अँटी ओबेसोजेनिक इफेक्ट असे म्हणतात यात थर्मो जेनिसिसमुळे उष्मांक म्हणजे कॅलरीज जाळल्या जातात व मेद कमी होतो.

***चहा सेवन हे प्लाझ्मा अँटीऑक्सिडंटचे प्रमाण वाढवते व त्यामुळे ऑक्सिजनचा हानिकारक प्रकार बाहेर टाकला जातो. हृदय विकारात रक्ताची गुठळी होणे हे मोठे कारण असते पण चहातील विशिष्ट घटकाने रक्ताची गुठळी होण्याचे टळते. सेरम लिपिड प्रोफाईल सुधारते व त्यामुळे हृदय विकाराचा धोका कमी होतो. उच्च रक्तदाबातही चहाने फायदा होतो. मधुमेहापासून सुद्धा शरीराचे चहामुळे संरक्षण होते कारण त्यात स्टार्चचे विघटन साखरेत होण्याचे प्रमाण कमी होते.***

■■■

*लेखक हे ईशान्य भारतातील माजी पत्रकार व भारतीय माहिती सेवेतील विद्यमान अधिकारी आहेत*
*email: sudikar1000@gmail.com*

स्पर्धा परीक्षा पुस्तकांसंदर्भात परिपूर्ण मार्गदर्शन करू शकणारा कदम परिवार

सूट २०% ते ५०%


सर्व स्पर्धा परीक्षांची सर्व प्रकाशनांची इंग्रजी, हिंदी व मराठी माध्यमातील पुस्तके उपलब्ध–
एमपीएससी, युपीएससी, जिल्हा निवड समित्या यांच्या परीक्षा; पोलीस उपनिरीक्षक, तुरुंग अधिकारी, कॉन्स्टेबल, तलाठी, ग्रामसेवक, कृषिसेवक, शिक्षणसेवक, लिपिक आदी परीक्षांच्या भरती परीक्षेची पुस्तके रेल्वे, बँका, कॅट, सेट-नेट, सीईटी, टोफेल आदी परीक्षांची पुस्तके तद्वतच एनसीइआरटी, एनबीटी यांची पुस्तके व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या नोट्स् उपलब्ध

के'सागर यांच्या पुस्तकांची संपूर्ण सिरीज उपलब्ध

कदम हाऊस ऑफ बुक्स
दुकान क्र. ४, अभ्युदय बिल्डिंग,
ठाणे पूर्व रेल्वे स्टेशनजवळ,
मंगला हायस्कूल जवळ, कोळीवाडा रोड,
ठाणे (पूर्व) ४०० ६०३.
९८९२६४९०२१/९८२१३८५६५९

# ईशान्य भारतातील कृषी व्यवस्था

निरेंद्र देव



***कृषी हा पूर्वोत्तर राज्यामधील जीवनाधार आहे. म्हणूनच येथील कृषी क्षेत्राचा 'पोषक' अशा दृष्टीकोनातून गांभीर्याने विचार केला पाहिजे. हा विचार अतिदुर्गम अशा या क्षेत्राला निसर्गनिर्मित तसेच मानवनिर्मित प्रकांडापासून दूर ठेवण्यासाठी पोषक ठरु शकेल. खरेतर कृषी व्यवसाय हा येथील आठ राज्यांमध्ये विकासाची महत्वाची भूमिका निभावत आहे. ही राज्ये आहेत अरुणाचल प्रदेश, आसाम, सिक्कीम, मणिपूर, मिझोराम, मेघालय, नागालँड आणि त्रिपुरा.***

'मी तुम्हाला इतरांपेक्षा वेगळे असे काही दाखवत आहे. प्रभात समयी तुमच्या सावल्या प्रगतीच्या मार्गदर्शक ठरत आहेत किंवा सायंकाळी तुमच्या सावल्या तुम्हाला झाकोळून टाकत आहेत.'

प्रसिध्द कवी टी.एस. एलियेट यांनी शब्दबध्द केलेले काव्य वेगळ्या संदर्भातील आहे खरे, पण पूर्वोत्तर राज्यांमधील व्यवस्थेचा खरा चेहरा समोर आणण्यासाठी मात्र या ओळी पुरेपूर लागू पडतात. या अतिदूर आणि दुर्गम विभागात पारंपारिक पध्दतीने केलेल्या कृषी व्यवस्थेवरच उपजीविका चालते. टी.एस. एलियेट यांच्या या ओळी, गेल्या दशकभरात झालेल्या बदल शब्दबध्द करतात.

कृषी हा पूर्वोत्तर राज्यामधील जीवनाधार आहे. म्हणूनच येथील कृषी क्षेत्राचा 'पोषक' अशा दृष्टीकोनातून गांभीर्याने विचार केला पाहिजे. हा विचार अतिदुर्गम अशा या क्षेत्राला निसर्गनिर्मित तसेच मानवनिर्मित प्रकांडापासून दूर ठेवण्यासाठी पोषक ठरु शकेल. खरेतर कृषी व्यवसाय हा येथील आठ राज्यांमध्ये विकासाची महत्वाची भूमिका निभावत आहे. ही राज्ये आहेत अरुणाचल प्रदेश, आसाम, सिक्कीम, मणिपूर, मिझोराम, मेघालय, नागालँड आणि त्रिपुरा. या आठही राज्यांमधील सारीच आर्थिक क्षेत्रे जीवनमान उंचावण्यासाठी व्यापून गेली आहेत. कृषी क्षेत्र याबाबतीत आघाडीवर आहे.

ईशान्येकडील प्रदेश हे विविध वंशाच्या लोकांनी वसलेला प्रदेश आहे. सिक्कीमसह येथील आठही राज्यांमध्ये त्यांची स्वतची अशी संस्कृती आहे. त्यांच्या कृषी पध्दतीही वेगवेगळ्या आहेत. आपण सारे भारतीय आपल्याला विविधांगी आणि बहुरंगी अशी संस्कृती लाभलेली आहे. ही आपली शक्ती आहे.

अशा या प्रदेशांमध्ये एक समान अशा कृषी पध्दतीच्या अवलंबनाचा विचार करणे चुकीचे ठरेल. प्रत्येक समुदाय किंवा समाज त्या त्या समाजामध्ये अंगीभूत असलेल्या क्षमतांचा गुणांचा वापर करुन उपलब्ध असलेल्या नैसर्गिक स्त्रोतांचा उपयोग करुन सिंचनाच्या उणीवांवर मात करण्याचा प्रयत्न करतोच.

प्रत्येक जमातीची तसेच वंशाची त्यांची पारंपारिक शेती तसेच जलसंवर्धनाची पध्दती आहे. सामान्यत: ही भूमी परंपरागत जलसंवर्धनाची जननी मानली जाते.

या प्रदेशांमध्ये अवलंबलेल्या पध्दती अनेक आहेत, जसे की आसाम मधील डोंगस, मेघालयामधील बांबू द्वारे सुक्ष्म सिंचन, अरुणाचल प्रदेशामधील

खोऱ्यांमध्ये वापरली जाणारी भातशेती आणि मत्स्यसंवर्धन, नागालँडमधील चाखेसंग नागा जमातीने वापरलेली फेक जिह्यातील 'झोबो' पध्दती आणि मिझोराम मधील घरांवरुन पडणाऱ्या जलसंवर्धनाची पध्दती प्रामुख्याने आहेत. सिक्कीम मधील सेंद्रीय शेतीची यशस्विता एक दंतकथा बनू पहात आहे.

ईशान्य भारतीय भागांमध्ये सुपरिचित आणि महत्वपूर्ण मानली जाणारी पध्दती म्हणजे 'झूम पीकपध्दती' किंवा 'स्थलांतरीत मशागत' पध्दती. बरेच शेतकरी जमीन भाजणीचाही अवलंब करतात.

एका अंदाजानुसार, भारतातील ईशान्येकडील भागात एकंदर मशागतीमध्ये ८५% लोक झूम पध्दतीचा म्हणजेच स्थलांतरीत मशागतीचा वापर करतात. वाढत्या मागणीमुळे मशागतीसाठी अधिक जमिनीची गरज आहे, त्यामुळे पर्यावरणस्नेही पध्दतीचा तसेच सुयोग्य आणि दूरगामी परिणामांचा विचार करुन अशा पध्दतीचा अवलंब करणे ही काळाची गरज ठरते.

सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करता, संपूर्ण ईशान्य भारत हा उष्ण कटीबंधातील हवामानात मोडतो. स्थानिक जलसंवर्धनाच्या पध्दती केवळ पीकोत्पादन सुरक्षितच करीत नाहीत तर जमिनीची धूप थांबवतात आणि मृदेची सुपीकता वाढवण्याचाही प्रयत्न करतात.

असे असून ही जलसंवर्धनात फार मोठ्या प्रमाणात संधी असताना आणि नवनवीन संशोधन उपलब्ध असताना असे दिसून येते की, गेल्या अनेक तिमाहीत म्हणावी तितकी कृषीआधारित प्रगती झालेली नाही.

काही ऐतिहासिक कारणांमुळे आणि काही भौगोलिक कारणांमुळे, ईशान्य भागात म्हणावी तितकी कृषी गुंतवणूक झालेली नाही. व्यापक विचार करता पूर्वोत्तर राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शीतगृहांची उभारणी, तथा मोठ्या प्रमाणात पणन व्यवस्थापन (मार्केटींग) करण्याची आवश्यकता आहे. यातून रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील.

अर्थात, मागील काही काळात पंतप्रधानश्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्थापित झालेल्या नवीन सरकारमुळे या भागातील कृषी उद्योग चांगलाच प्रकाश झोतात आला आहे. त्याचबरोबर नवनवीन प्रयोग करण्याकरिता पाऊले उचलली जात असून दुसऱ्या हरित क्रांतीच्या दिशेने आपण मार्गक्रमण करत आहोत.

---

***काही ऐतिहासिक कारणांमुळे आणि काही भौगोलिक कारणांमुळे, ईशान्य भागात म्हणावी तितकी कृषी गुंतवणूक झालेली नाही. व्यापक विचार करता पूर्वोत्तर राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शीतगृहांची उभारणी, तथा मोठ्या प्रमाणात पणन व्यवस्थापन (मार्केटींग) करण्याची आवश्यकता आहे. यातून रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील.***

---

याचवेळी आपण आपल्या समोर असलेल्या समस्यांकडे किंवा अडथळयांकडे लक्ष दिले पाहिजे आणि त्यानुसार योग्य ती पाऊले उचलली पाहिजेत. काहीही झाले तरी ईशान्य भारताच्या आर्थिक बळकटी करणासाठी, तेथील अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी कृषी क्षेत्राकडे लक्ष देणे अनिवार्य आहे.

आपल्याला हे ही माहिती असायला हवं की, हे सारे आपसूक घडू शकणार नाही. त्या विभागातील सुमारे ७५% जनता ग्रामीण भागात वास्तव्य करते. किंवा कृषी उत्पादकतेवर उपजीविका करते. परंतु येथील भू-भागाचा विचार करता एकूण क्षेत्राच्या फक्त २०% भाग कृषी क्षेत्राने व्यापला आहे तर उर्वरित भारतात हेच प्रमाण ४५% इतके आहे.

उत्पादनाची क्षमता लक्षात घेता, ईशान्येकडील भारत देशातील इतर भागांशी तुलना करता चांगलाच पिछाडलेला आहे आणि म्हणून अन्नधान्ये, फळ- फळावळ इत्यादी करता या विभागाला देशाच्या अन्य भागावर उवलंबून रहावे लागते आणि अन्नधान्यातील कमतरता भरुन काढावी लागते.

याचवेळी हे ही अधोरेखित होते की, या प्रदेशात कृषीउत्पादनाच्या प्रचंड संधी आहेत आणि फळफळावळ क्षेत्राला भरपूर वाव आहे. ईशान्य भारतातील राज्ये त्यातही खासकरुन आसामसारखे राज्य चहा, भात, राई, ज्यूट, बटाटा त्यातही पपया, लिंबूवर्गीय फळे, हिरव्या पालेभाज्या आर्युर्वेदिक उत्पादने तसेच मसाल्याचे पदार्थ इ. मध्ये भारताचा एकूण उत्पादनाचा विचार करता आपले महत्वपूर्ण योगदान देत आहे.

मेघालयांसारख्या राज्याला काजू, तसेच आलूबुखारसारख्या फळांना प्रचंड संधी आहे, तर आले, मिरची तसेच बांबूवर्गीय उत्पादनाला त्रिपुरा, मिझोराम, मणिपूर इ. मध्ये फार मोठा वाव आहे. नागालँडसारखे राज्य अननसासारख्या फळांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेऊ शकते.

असे काहीही असले तरी या राज्यांमध्ये असलेल्या मर्यादांचा, अडथळयांचा कृषी उत्पादनाच्या संदर्भात विचार करता कृषी तसेच फळफळावळ (बागायती) या दोन्हींचा विचार करता या राज्याची यशस्वितेची गाथा आपण मांडू शकतो आणि ही राज्ये नेत्र दीपक प्रगतीकडे वाटचाल करत आहेत. असे दाखवून देऊ शकतो.

**जनतेसाठी संधी**

पूर्वोत्तर राज्यातील जनता ही प्रामुख्याने ग्रामीण भागात वसाहत केलेली राज्ये आहेत आणि साहजिकच आपण सकारण असे म्हणू शकतो की, कृषी हा विषय येथील स्थानिक लोकांचा भावनिक मुद्दा आहे. आश्चर्य म्हणजे पांढरपेशावर्ग जो सेवा क्षेत्रात, उद्योग क्षेत्रात शासकीय विभागात काम करतो आहे. त्या सर्वांनादेखील कृषीक्षेत्राबद्दल समान ममत्व आहे. त्यांचा हाच जिव्हाळा कृषीक्षेत्रात रोजगाराच्या नवनवीन संधी उपलबध करुन देण्याकरिता एक खात्रीशीर मार्ग म्हणून उपयोगी पडत आहे.

आणि म्हणून पारंपारिक शेतीचा विचार करता अरुणाचल प्रदेशसारख्या राज्यांमध्ये भातशेतीबरोबर मत्स्योत्पादन हा उपक्रम भाताच्या उत्पादनासोबतच कोणतेही नुकसान न करता किंवा कोणत्याही तऱ्हेचे प्रदूषण न करता मर्यादित साधनांचा वापर करत मत्स्योत्पादन करतो. हा सेंद्रीय शेतीचाच एक प्रकार आहे.

दृश्य स्वरुपात याचा परिणाम म्हणून पंतप्रधानांनी सिक्कीम राज्याला दिलेला सेंद्रीय राज्याचा दर्जा, या घटनेकडे महत्त्वपूर्ण दृष्टीकोनातून पाहाता येईल.

गेल्या दशकभरात सिक्कीमच्या जनतेने अतोनात परिश्रम घेऊन शाश्वत सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून सुमारे ७५००० हेक्टर शेती लागवडीखाली आणली. या प्रयोगातून राज्यातील जमिनीच्या आरोग्यात शाश्वत सुधारणा झाली असून पिकांमध्ये उल्लेखनीय वाढ झाली आहे तसेच असेही दिसून आले आहे की, सेंद्रीय शेतीच्या कार्यक्रमाद्वारे पर्यटन क्षेत्राला चांगलीच चालना मिळत आहे.

नागालँड राज्यातील फेक या जिह्यामध्ये झोबो नामक कृषी पद्धतीचा अवलंब केला जातो. टेकड्यांवरील संरक्षित अशा वनजमिनीवर हा प्रयोग केला जातो. येथे मध्यभागी जलकुंडांची रचना केली जाते आणि, गोठे व त्या खालोखाल उतारावर भातशेती असा हा प्रयोग आहे. या ठिकाणी जलकुंडातून घेतलेले पाणी गोठ्यांमधून घेऊन सिंचनासाठी वापरले जाते. अर्थातच या पाण्यांमध्ये जनावरांचे मलमूत्र मिसळले जाते आणि हेच पाणी बांबूच्या माध्यमातून सूक्ष्मसिंचनाद्वारे पिकांना पुरवले जाते. याच्या माध्यमातून पिकांना पोषक असे नैसर्गिक घटक मिळतात.

या पार्श्वभूमीवर विचार करता, कृषी व्यवसायाच्या माध्यमामधून या विभागात बहुआयामी स्थित्यंतरे कशी घडत आहेत,

***गेल्या दशकभरात सिक्कीमच्या जनतेने अतोनात परिश्रम घेऊन शाश्वत सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून सुमारे ७५००० हेक्टर शेती लागवडीखाली आणली. या प्रयोगातून राज्यातील जमिनीच्या आरोग्यात शाश्वत सुधारणा झाली असून पिकांमध्ये उल्लेखनीय वाढ झाली आहे तसेच असेही दिसून आले आहे की, सेंद्रीय शेतीच्या कार्यक्रमाद्वारे पर्यटन क्षेत्राला चांगलीच चालना मिळत आहे.***

याचा अभ्यास हा उत्कंठावर्धक ठरतो.

यामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव करता येईल.

अ. बेरोजगारीची समस्या दूर करणे, विशेषत: न्यून बेरोजगारी (अंडरएम्प्लॉयमेंट) दूर करणे

ब. प्राथमिक गरजा उदा. पिण्याचे पाणी, ग्रामीण रस्ते, प्राथमिक शिक्षण, आरोग्य सुविधा, भूमिहीनांसाठी निवारे, पिकांसाठी पोषक द्रव्ये इ. ना पाठबळ देणे

क. आर्थिक विषमता दूर करणे

ड. अधिकाधिक विकास गाठून निरंतर प्रगती करणे

याचे दूरगामी पृथक्करण करताना, आसामी साहित्यातील वचन असे सांगते की 'उत्कृष्ट भविष्य आणि संधी यांची बीजे तेथील मातीतच रुजलेली असतात. शेती व्यवसाय अशा तऱ्हेच्या संधी प्राप्त करुन देतो.'

जमिनीला आपण माता म्हणतो, ही सृष्टी कर्त्याची सर्वात सुंदर निर्मिती असल्याचे ईशान्य भारतातील जनता मानते. मातेच्या कुशीत आपण जसे विसावतो त्याची तुलना या भूमातेशी ते करतात. या पूर्वोत्तर राज्यांमधील जनतेने कृषी व्यवसायात नैपुण्य मिळविले आहे. या भूमातेची सेवा करुन तिचे आशीर्वाद कसे घ्यावेत हे ते चांगलेच जाणतात. सर्वसमावेशक, शाश्वत आणि पर्यावरणस्नेही कृषी पध्दतीचा अंगिकार कसा करावा, हे ते जाणून आहेत.

जन सहभाग आणि नैसर्गिक साधन संपत्तीचा सुयोग्य वापर शाश्वतता आणेल आणि विकास तर होईलच.

■■■

*लेखक हे 'द स्टेट्समन', नवी दिल्लीचे विशेष प्रतिनिधी आहेत. तसेच 'रेनबोज अँड मिस्टी स्काय विन्डोज टू नॉर्थ ईस्ट इंडिया' आणि 'द टॉकिंग गन्स नॉर्थ ईस्ट इंडिया' या पुस्तकांचे लेखक आहेत.*
*email: nirendev1@gmail.com*

# आरोग्य आणि लिंगानुपात यांच्या माध्यमाद्वारे झालेला विकास

डॉ. अरुणा भट्टाचार्य चक्रवर्ती.



***देशाच्या विकासावर तरूण वर्ग, आरोग्य, शिक्षण हे घटक दूरगामी परिणाम करणारे आहेत. असे म्हणता येईल. नोबेल पारितोषिक विजेते, अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांच्या शब्दामध्ये हीच गोष्ट स्पष्ट करावयाची असेल तर म्हणता येते की," शाश्वत आर्थिक विकास साध्य करण्यासाठी तुम्हाला शिक्षित, आरोग्यदायी-म्हणजेच सुदृढ आणि काम करणारा, कमावणारा वर्ग आवश्यक आहे."***

कोणत्याही भागाचा विकास कसा झाला आहे, हे पाहताना किंवा त्या भागाला विकासाची मोजपट्टी लावताना वेगवेगळ्या घटकांचा विचार करावा लागतो. त्याचे कमी कालावधीत जाणवणारे परिणाम आणि त्याबरोबरच दूरगामी परिणाम यांचाही साकल्याने विचार करणे आवश्यक असते. यासाठी तज्ज्ञांच्या मदतीने योग्य दिशेने अगदी नियोजनबद्ध पद्धतीने पाहणी, नोंदणी करण्याची गरज असते.

भारतासारख्या देशात युवावर्गाची लोकसंख्या सर्वात जास्त आहे. त्यामुळे त्यांचा विचार करतानाच प्रगती, विकास यांचा आलेख मांडताना शिक्षण आणि आरोग्य हे महत्वाचे आणि कळीचे घटक ठरतात. याचाच अर्थ देशाच्या विकासावर तरूण वर्ग, आरोग्य, शिक्षण हे घटक दूरगामी परिणाम करणारे आहेत. असे म्हणता येईल. नोबेल पारितोषिक विजेते, अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांच्या शब्दामध्ये हीच गोष्ट स्पष्ट करावयाची असेल तर म्हणता येते की," शाश्वत आर्थिक विकास साध्य करण्यासाठी तुम्हाला शिक्षित, आरोग्यदायी-म्हणजेच सुदृढ आणि काम करणारा, कमावणारा वर्ग आवश्यक आहे." भारताला सर्व आघाड्यांवर यशस्वी होण्यासाठी आणि विकासाचा वेग कायम टिकवण्यासाठी दीर्घ मुदतीचे विकास लक्ष्य निश्चित करावे लागत आहे. आणि हे लक्ष्य साध्य करण्यासाठी उच्च गुणवत्तेच्या आरोग्य सुविधा, वैद्यकीय साधनांची उपलब्धता होण्यासाठी पुरेशी गुंतवणूक करणे शहाणपणाचे ठरणार आहे. त्याचबरोबर युवावर्गाच्या शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याची आवश्यकता असणार आहे.

**ईशान्य भारताकडे लक्ष** - वास्तविक विकासाविषयी चर्चा करताना ज्या मोजपट्ट्या लावल्या जातात किंवा ज्या घटकांचा प्रामुख्याने विचार केला जातो, त्यामध्ये ईशान्य भारतासाठी वेगळे परिमाण लावले गेले किंवा लावले पाहिजेत तसेच त्याला तात्विक आधार पाहिजेत असे अजिबात नाही. परंतु ईशान्य भारताकडे लक्ष दिले तर अगदी आश्चर्य चकीत करणारे निष्कर्श हाती येतात.

भारताच्या ईशान्येला अरूणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड आणि त्रिपुरा अशी

सात राज्ये आहेत. भौगोलिक दृष्ट्या विचार केला तर या उंचसखल, डोंगराळ राज्यांना जोडूनच भूतान, चीन, म्यानमार, आणि बांगलादेश या देशांच्या सीमा आहेत. ईशान्येकडील सात राज्यांचा परीघ साधारण दोन हजार किलोमिटर आहे; आणि या राज्यांना भारताशी जोडणारी २० किलोमिटरची चिंचोळी, अरूंद मार्गिका असे भौगोलिक स्वरूप् ईशान्य भारताचे आहे.

राज्यांचे आकारमान लहान लहान असले तरी त्यांच्या भाषा, चालीरिती, परंपरा भिन्न आहेत. ईशान्य भारतामध्ये १६६ पेक्षा जास्त वेगवेगळ्या वंशाचे, जाती-जमातीचे लोक वास्तव्य करतात. त्यामुळे त्यांच्या बोलीभाषाही तितक्याच वेगळ्या आहेत. त्यामुळे भारतामध्ये विविधता खऱ्या अर्थाने पाहायची झाली तर ईशान्य भारत एक चांगले उदाहरण मानता येईल. या भागाची भौगोलिक परिस्थिती आणि पर्यावरण यांचा विचार केला तर, उर्वरित भारतापेक्षा खूप भिन्नता येथे दिसून येते. आणि ही विभिन्नताच ईशान्य भारताचे एकमेवाद्वितीय वैशिष्ट्य आहे. ईशान्य भारताचे भौगोलिक स्थान, लोकसंख्या, भाषा आणि तेथील स्थानिक राजकीय घटक यामुळे या पर्वतीय प्रदेशाचा अन्य भारताच्या तुलनेत विचार केला तर खूप वेगळेपण ठसठशीतपणे सामोरे येते. भारताच्या मुख्य प्रवाहात ईशान्य भारतही आहे, असे आपण म्हटले तरी त्याचे वेगळेपण दिसून येते. त्याचाही परिणाम ईशान्य भारताच्या विकासावर होतो.

**ईशान्य भारताचा नेमका आजार आहे तरी काय?**

पर्वतीय प्रदेशांच्या प्रगतीला सर्वात मोठी बाधा असते ती तेथील भौगोलिक रचना!! कोणतीही गोष्ट डोंगरावर नेणे खूप अवघड, त्रासाचे आणि खर्चाचे असते. हीच समस्या ईशान्य भारतामध्ये आहे. त्यामुळे विकासकामे अतिशय धिमेपणाने होतात. सामाजिक- राजकीय कारणेही विकासगती मंदावण्यास कारणीभूत आहेत.

---

***या भागात अंमली पदार्थाच्या व्यापारामुळे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. अवैध व्यापार, वापर, या सगळ्यांची साखळी असून एक गुंतागुंतीचे जाळेच तयार झाले आहे. यामधून बाहेर पडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जागृतीची आवश्यकता आहेच. त्याचबरोबर हातांना काम आणि पैसा मिळवून देणारा चांगला उद्योग दिला पाहिजे. यासाठी सामाजिक संघटना, राजकीय लोक, यांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे.***

---

पर्वतीय क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधांची कमतरता मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे गुंतवणूक करण्यास उद्योजक पुढे येत नाहीत. वास्तविक निसर्गाने अमाप उधळण या डोंगराळ प्रदेशावर केली आहे. परंतु कोणत्याही उद्योगाला फक्त रम्य निसर्ग असून चालत नाही. इतरही गोष्टींची आवश्यकता असते. प्राथमिक स्तरावर चांगले रस्ते, पेयजल सुविधा, आरोग्य सेवा यांची गरज शाश्वत विकासासाठी असते.

ईशान्य भागाचा विकास आत्तापर्यंत होऊ शकला नाही यामागे राजकीय उदासिनता हा घटकही कारणीभूत आहे. या भागात कायदा आणि सुव्यवस्था चांगली नाही. तसेच भ्रष्टाचारामुळेही सर्वसामान्य लोकांचा पोलीस यंत्रणा, सामाजिक न्यायव्यवस्था यांच्यावर विश्वास राहिलेला नाही. या सगळ्या गोष्टींचा विपरित परिणाम सामान्य जनतेवर विशेषत: युवावर्गावर मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

**अंमली पदार्थांचा वापर**: ईशान्य भारताला सर्वात मोठी समस्या भेडसावतेय ती म्हणजे या भागात अंमली पदार्थांची असणारी सर्रास उपलब्धता. सगळ्या बाजूंनी दुसऱ्या देशांच्या सीमा असल्यामुळे अवैध व्यावसायिकांच्या दृष्टीने हा भाग म्हणजे 'सुवर्ण त्रिकोण' बनला आहे. अर्थात त्याचा फटका संपूर्ण भूप्रदेशाला बसतोय. अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेला वर्ग आता मोठ्या संख्येने एच.आय.व्ही.ग्रस्त बनण्याचा धोका वाढला आहे.

या भागात अंमली पदार्थाच्या व्यापारामुळे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. अवैध व्यापार, वापर, या सगळ्यांची साखळी असून एक गुंतागुंतीचे जाळेच तयार झाले आहे. यामधून बाहेर पडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जागृतीची आवश्यकता आहेच. त्याचबरोबर हातांना काम आणि पैसा मिळवून देणारा चांगला उद्योग दिला पाहिजे. यासाठी सामाजिक संघटना, राजकीय लोक, यांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे.

भारतामध्ये १८०,००० हून जास्त लोक अंमली पदार्थांचे सेवन स्वत:ला इंजेक्शन टोचून करतात. चिंताजनक गोष्ट म्हणजे अशा प्रकारे सुया टोचताना त्या निर्जंतूक केल्या जात नाहीत. त्यामुळे एचआयव्ही बाधितांची संख्या झपाट्याने वाढतेय.

याबरोबरच आणखी एक महत्वाची समस्या म्हणजे, देहविक्रय करणाऱ्या महिलांमुळे एडसचा प्रसार ईशान्येकडील भागात मोठ्या प्रमाणावर होतो आहे. हे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन, वेगवेगळ्यांवर स्तरावर प्रयत्न केले पाहिजेत.

**परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी काय करता येईल?**

यासाठी सार्वजनिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर चर्चा घडवून आणण्याची गरज आहे. तसेच आरोग्य सुविधा सगळीकडे चांगल्या प्रमाणात उपलब्ध करून दिली पाहिजे. कुणालाही कसलेही इंजेक्शन द्यावे लागणार असेल तर ते प्रशिक्षित आरोग्य सेवकाकडूनच दिले गेले पाहिजे. (अ) कोणीही सुया टोचून घेणे योग्य नाही, हे सामान्य नागरिकांना पटवून दिले पाहिजे. (ब) आपण कोणत्या कारणासाठी इंजेक्शन टोचून घेतोय हे त्या रुग्णाला अगदी चांगल्या पद्धतीने समजले पाहिजे. आरोग्य सेवकांनीही अतिशय चांगल्या पद्धतीने, गांभीर्याने हे काम करून समाजात जागरूकता आणली पाहिजे. (क) समजा एखादी व्यक्ती अंमली पदार्थ सेवन करीत असेल तर त्याला त्या व्यसनातून बाहेर काढण्यासाठी कुटुंबातील सदस्यांबरोबरच समाजातील लोकांनीही मदतीचा हात पुढे केला पाहिजे.

अंमली पदार्थ व्यापार, व्यवहार कारवाई केली की काही काळापुरते बंद होतात आणि पुन्हा नव्या जोमाने सुरू होतात असा अनुभव अनेकदा येतो. हे टाळण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असते. या व्यवसायात अडकलेल्यांना सन्मार्गाने उत्पन्न मिळवण्याचे साधन मिळाले, तसेच समाज, कुटूंब यांच्याकडून आदराची वागणूक मिळाली तर ही गुंतागुंतीची समस्या सुटण्यास चांगली मदत होते.

**सारांश** - ईशान्य भारताला निसर्गाने मुक्त हस्ते दिले आहे. त्याचा उपयोग करून इथल्या नागरिकांना खूप चांगले जीवन जगणे सहज शक्य आहे. परंतु पर्वतीय प्रदेश आणि आंतरराष्ट्रीय सीमा यामुळे निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठी सामाजिक आणि राजकीय इच्छाशक्ती एकत्र आली पाहिजे. तसेच या समस्या सोडविण्यासाठी सामान्य नागरिकांचाही सहभाग घेतला पाहिजे. त्यांचा समावेश करून घेतला तरच प्रगती, विकासाची नवी दालने उघडणार आहेत.

■■■


*लेखिका दिल्ली येथील भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्था येथे सहयोगी प्राध्यापक असून वैद्यकीय मानववंश शास्त्राच्या अभ्यासक आहेत.*



विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

# मेघालयातील स्वायत्त जिल्हा परिषदांची भूमिका व कार्य

डॉ. चिंतामणी राऊत



***खासी जमातीमध्ये त्यांची स्वत:ची अशी स्वतंत्र राजकीय पध्दती आहे. तिची बीजे खोलवर रुजली असून दैनंदिन प्रशासकीय जीवनात त्याचा आजही प्रभाव जाणवतो. याला परंपरागत चालत आलेली एक स्थानिक स्वराज्य संस्थाच मानावे लागेल. दैनंदिन लोकप्रशासनावर आजही या संस्थांची जबाबदारी आहे. खासी टेकड्यांमधून चालत आलेली ही परंपरा शतकानुशतके चालत आहे.***

मेघालय २ एप्रिल १९७० रोजी स्वतंत्र (स्वायत्त) राज्य म्हणून उदयाला आले. मेघालयमध्ये खासी - जैंतिया टेकड्या आणि गारो टेकड्या (हिल) या जिह्यांचा समावेश होतो. २१ जानेवारी, १९७२ रोजी 'मेघालय' ला पूर्ण राज्याची ओळख प्राप्त झाली. स्थानिक स्वराज्य संस्था हा लोकशाहीचा पाया मानला जातो. खासी जमातीमध्ये त्यांची स्वत:ची अशी स्वतंत्र राजकीय पध्दती आहे. तिची बीजे खोलवर रुजली असून दैनंदिन प्रशासकीय जीवनात त्याचा आजही प्रभाव जाणवतो. याला परंपरागत चालत आलेली एक स्थानिक स्वराज्य संस्थाच मानावे लागेल. दैनंदिन लोकप्रशासनावर आजही या संस्थांची जबाबदारी आहे. खासी टेकड्यांमधून चालत आलेली ही परंपरा शतकानुशतके चालत आहे. अगदी आजही ह्या जमातीतील सामाजिक कारभार हा या पध्दतीनेच चालविला जातो इतकेच नव्हे तर जनमताला धरुनच त्याबाबतचे निर्णय लागू होतात.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, भारतीय संविधान लिहीत असताना घटनाकारांना ईशान्य भारतातील या जमातींच्या गरजा (त्यांच्या जमिनी आणि वनसंपदेबाबत गरजा ओळखून) संरक्षित करण्याची आवश्यकता लक्षात आली. त्यातून संविधानाचे सहावे परिशिष्ट उदयाला आले. यातूनच स्वायत्त जिल्हा परिषदांची स्थापना होत असते.

म्हणून, ह्या सहाव्या परिशिष्टानुसार, खासी-जैंतिया स्वायत्त जिल्हा संयुक्त परिषदांची स्थापना झाली, मात्र पुढे यांचे विघटन दोन वेगवेगळ्या स्वायत्त जिल्हा परिषदांत झाले. त्याप्रमाणे एकाचे नाव खासी हिल्स स्वायत्त जिल्हा परिषद (KHADC) आणि जैंतिया हिल्स स्वायत्त जिल्हा परिषद (JHADC). त्याप्रमाणे खासी हिल्स स्वायत्त जिल्हा परिषदचे न्यायक्षेत्र पूर्व खासी टेकड्या, पश्चिम खासी टेकड्या आणि रि भोई जिह्यावर आहे तर गारो हिल्स स्वायत्त जिल्हा परिषद मेघालयचा संपूर्ण गारो प्रदेश हाताळते.

सहाव्या परिशिष्टाच्या परिच्छेद क्रमांक एक मध्ये (कलम २४४ ते २७५) राज्याच्या राज्यपालांच्या अधिकाराबाबत स्पष्टता आहे, त्यानुसार राज्यपाल शासकीय राजपत्रातील अधिसूचनेप्रमाणे, नवीन स्वायत्त जिल्हा निर्माण करु शकतात. त्यासाठी एखाद्या जिह्याचे क्षेत्रफळ कमी करु शकतात, वा दोन वा अधिक जिल्ह्याचे एकत्रीकरण करु शकतात. जिल्ह्याच्या सीमानिश्चिती

करु शकतात, एखाद्या जिह्याचे आयोगाने शिफारस केल्यास त्या जिल्ह्याचे नामकरण करु शकतात, राज्यपाल जिल्हा परिषदांच्या प्रशासकीय कार्य क्षेत्रामधील बदल आणि सुधारणांबाबतीत अंतिम निर्णय घेतात.

**प्रादेशिक मंडळे आणि जिल्हा परिषदांची रचना**

प्रत्येक स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा परिषदांत कमाल तीस सदस्य हवेत, त्यातील किमान चार सदस्य हे राज्यपाल नियुक्त असावेत तर उरलेले सारे मताधिक्याने निवडलेले असावेत. प्रत्येक स्वायत्त प्रदेशांमध्ये प्रादेशिक मंडळांची स्थापना होते. जिल्हा परिषदा व प्रादेशिक मंडळांना त्यांनी धारण केलेल्या नामानुसार स्वतंत्र अस्तित्व असते. त्यांच्या या कायदेशीर अस्तित्वामुळे त्याला सामान्य मुद्रा आणि शाश्वतता बहाल केलेली आहे. त्यामुळे न्यायालयीन मंचावर दाद फिर्याद मागण्यासाठी त्यांचे स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असते. या दोन्ही मंडळांची रचना राज्यपालांच्या संमतीने होते, आणि त्यामध्ये नियमावली करण्याचा अधिकारही त्यांचाच असतो. त्यासाठी ते जमातीतील पंचायती व इतर संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधतात, बैठकी कोणाच्या असतील ते ठरवतात, तसेच अधिकारी व दोन्ही मंडळांचे कर्मचारी वर्ग यांची निवड व त्याअनुषंगाने प्रक्रिया ठरवतात. जिल्हा परिषदांमध्ये निवडलेल्या सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षे असतो. ज्याची गणना मंडळांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सभेसाठी ठरलेल्या दिवसापासून होते, जिल्हा परिषद संस्थगित झाल्यास जिल्हा परिषदांचे सदस्य राज्यपालांच्या संमतीनुसार पद धारण करु शकतात.

कायदे करण्याबाबत जिल्हा परिषद आणि प्रादेशिक मंडळांना अधिकार आहेत.

प्रादेशिक मंडळे ज्या प्रदेशावर त्याची नियुक्ती केली आहे त्या प्रदेशासाठी आणि जिल्हा परिषदा ज्या जिल्ह्यावर नियुक्ती केली आहे त्या जिल्ह्यासाठी काही कायदे करु शकतात. यामध्ये नेमणूका, जमिनीशी निगडीत व्यवसाय वा जमिनीचे उपयोग, राखीव क्षेत्र वगळता उर्वरित कृषीव्यवसाय व कुरणे यासाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनी किंवा बांधकामासाठी वापरात येणाऱ्या जमिनी वा बिनशेती कामासाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनी व ज्याद्वारा भूमीपुत्रांचे हक्क जपले जातात अशा जमिनी, राखीव वनक्षेत्रातिरिक्त जमिनीचे व्यवस्थापन , कृषीसाठी वापरले जाणारे कालवे व पाणवठे, झूम पध्दती वा इतर पीकपध्दतींचे नियमन, ग्रामसमिती वा नगरसमित्यांची स्थापना व नेमून दिलेले अधिकार, गाव वा नगराच्या प्रशासना संदर्भातील कोणतीही बाब गावप्रमुखाची नेमणूक वा आरोग्य व स्वच्छता विषयक प्रश्न, गावप्रमुखाची (मुखिया) नेमणूक वा मालमत्तेचे वारसाहक्क, विवाह वा घटस्फोट अथवा तत्सम सामाजिक प्रश्न इ. चा अंतर्भाव होतो.

***प्रत्येक स्वायत्त प्रदेशांमध्ये प्रादेशिक मंडळांची स्थापना होते. जिल्हा परिषदा व प्रादेशिक मंडळांना त्यांनी धारण केलेल्या नामानुसार स्वतंत्र अस्तित्व असते. त्यांच्या या कायदेशीर अस्तित्वामुळे त्याला सामान्य मुद्रा आणि शाश्वतता बहाल केलेली आहे. त्यामुळे न्यायालयीन मंचावर दाद फिर्याद मागण्यासाठी त्यांचे स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असते.***

**स्वायत्त जिल्हा आणि प्रादेशिक मंडळांमधील न्यायप्रशासन**

ही प्रादेशिक मंडळे आणि जिल्हा परिषदा त्यांच्या निश्चित प्रदेशात न्यायिक प्रशासन पाहतात. ज्यामध्ये गावपातळीवर आयोग नेमले जातात वा न्यायालय स्थापले जाते आणि त्या द्वारा भटक्या जमातीतील लोकांचे वाद मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. त्या क्षेत्रातले शिवाय या परिशिष्टाबाहेरचे किंवा राज्यातील न्यायालयांनी वगळलेले असे सर्व दावे येथे मांडले जाऊ शकतात. या न्यायालयांद्वारा एखाद्या योग्य व्यक्तीची ग्राम आयोगाचा प्रतिनिधी वा अधिकारी म्हणून निवड केली जाते. किंवा परिशिष्टांततर्गत एखाद्या अधिकाऱ्यास कायदा करण्याचे प्रशासकीय अधिकार बहाल केले जातात. उच्च न्यायालयास या बाबतीत सर्व क्षेत्राधिकार आहेत. सर्व दावे ज्यास हे परिशिष्ट लागू होते, असे दावे तथा राज्यपालांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार उच्च न्यायालयांतर्गत येणाऱ्या दाव्यांचे समावेशीकरण होते.

प्रादेशिक मंडळे वा जिल्हा परिषदा, राज्यपालांच्या पूर्वपरवानगीने त्या त्या भौगोलिक क्षेत्राबाबत नियमावली जाहीर करतात. त्यात ग्रामपंचायती वा न्यायालयांची रचना, त्यांना सुपूर्द केलेले अधिकार, त्यांच्या कारभारासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रशासकीय प्रक्रिया, निर्णयांची अंमलबजावणी, न्यायालयीन प्रक्रियेतील खटलेबाजी, अपीलीय प्रक्रिया, आणि इतर घटकांसंबंधी सहाव्या परिशिष्टात असणाऱ्या तरतूदींचा अंतर्भाव असतो.

**जिल्हा परिषदांना प्राथमिक शाळा स्थापना विषयक व इतर अधिकार**

स्वतंत्र जिह्यासाठी स्थापित झालेल्या

जिल्हापरिषदांना प्राथमिक शाळा, दवाखाने, बाजारपेठा, फेरी, मासेमारी, रस्ते वाहतूक, जलमार्ग आदी स्थापन करण्याचा बांधण्याचा इतकेच नाही तर त्यांचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार आहे. यासाठी राज्यपालांची अधिकृत परवानगी असावी लागते. त्यामुळे या मंडळांना तत्संबंधात नियमन व आराखडे करता येतात, तसचे प्राथमिक शाळांत कोणत्या भाषेमध्ये शिक्षण द्यावे हे देखील ठरवता येते. शिवाय राज्यपाल मंडळांच्या संमतीने, मंडळास किंवा मंडळाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यास सशर्त किंवा बिनशर्त अधिकार उदा. कृषी, पशूपालन, समाजाभिमुख प्रकल्प, सहकार सोसा, समाजकल्याण, ग्रामनियोजन या क्षेत्रात काम करण्याविषयक अधिकार मंडळांस बहाल करतात.

***प्रादेशिक मंडळे वा जिल्हा परिषदा, राज्यपालांच्या पूर्वपरवानगीने त्या त्या भौगोलिक क्षेत्राबाबत नियमावली जाहीर करतात. त्यात ग्रामपंचायती वा न्यायालयांची रचना, त्यांना सुपूर्द केलेले अधिकार, त्यांच्या कारभारासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रशासकीय प्रक्रिया, निर्णयांची अंमलबजावणी, न्यायालयीन प्रक्रियेतील खटलेबाजी, अपीलीय प्रक्रिया, आणि इतर घटकांसंबंधी सहाव्या परिशिष्टात असणाऱ्या तरतूदींचा अंतर्भाव असतो.***

**जिल्हा व प्रादेशिक मंडळांकरिता निधी**

प्रत्येक स्वायत्त जिल्हा परिषदेला तिच्या अखत्यारीत येणाऱ्या प्रादेशिक स्वायत्त मंडळांसाठी निधी संकलित करावा लागतो.त्या निधीचे प्रादेशिक मंडळांमध्ये वाटप करण्यात येते, आणि घटनेच्या चौकटीत नमूद केलेल्या तरतूदींप्रमाणे कल्याण कामासाठी वापरले जातात.

राज्यपाल या कल्याण निधीकरिता नियमावलीही आखू शकतात वा तत्सम कामे ही त्यांच्या अखत्यारीत येतात. हा निधी, देणे भागवण्यासाठी, निधीच्या ताब्याकरिता आणि इतर निगडीत कामांकरिता असतो आणि त्यासंबंधित बाबींसाठी नियम करणे हे वर म्हटल्याप्रमाणे राज्यपालाचे कर्तव्य आहे. जिल्हा परिषदांचे हिशेब वा प्रादेशिक परिषदांचे हिशेब नियंत्रक आणि महालेखानिरिक्षकांनी (CAG)

---


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in **येथे ऑनलाईन भरावे.**

अनुसरल्याप्रमाणे असावेत.यासाठी राष्ट्रपतींच्या अनुमतीची गरज असते.

*प्रत्येक स्वायत्त जिल्हा परिषदेला तिच्या अखत्यारीत येणाऱ्या प्रादेशिक स्वायत्त मंडळांसाठी निधी संकलित करावा लागतो.त्या निधीचे प्रादेशिक मंडळांमध्ये वाटप करण्यात येते, आणि घटनेच्या चौकटीत नमूद केलेल्या तरतूदींप्रमाणे कल्याण कामासाठी वापरले जातात. राज्यपाल या कल्याण निधीकरिता नियमावलीही आखू शकतात वा तत्सम कामे ही त्यांच्या अखत्यारीत येतात.*

महालेखानिरीक्षक त्यांना ज्ञात असलेल्या माहितीप्रमाणे हिशेबांची तपासणी करतात. त्या तपासणीचे अहवाल हे मंडळांपुढे सादर करण्याच्या दृष्टीकोनातून राज्यपालांकडे सुपूर्द करतात.

**निष्कर्ष**

भटक्या जमातीतील लोकांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी जिल्हा परिषदा साधन बनत आहेत. मेघालयातील जिल्हा परिषदा तथा प्रादेशिक मंडळे समाधानकारक काम करत आहेत. आणि त्यासाठी त्यांची प्रशंसा करणे गरजेचे आहे.जिल्हा परिषदा घटनात्मक कर्तव्ये निभावत आहेत. यात काही शंका नाही, कामामध्ये अजून सुधारणा झाली पाहिजे. याकरिता पात्र आणि योग्य व्यक्तींची मंडळांवर नियुक्ती होणे गरजेचे आहे. सहाव्या परिशिष्टामुळे जिल्हा परिषदांना नेहमीच भटक्या विमुक्त जातींना जमिनी, वन, बाजारपेठा, व्यापार, रिती आदींमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी आणि नियम करण्याची मुभा मिळाली आहे. त्यामुळे जमीन महसूल, प्राथमिक शिक्षण, जकात, कायदा यासाठी विधि योजना करण्याचे प्रशासन करण्याचे स्वतंत्र पूर्णाधिकार मिळतात. जिल्हा मंडळाच्या सदस्यांना प्रशिक्षीत करण्याची गरज आहे. शिवाय मोठ्या प्रमाणावर जनसहभाग करण्याची आणि जनयोगदान देण्याची काळाची गरज आहे. शेवटी हेच महत्वाचे आहे की, योग्य मूल्यांकन आणि समयोचित पुनरावलोकन केल्याने स्वायत्त जिल्हा परिषदा स्थापण्याचा हेतू आणि उद्दीष्ट्ये सफल होतील व या जमातीतील लोकांचे हक्क आणि महत्वाकांक्षांची पूर्ती होईल.

■■■

*लेखक शिलाँग येथील नॉर्थ-इस्टर्न हिल युनिव्हसिटीतील विधि विभागाचे प्रमुख आहेत.*

*email-drchintamanirout@gmail.com*

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

# ईशान्येकडील राज्यातही कौशल्यपूर्ण भारत मोहीम

संजीव दुग्गल



***ईशान्य भारतात केवळ स्वशाश्वत विकासाचीच नव्हे तर देशाच्या आर्थिक प्रगतीत हातभार लावण्याची मोठी क्षमता आहे. केंद्र सरकारने अलिकडेच कौशल्यसंपन्न भारताच्या योजनेत ईशान्येकडील राज्यात कौशल्य प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली जाणार असल्याचे म्हटले आहे,त्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआयचा समावेश आहे. नवीन जिल्हयात ही केंद्रे सुरू केली जाणार आहेत.***

कौशल्यपूर्ण भारत ही मोहीम देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली पाहिजे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. केंद्र सरकार त्यासाठी ईशान्येकडील राज्यांवर लक्ष केंद्रित करीत आहे. कौशल्यसंपन्न भारत या मोहिमेसाठी तेथील राज्यांमध्ये अनुकूल स्थिती निर्माण केली जाईल. ईशान्य भारतात केवळ स्वशाश्वत विकासाचीच नव्हे तर देशाच्या आर्थिक प्रगतीत हातभार लावण्याची मोठी क्षमता आहे. केंद्र सरकारने अलिकडेच कौशल्यसंपन्न भारताच्या योजनेत ईशान्येकडील राज्यात कौशल्य प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली जाणार असल्याचे म्हटले आहे त्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआयचा समावेश आहे. नवीन जिल्हयात ही केंद्रे सुरू केली जाणार आहेत. केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री राजीव प्रताप रूडी यांनी असे आवाहन केले आहे की, उद्योगांनी आता ईश्यान्येकडे लक्ष पुरवावे व त्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रमात सहभाग घ्यावा. ईशान्य उद्योग व व्यापार महासंघाने प्रत्येकी एका सदस्याची नियुक्ती चाळीस कौशल्य मंडळांवर करावी. राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाची फेररचना करण्यात येणार असून त्यात ईशान्य व्यापार व उद्योग मंडळाच्या एका सदस्याची नियुक्ती केली जाणार आहे.

ईशान्येकडे आठ राज्ये आहेत त्यात अरूणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम (२००२ मध्ये समाविष्ट) व त्रिपुरा यांचा समावेश आहे. या राज्यात प्रगती होत आहे. उर्वरित भारतापेक्षा तेथील लोक मुलांना शिक्षण देण्यात पुढे आहेत. कृषीवर त्यांचे अवलंबित्व कमी असून संपन्नतेकडे वाटचाल सुरू आहे पण तेथे आर्थिक वाढ होत असली तरी रोजगार संधी मात्र पुरेशा निर्माण होताना दिसत नाहीत त्यामुळे तफावत वाढते आहे. या भागातील विकासाची आव्हाने अनेक आहेत त्यात पायाभूत सुविधा हा महत्वाचा भाग आहे, त्यासाठी केंद्र सरकारने ईशान्य विकास मंत्रालय स्थापन केले असून २०१५-१६ मध्ये २३६२ कोटी रूपयांची तरतूद केली आहे. या भागात काही फायद्याच्या गोष्टी आहेत एक म्हणजे पारंपरिक बाजारपेठेचा मुद्दा यात महत्वाचा आहे. प्रमुख राज्ये व पूर्वेकडील तसेच शेजारील बांगलादेश व म्यानमार या देशांच्या लगत ही राज्ये आहेत. त्यामुळे आग्नेय आशियायी बाजारपेठेत या राज्यातील उत्पादने विकली जाऊ

शकतील. ईशान्येकडील राज्ये ही सुपीक जमीन असलेली आहेत व तेथे बुद्धीमान लोकही आहेत. त्यामुळे तो सगळा भागच आर्थिक व इतर बाबतीतही संपन्न होऊ शकतो. तेथील लोकसंख्यात्मक रचनेचाही फायदा यात आहे. त्यामुळे तेथे कौशल्य विकास साधण्यास अनुकूल घटक आहेत. या भागात पारंपरिक बाजारपेठेवर आधारित उत्तरे शोधून चालणार नाही. तेथील पायाभूत सुविधा पुरेशा नाहीत. ती राज्ये दळणवळणाच्या साधनांनी पुरेशी जोडली गेलेली नाहीत. बेरोजगारी आहे. कायदा व सुव्यवस्था तसेच कमी आर्थिक विकासाचे प्रश्न आहेत, त्यावर मात करावी लागेल. भारतात तरूणांची संख्या जास्त असली तरी त्यांच्याकडे उद्योगांना आवश्यक असलेली दर्जेदार कौशल्ये नाहीत. २०१४ मध्ये करण्यात आलेल्या एका पाहणीनुसार ७८ टक्के नियोक्त्यांनी देशात कौशल्याचा अभाव असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या मते पात्र उमेदवार मिळत नसल्याने ५७ टक्के जागा रिकाम्या आहेत. १.४० कोटी लोकांपैकी केवळ २० लाख लोकांकडे कौशल्ये आहेत. कौशल्य विकास व उद्योजकता विकास मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार दर १०० माणसांमागे केवळ ४.५ लोकांकडे उद्योगास लागणारी किंवा इतर कौशल्ये आहेत. राष्ट्रीय सांख्यिकी संस्थेच्या पाहणीनुसार हे प्रमाण ईशान्येकडे आणखी कमी आहे. कोरियात ९६ टक्के तर जपानमध्ये ८० टक्के मनुष्यबळ हे कौशल्यसंपन्न आहे. कौशल्याची व्यवहार्य प्रारूपे नसल्यानेही कदाचित तसे घडले असेल पण भारतात आता कौशल्य विकासातील अडथळ्यांवर मात करावी लागणार आहे. अनेक संस्था कौशल्य विकासात काम करीत आहेत, त्यांचे दृष्टिकोन वेगळे आहेत पण त्यात नाविन्य, नवप्रवर्तन यांचा अभाव आहे.

**ईशान्येकडील कौशल्य प्रशिक्षणातील आव्हाने**

ईशान्येकडे कौशल्य विद्यापीठ स्थापन करणे गरजेचे आहे कारण भारतीय तरूणांच्या आशाआकांक्षा पूर्ण करणे हे मोठे आव्हान आहे. मोठ्या शहरी भागात स्थलांतरित सहाय्य केंद्रे स्थापन करून लोकांना रोजगार संधी दिल्या पाहिजेत. ईशान्येकडून येणा-या प्रशिक्षणार्थीना त्याचा उपयोग होईल. ईशान्येकडील भाग पर्वतीय असून डाव्या अतिरेकी चळवळीने काही जिल्हे ग्रस्त आहेत. रोजगाराच्या संधी मेघालयात अगरवूड लागवडीमध्ये जास्त आहेत. त्यात स्थानिक पातळीवर आर्थिक साधने निर्माण होतील. आग्नेय आशियायी देशातील उद्योग प्रारूप हे उर्ध्व एकात्म उद्योग प्रारूप आहे. अगरवूड लागवड, प्रक्रिया, तेलनिर्मिती व इतर उत्पादनांची निर्मिती असे अनेक भाग त्यात येतात. त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी नवे उद्योग प्रारूप गरजेचे आहे.आग्नेय आशियायी देशातील उद्योग प्रारूप त्यात वापरता येईल.

***कौशल्य विकास व उद्योजकता विकास मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार दर १०० माणसांमागे केवळ ४.५ लोकांकडे उद्योगास लागणारी किंवा इतर कौशल्ये आहेत. राष्ट्रीय सांख्यिकी संस्थेच्या पाहणीनुसार हे प्रमाण ईशान्येकडे आणखी कमी आहे. कोरियात ९६ टक्के तर जपानमध्ये ८० टक्के मनुष्यबळ हे कौशल्यसंपन्न आहे. कौशल्याची व्यवहार्य प्रारूपे नसल्यानेही कदाचित तसे घडले असेल पण भारतात आता कौशल्य विकासातील अडथळ्यांवर मात करावी लागणार आहे.***

विकास व रोजगार निर्मिती याचा ईशान्येकडील राज्यांच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला तर २०११ ते २०२१ दरम्यान २६ लाख रोजगार निर्माण होतील. त्यातील निम्मे आसाममधील असतील. आसाममध्ये १२३४३५७ रोजगार निर्माण होतील. पण मागणी कमी असल्याने तेथे २०११ ते २०२२ दरम्यान रोजगार इच्छुक उमेदवारांची संख्या ही १.७ कोटी असेल म्हणजेच रोजगार मागणाऱ्यांची संख्या ही १.४० कोटींनी अधिक असेल. ईशान्येकडे २६ लाख रोजगार निर्माण होतील पण मनुष्यबळाचा पुरवठा हा १.६८ कोटी इतका असणार आहे. त्यामुळे कौशल्य विकास व स्थानिक रोजगार या दोन्ही मार्गाचा अवलंब केला तर स्थलांतर थांबेल. कौशल्य विकास योजना लोकांपर्यंत पोहोचवणे, ग्रामीण व दूरस्थ भागातील लोकांना शिक्षणासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. विकास व प्रशिक्षणातील तीस वर्षांच्या अनुभवातून आमच्या असे निदर्शनास आले आहे की, कंपनी क्षेत्रात कर्मचऱ्यांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी अभिनव प्रशिक्षण पद्धतींचा वापर करणे गरजेचे आहे. त्यांच्या कौशल्यक्षमतेत सुधारणा गरजेच्या आहेत.

यावर मी अनेक मंचावरून विचार मांडले आहेत, सरकारने व्यावसायिक शिक्षण पूर्णवेळ शिक्षण घेऊ न शकणाऱ्या महिलांना अनिवार्य करावे. भारतात

नोकऱ्यांमध्ये पदवीपेक्षा कौशल्यांना महत्व असले पाहिजे. 'बेटी बचाव बेटी पढाव' व डिजीटल इंडिया योजना सरकारने आणल्या आहेत, त्यात युवक व महिलांना संगणक वापराची कौशल्ये शिकवली पाहिजेत. दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्तींना वेगळ्या रोजगार संधींची गरज आहे. त्यासाठी नियोक्ते व उद्योग गटांशी संपर्क साधून तशी व्यवस्था करावी लागेल. सरकारला या समाजगटांना एकत्र आणून रोजगार संधी व प्रशिक्षण देता आले तर लोकांचे सक्षमीकरण होईल व त्यातून देशाची स्थितीही पालटेल.

**समन्वयाची गरज**

ईशान्य भारतात बहुकौशल्य संस्था स्थापन करण्याची गरज आहे. त्याचबरोबर उच्च शिक्षण हे अँप्रेंटिसशिपशी जोडले पाहिजे. कामावर आधारित शिक्षणातून रोजगाराचे प्रश्न सुटतील. कौशल्य अभ्यासक्रम आकर्षक करण्याची गरज आहे. शिवाय ते कालसुसंगतही असले पाहिजेत. ज्या कौशल्यांना मागणी आहे ती शिकवली गेली पाहिजेत, तरच स्थलांतर थांबू शकेल. ईशान्येकडील राज्यात कौशल्यासाठी पुढाकार आवश्यक आहे. तेथील लोक शेती करण्याच्या मानसिकतेचे आहेत. त्यांच्यात गरजाधिष्ठित कौशल्यांचा विकास केला पाहिजे व उद्यमशीलतेला प्रोत्साहन दिले पाहिजे. तरूण मनुष्यबळाची उपलब्धता ही संपत्ती मानून त्याचा त्या प्रदेशाच्या आर्थिक भरभराटीसाठी वापर करून घेतला पाहिजे. बाजारपेठेशी निगडित अशी कौशल्ये त्यांना शिकवली गेली पाहिजेत.

रोजगाराचा प्रश्न सोडवणे गरजेचे असून क्षमता विकास व कौशल्य सुधारणेसाठी आराखडा ठरवला पाहिजे. ईशान्येकडे स्थानिक बुद्धीमान लोकांचा उपयोग करून घेतला पाहिजे त्यांना रोजगारासाठी स्थलांतराची वेळ येता कामा नये. अनेक क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत, त्यासाठी अनुकूल शिक्षणाचा शोध घेतला पाहिजे. कौशल्ये शोधली पाहिजेत व त्यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे रोजगारक्षमता वाढू शकते.

---

***ईशान्येकडे स्थानिक बुद्धीमान लोकांचा उपयोग करून घेतला पाहिजे त्यांना रोजगारासाठी स्थलांतराची वेळ येता कामा नये. अनेक क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत, त्यासाठी अनुकूल शिक्षणाचा शोध घेतला पाहिजे. कौशल्ये शोधली पाहिजेत व त्यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे रोजगारक्षमता वाढू शकते.***

---

ईशान्येकडे विविधता आहे. फळे व इतर पीके भरपूर आहेत.तेथे अन्न प्रक्रिया उद्योगातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करता येईल. हातमाग व्यवसायातही मोठी संधी असून तो माल स्थानिक व देशातील बाजारपेठेत विकला जाऊ शकतो. योग्य प्रकारची तांत्रिक कौशल्ये विकसित करणे त्यासाठी गरजेचे आहे. कौशल्ये विकसित करणे, तंत्रज्ञानाची माहिती वाढवणे यामुळे या भागाचा आर्थिक विकास दर वाढू शकतो त्यामुळे स्थानिक बुद्धीमत्ता व कौशल्ये जपली जातील व वारसाही अबाधित राहील

'स्टार्ट अप' म्हणजे नवोद्योग कंपन्यांसाठी प्रयत्न गरजेचे आहेत व त्यासाठी उद्यमशीलतेचा विकास करावा लागेल असे प्रयत्न काही प्रमाणात झाले आहेत व त्याला चांगला प्रतिसादही आहे. नवोद्योगांना पूरक व्यवस्था असावी लागते. त्यात योग्य कौशल्ये, नेटवर्किंग, स्मार्ट भांडवल, विनिमय, उद्योजकता संस्कृती व भक्कम विपणन धोरणे यांचा समावेश आहे. कौशल्ये व रोजगारक्षमता यासाठी आणखी काही क्षेत्रांचा विचार आवश्यक आहे त्यात हॉटेल व हॉस्पिटॅलिटी (आतिथ्य) व्यवस्थापन यांचा समावेश आहे. पॅरामेडिकल व वैद्यकीय पदव्या, कृषी व्यवस्थापनातील पदव्या येथे महत्वाच्या आहेत. आयटीइएस, बीपीओ व केपीओ कौशल्ये, अभियांत्रिकी, उद्योग व्यवस्थापन व व्यावसायिक कौशल्ये महत्वाची आहेत. त्यात वाहन उद्योग, बांधकाम, इलेक्ट्रॉनिक्स, प्लंबिंग, कापडउद्योग, तयार कपडे उद्योग यात रोजगार संधी मिळू शकतात. मोठ्या गुंतवणुकीचे प्रकल्प हे चित्र पालटू शकतात. ग्रामीण भागातील लोकांचे सक्षमीकरण त्यासाठी आवश्यक आहे. सूक्ष्मवित्त, नैसर्गिक साधने व्यवस्थापन याच्याशी निगडित व्यवसायांची वाढ करता येईल. आर्थिक सक्षमीकरण व विकासात्मक भागीदारी यांना त्यात महत्व आहे, याशिवाय सरकारी व खासगी क्षेत्राने यात पूरक काम केले तर अपेक्षित परिणाम साधण्यास वेळ लागणार नाही.

■■■

*लेखक सेंटम लर्निंग या बहुराष्ट्रीय प्रशिक्षण कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक आहेत.*

*email: sanjiv.duggal@centumlearning.com*

## केंद्रीय अर्थसंकल्पातील ईशान्य भारत

# सेंद्रीय मूल्य विकास साखळी, संपर्क आणि कौशल्य विकासावर भर

ईशान्य प्रदेश विकास मंत्रालयासाठी गेल्या वर्षीची २३३४ कोटी ५० लाख रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद वाढवून यंदाच्या अर्थसंकल्पात ती २,४०० कोटी रुपये केली आहे. ईशान्येसाठी देण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदींचा मुख्य भर हा त्या प्रदेशाच्या एकंदर विकासावर आहे. ईशान्य प्रदेशाचा संपर्क वाढवणे, कौशल्य विकास आणि सेंद्रीय मूल्य विकास साखळी यासह इतर गोष्टींसाठी तरतुदी केल्या आहेत. यातील सर्वात महत्वाची घोषणा म्हणजे एकमेव अशी सेंद्रीय मूल्य विकास साखळी योजना असून त्यासाठी ११५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, जी संपूर्ण प्रदेशा आमूलाग्र परिवर्तन घडवणारी ठरण्याची अपेक्षा आहे. प्रदेशातील आतापर्यंत शोध न घेतलेल्या प्रचंड सेंद्रीय व्यवसायाच्या क्षमतेला चालना तर देईलच, शिवाय देशभरातून गुंतवणुकीसाठी येणाऱ्या 'स्टार्ट अप्स'साठी ईशान्य भारत एक पसंतीचे स्थळ होईल. ईशान्य प्रदेश हा देशातील महत्वाचा भाग बनला असून सिक्कीम हे देशातील पहिले सेंद्रीय राज्य म्हणून पंतप्रधानांनी नुकतेच घोषित केले आहे.

५६ मंत्रालयांनी मिळून ईशान्य प्रदेशासाठी ३३,०९७ कोटी २ लाख रुपयांच्या अर्थसंकल्पीय निधीचे वाटप केले आहे. गेल्या वर्षीच्या २९,०८७ कोटी ९३ लाख रुपयांच्या तरतुदीपेक्षा ही वाढ १४ टक्क्यांनी जास्त आहे. नॉन लॅप्सेबल सेंट्रल पुल रिझर्व्ह (एनएलसीपीआर) अंतर्गत २०१६-१७ मध्ये बीई ९०कोटीवरून वाढवून २००कोटी रुपये केले आहे. ईशान्य मंडळाच्या योजनांसाठी अर्थसहाय्य ७०० कोटीवरून वाढवून यंदा ७९५ कोटी रुपये केले आहे.

नुकत्याच सुरू करण्यात आलेल्या ईशान्य रस्ते क्षेत्रीय विकास योजनेसाठी १५० कोटी रुपये देण्यात आले आहेत. ईशान्येतील आंतरराज्य रस्त्यांच्या विकासासाठी ही योजना सहाय्यक ठरणार आहे. या व्यतिरिक्त, आशियाई विकास बँक ईशान्य प्रदेशातील रस्त्यांची उभारणी व देखभालीसाठी निधी पुरवणार आहे.

ईशान्य विकास वित्त महामंडळासाठी (एनईडीएफसी) अर्थसंकल्पीय तरतूद ३० कोटीवरुन ७५ कोटी रुपये इतकी वाढवली आहे, जी प्रदेशात पंतप्रधानांच्या 'स्टार्ट अप' कार्यक्रमाला चालना देईल. त्याचप्रमाणे, कौशल्य विकासासाठी अर्थसंकल्पातील १६ कोटी रुपयांवरून ५६ कोटी रुपयांपर्यंत केलेली वाढ 'स्टार्ट अप' कार्यक्रमाला आणखी पूरक ठरेल. पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या तीन वर्षे करसुट्टी आणि तीन महिन्यांचा बाहेर जाण्याचा कालावधी या सर्व तरतुदींशिवाय ईशान्य विकास मंत्रालय नव्या व्यावसायिकांचे आर्थिक कर्ज हलके करण्यासाठी व्हेंचर फंडाची ऑफर देत आहे. वरील सर्व तरतुदींशिवाय, ईशान्येतील ग्रामीण उपजीविकेवर जोर देण्यात येत असून त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद या वर्षी १५० कोटी इतकी वाढवली आहे.

प्रदेशाच्या विकासाकरता त्याचे उर्वरित भारताला दर्शन घडवणे अतिशय महत्वाचे आहे. त्यासाठी यंदा अर्थसंकल्पीय तरतूद १० कोटी ५० लाख रुपयांवरून वाढवून १७ कोटी करण्यात आली आहे, जी गेल्या वर्षीच्या वाटपापेक्षा ६० टक्के अधिक आहे. नुकतेच १२ ते १४ फेब्रुवारी २०१६ या दरम्यान ईशान्य विकास मंत्रालयाने नवी दिल्ली येथे 'डेस्टिनेशन नॉर्थ इस्ट २०१६' चे आयोजन केले होते. ईशान्येची ताकद आणि क्षमतांचे विशेषत: हातमाग आणि हस्तकला तसेच ईशान्येतील उत्पादनांचे प्रदर्शन व विक्रीचे जगाला दर्शन घडवण्यासाठी आणखी अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजन करण्याचा मंत्रालयाचा हेतू आहे. २०१६-१७ च्या पहिल्या तिमाहीत अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आहे.

ईशान्य विकास मंत्रालयाच्या 'अॅक्ट इस्ट' पॉलिसीचा भाग म्हणून मुख्य पुढाकार भारत आणि बांगलादेश यांना रेल्वेने जोडण्यासाठी निधी पुरवण्याचा आहे. भारतीय बाजूने यासाठी येणारा ५८७ कोटी रुपयांचा खर्च ईशान्य विकास मंत्रालय देणार आहे.

ग्रामीण भागातील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या उन्नतीसाठी असलेल्या दहा हजार कोटीच्या निधीपैकी ईशान्य प्रदेशाकरता विशेष वाटा राहणार असून ईशान्येसाठी या उद्देश्याने १६२३ कोटी रुपये दिले आहेत. बोडोलँड आदिवासी मंडळासाठीही सरकार ३०० कोटी रुपये राखून ठेवणार आहे.

■■■

# ईशान्येकडील राज्यांना वीजपुरवठा- संधी व आव्हाने

के.रामनाथन



***सिक्कीम वगळता ईशान्येतील सर्व राज्यात रात्रीच्या सुमारास विजेचा तुटवडा जाणवत आहे व ते प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूप जास्त आहे. जल विद्युत व पुनर्नवीकरणीय ऊर्जा साधने भरपूर असूनही विजेचे संकट असणे हा विरोधाभास आहे पण तसे आहे खरे. या राज्यांमध्ये साक्षरता अधिक आहे व निधी पुरवठ्यात त्यांना विशेष दर्जा दिलेला आहे. या भागात वीज क्षेत्राच्या शाश्वत विकासाला महत्व आहे. या देशाला त्यातून बराच फायदा होऊ शकतो. वीज क्षेत्रातील शाश्वतता ही एक जोखीम आहे. त्यासाठी बहुउद्देशीय धोरण ठेवावे लागते या क्षेत्रातील संधी व आव्हानांचा आढावा घेणे त्यासाठी आवश्यक आहे.***

जगाच्या पाठीवर कुठल्याही भागाचा आर्थिक व सामाजिक विकास हा वीज क्षेत्रावर अवलंबून असतो, भारतातील ईशान्येकडील राज्येही त्याला अपवाद नाहीत. आज ही राज्ये आर्थिक व सामाजिक निकषाच्या मोजपट्टीवर मागे पडताना दिसत आहेत त्यात या राज्यांमधील दरडोई उत्पन्न, वीज वापर व औद्योगीकरण याबाबतीत प्रगती कमी आहे. सिक्कीम वगळता ईशान्येतील सर्व राज्यात रात्रीच्या सुमारास विजेचा तुटवडा जाणवत आहे व ते प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूप जास्त आहे. जल विद्युत व पुनर्नवीकरणीय ऊर्जा साधने भरपूर असूनही विजेचे संकट असणे हा विरोधाभास आहे पण तसे आहे खरे. या राज्यांमध्ये साक्षरता अधिक आहे व निधी पुरवठ्यात त्यांना विशेष दर्जा दिलेला आहे. या भागात वीज क्षेत्राच्या शाश्वत विकासाला महत्व आहे. या देशाला त्यातून बराच फायदा होऊ शकतो.

वीज क्षेत्रातील शाश्वतता ही एक जोखीम आहे. त्यासाठी बहुउद्देशीय धोरण ठेवावे लागते या क्षेत्रातील संधी व आव्हानांचा आढावा घेणे त्यासाठी आवश्यक आहे. न अजमावलेले ऊर्जा स्त्रोत, मागणीच्या वाढीचा अभ्यास व निर्यात क्षमता, वितरण व पारेषण प्रणाली, नियंत्रण सुविधा , क्षमता सुधारणा, धोरण नियामक यंत्रणा, प्रशासन रचना व मनुष्यबळ विकास यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या भागातील ९० टक्के जलविद्युत क्षमता वापरली गेलेली नाही. एकूण ५६००० मेगावॉटची जलविद्युत क्षमता या राज्यांमध्ये आहे. उर्जेचा शाश्वत विकास हा राज्यांमधील विजेची मागणी भागवण्यास आवश्यक आहे पण देशाच्याही हरित व लवचिक वीज गरजा त्यामुळे पूर्ण केल्या जाऊ शकतात. हे प्रकल्प पूर नियंत्रण व जलसंधारण गरजाही भागवू शकतात.

या क्षेत्रात आव्हानेही अधिक आहेत कारण जलविद्युत ऊर्जा निर्मितीला भांडवली खर्च जास्त असतो. अधिशयन काल, जलविद्युत प्रदेशांमधील सुधारणा, जलचर अधिवासांवर परिणाम, सार्वजनिक आरोग्य, भूकंप हानी , पुनर्वसन यांचा विचारही यात करावा लागतो. कायदा व सुव्यवस्था तसेच नदीकाठच्या प्रदेशांमधील समस्या व जमीन नोंदीची अनुपलब्धता यामुळे प्रकल्पग्रस्तांची ओळख पटवणे कठीण जाते, परवाने मिळण्यात होणारा विलंब, रस्ते दळणवळणाची दुरवस्था यामुळेही प्रकल्पांची किंमत वाढत जाते. गुंतवणूकदार व्याज दरांचाही विपरित परिणाम वीज प्रकल्पांवर होत असतो. अलिकडेच टेरीने प्रकल्प विकासकांसाठी केलेल्या पाहणी अभ्यासानुसार तेथे स्थानिक लोकांची संस्कृती व परंपरा नष्ट होण्याची भीती व्यक्त केली आहे. निम्न आर्थिक अवस्थेतून पूर्ण अर्थसहाय्य असलेल्या अर्थव्यवस्थेकडे मार्गक्रमण करताना काही प्रश्न हे

संवेदनशील बनतात. प्रकल्पांची वैधता ही जलशास्त्रीय माहितीवर ठरते त्यात जल हवामानशास्त्रीय बदलांचे निरीक्षणही महत्वाचे असते. हवामान बदलांचा अभ्यास करणेही त्यात आवश्यक असते. ही आव्हाने जर बघितली तर त्यात गुंतागुंत व सामाजिक-राजकीय नाजूक मुद्‌द्यांचा संबंध येतो. याबाबत धोरण आखताना काही मुद्दे विचारात घ्यावे लागतात ते असे १) नदी खोऱ्यानुसार योजना व समन्वित अंमलबजावणी २) साधने धोक्यात येण्याचा सर्वांगीण आढावा ३) प्रकल्पांचा प्रत्येक टप्प्यावर आंतरराष्ट्रीय जलविद्युत संघटनेच्या निकषानुसार आढावा. ४) पारदर्शक व व्यावसायिक पद्धतीने पर्यावरण परिणाम आढावा ५) परवान्यांचे सुसूत्रीकरण व गतीमानता ६) नागरिक व नागरी समुदायाला सामावून घेताना सकारात्मक दृष्टिकोन. संघराज्य व नदीकाठच्या प्रदेशांबाबत राजकीय स्वीकारार्हता लाभलेले प्रश्न हे अग्रक्रमाने हाताळले पाहिजेत.

**विकास व पुनर्नवीकरणीय साधने**

लघु जलविद्युत प्रकल्प, जैवभार व सौर ऊर्जा यांच्यासह अनेक साधनांचा यात विचार करता येतो. त्यामुळे वीज उपलब्धता वाढवणे व दूरस्थ गावात वीज पोहोचवणे शक्य असते या भागात २२०० मेगावॉट क्षमतेचे एक हजार लहान जल विद्युत प्रकल्प होऊ शकतात. येथे जैवभार क्षमता मोठी असून त्याचा वापर केल्यास ग्रामीण विद्युतीकरण शक्य आहे. सौर उर्जेची क्षमता वापरणेही गरजेचे आहे त्यासाठी बृहत आराखडे आठ शहरांसाठी तयार करण्यात आले आहेत. पुनर्नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या सौर शहर विकास कार्यक्रमाअंतर्गत आगरताळा, एझवाल यांचा विकास सौर शहरे म्हणून करण्यात येत आहे. याच साधनांच्या विकासात व दूरस्थ ठिकाणच्या प्रकल्पांमध्ये अनेक अडथळे आहेत त्यात गुंतवणूकदारांना स्वारस्य नसणे, संबंधित प्रकल्पातील वीज मागणीच्या ठिकाणी नेणे व औद्योगिक प्रारूपांची अंमलबजावणी करणे यांचा समावेश आहे. वापरयोग्य स्त्रोतांचे मूल्यमापन व स्थानिक लोकांच्या वीज गरजांचे मूल्यमापन महत्वाचे आहे. हे प्रकल्प वीज जाळ्यांना जोडणारे किंवा न जोडणारे असू शकतात. ते भौगोलिक स्थिती, लोकसंख्या घनता, विजेच्या गरजा यावर अवलंबून असते. वीज उद्योगाच्या व्यावसायिक प्रारूपाकडे लक्ष देणे आवश्यक असते. वीज वितरण व पारेषणाचा विकास व इतर नियंत्रण गरजा यांचे यात महत्व आहे. अनेकदा प्रकल्प दूरस्थ भागात असतात तेथे तयार झालेली वीज मागणी असलेल्या भागाकडे न्यावी लागते त्यासाठी वीज वितरण व पारेषण यंत्रणेचा विस्तार करताना मोठी गुंतवणूक आवश्यक असते. या व्यवस्थेचा वापर सुरूवातीला कमी असू शकतो पण नंतर वीज दर आकारताना वीज कंपन्यांना आर्थिक फायदा मिळू शकतो. वीज निर्मिती क्षमतेतील अस्थिरता, कठीण भौगोलिक प्रदेश, प्रकल्प कामाचा योग्य काळ व त्याच्याशी संबंधित घटकही महत्वाचे आहेत.

वितरण व पारेषण या दोन्हीत दीर्घकालीन वीज निर्मिती , मागणी वाढ व बाजारपेठ बदलाचा कल, नदी खोऱ्यानुसार वेगळे विकास आराखडे, अडथळ्यांवर मात करण्याच्या योग्य पद्धती, वीज गळती रोखणे, तंत्रज्ञानात सुधारणा, स्मार्ट ग्रीडचा वापर, परिस्थितीजन्य विश्लेषण यांना यात महत्व आहे. ग्रीड विस्तारणे तसेच सुनियंत्रण केंद्रे स्थापन करणे आवश्यक आहे. मागणी- पुरवठा यातील साखळीचा अभ्यास करून कमाल वीज निर्मिती व क्षमता तयार करणे गरजेचे ठरते. विद्युत कायदा, विद्युत संवर्धन कायदा व 'द नॅशनल मिशन ऑन एनहान्सड एनर्जी अँड एफिशियन्सी' यामुळे वीज निर्मिती प्रकल्पांना वैधानिक पाठबळ प्राप्त होते. विद्युत निर्मिती क्षमता सुधारण्यात या राज्यांमध्ये बराच वाव आहे. त्यामुळे तेच महत्वाचे कार्यक्षेत्र ठरू शकते. सुयोग्य व्यावसायिक प्रारूपांचा विकास व लोकजागृती यात महत्वाची आहे.

वीज निर्मिती उद्योगास पूरक धोरण व नियम तसेच सुप्रशासनाची व्यवस्था यांचा शाश्वत विकासात महत्वाचा वाटा असतो. त्यामुळे बहुउद्देशीय धोरणाचा अवलंब यात आवश्यक ठरतो. यातील धोरणे खासगी व सरकारी भागीदारीला पूरक ठरणारी असली पाहिजेत. त्यामुळे आर्थिक साधने गोळा करणे व व्यवस्थापन कार्यक्षमता सुधारणे सोपे होते. विशिष्ट कालांतराने धोरण व नियमन मूल्यमापन अभ्यास आवश्यक असतो. त्यामुळे उद्देशांची पूर्तता योग्य मार्गांनी होते की नाही हे कळते त्यातून सुधारणा करता येतात. मनुष्यबळ विकासाच्या आघाडीवर कौशल्य असलेले कर्मचारी तयार करणे गरजेचे आहे. शिवाय विविधांगी अभियांत्रिकी क्षेत्रे, प्रकल्प व्यवस्थापन, नियमन या मुद्‌द्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

ईशान्येकडील राज्यांमध्ये शाश्वत विकास गरजेचा आहे. त्यात संधी व आव्हाने दोन्ही आहेत. बहुउद्देशी धोरण वापरून उद्दिष्टे साध्य केली पाहिजेत. जलविद्युत व पुनर्नवीकरणीय ऊर्जा साधने यांच्या विकासाला वेग दिला पाहिजे. बाजारपेठ संधी, कार्यक्षमता विकास, अनुकूल धोरण व नियमन व्यवस्था तसेच परिणामकारक प्रशासन व मनुष्यबळ विकास यांचा विचार करून वितरण व पारेषण व्यवस्थांचा विस्तार करणे आवश्यक आहे. ईशान्येकडील राज्यात वीज उत्पादनात शाश्वत विकास शक्य आहे पण त्यात ऊर्जा सुरक्षा, हरितगृह वायूंचे प्रमाण कमी करणे, मोठ्या प्रमाणात सौर व पवन ऊर्जा संजालांचे एकात्मीकरणही आवश्यक आहे.

■■■

*लेखक वीज क्षेत्रातील तज्ञ असून ' दी एनर्जी अँड रिसोर्स इन्स्टिट्यूट' मध्ये कार्यरत आहेत.*

*email:krnathan@teri.res.in*



के'सागरीय पुस्तके अभ्यासा म्हणजे क्लासेसच्या टेस्ट सेरिजमधील सर्व प्रश्नांची उत्तरे तर तुम्हाला देता येतीलच पण आयोगाची प्रश्नपत्रिकाही तुम्ही सहज सोडवाल!
आई-वडिलांनी अभ्यासलेले अन् मुलांच्या हाती सोपविलेले,
३० वर्षांचा इतिहास असलेले के'सागरीय संदर्भ..
स्पर्धा परीक्षा पुस्तकांसंदर्भात योग्य मार्गदर्शन करू शकणारे सुविद्य अभ्यासू विक्रेते...
सर्व स्पर्धा परीक्षांची सर्व प्रकाशनांची
सर्व पुस्तके असणारी महाराष्ट्रातील दोन स्वतंत्र दालने-
सूट २०% ते ५०%
आज अधिकारी असलेल्या प्रत्येकानं अभ्यासलंय के'सागर!
K'Sagar बुक सेंटर
'नुतन क्लासिक', नारायण पेठ, नू. म. वि. प्राथमिक शाळेसमोर, अप्पा बळवंत चौक, पुणे-४११ ००२.
९८२३१२१३९५/९५४५५६७८६२/६३
(०२०) २४४५३०६५
K'Sagar's हाऊस ऑफ बुक्स
'दुर्गा चेंबर्स', ३९/१ बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, जोगेश्वरी मंदिराशेजारी, पुणे-४११ ००२.
९९२३९०६५००/८०८७७२२२७७
(०२०) २४४८३१६६
सुबोध भारतीय राज्यघटना
जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था
DIET
७५वी आवृत्ती
संपूर्ण पोलीस कॉन्स्टेबल भरती परीक्षा
By-K'Sagar
MPSC पूर्व परीक्षा
पेपर पहिला
संपूर्ण तयारी
UPSC पूर्व परीक्षेसाठी उपयुक्त
By-K'Sagar
लेटेस्ट जनरल नॉलेज व चालू घडामोडी
संपूर्ण मराठी
के'सागर
स्पर्धा परीक्षा
संपूर्ण इंग्रजी
व्याकरण व शब्द संग्रह
By-K'Sagar
आधुनिक भारताचा इतिहास
आधुनिक भारताचा इतिहास
DIET
जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था
१० सराव प्रश्नपत्रिका
K'Sagar
आयोगाच्या वाढत्या काठिण्यपातळीनुसार अन् प्रश्नांच्या नव्या धर्तीनुसार रचना केलेले संदर्भ

Yojana Marathi (Monthly) April 2016
RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No.G/NMD/137/2016-18
Published Date : 12th April, 2016
Date of Posting : 16th April, 2016

# UPSC Foundation Batch 2016-17

Dear Friends,

We are going to start next **UPSC FOUNDATION BATCH** for the year 2016-17 From 1 July 2016 for IAS Pre-Coching, Important **SALIENT FEATURES** are as follows :

1) Only one batch in a year in order to focus exclusively on Limited number of Students.
2) It covers all the three stages of Civil Services Exam- Prelim, Mains and Interview.
3) Exhaustive coverage of the syllabus aimed a capacity-building of the students.
4) **Broad Schedule :**
   **July-Dec 16 :** Basic Preparation/Concept building
   **Jan-Mar 17 :** Answer writing practice
   **April-May 17 :** Exclusive focus on Prelim 2017 based on Test based Revision
   **Aug-Nov 17 :** Weekly writing practice for main 2017
5) Please Note only serious and Committed students are Invited !!

## UPSC 2016-17

Foundation Batch
Prelim + Mains + Interview
Starts From : **1 July 2016**

## MPSC 2016-17


Foundation Batch
Prelim + Mains + Interview
Starts From : **4 July 2016**

## OPINION OF SOME SUCCESSFUL STUDENTS !




**Vijay Kulange (IAS)**

"Importance and relevance of Ranjan Kolambe Sir to Civil Services coaching is beyond doubt, his very name instills confidence."




**Dr. Satish Shitole (IRS)**

" Bhagirath Symbolizes hard work, It's manifestation in this sector is Ranjan Kolambe Sir, and it's reflection is unmistakably found in his vast student community".




**Vivekanad Jadhwar (IRS)**

"During my initial journey of civil services Preparation the book by Ranjan Kolambe sir Was the base. Sir has very good skill to make things simple. It helped me a lot in UPSC preparation. Thank you sir."



**Harshit D. Bari (IRS)**

" Known as 'one man army', Ranjan Sir is the best bet."



**Rajesh Gavali (AIR)**

"Ranjan sir harbours a Mircro University in himself: teaching of many subjects in simple yet organised manners."



**Adinath Dagde (AIR)**




**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

मंत्री हाईटस्, २ रा मजला, शनिवार पेठ, पुणे -३०.
फोन नं. : 020-64013450 | 9970298197 | 7378406920
*Web :* www.bhagirathacademy.com
*E-mail :* bhagirathacademypune@gmail.com
*Facebook :* Bhagirath IAS Academy

Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.